श्रावण-धारा

रविकांत मिराशी

सुरस ग्रंथमाला
सोलापूर-२

मूल्य चार रुपये

प्र का श क व मा ल क :
म. गौ. व्होरा,
सुरस ग्रंथमाला सोलापूर–२.

प्रथमावृत्ती १९७०

: मु द्र क
बा. ह. कोल्हटकर,
महाराष्ट्र-मित्र मुद्रणालय,
७७, शुक्रवार पेठ, सातारा.

स्वतः आशिक्षित असूनही ज्यांनी माझ्या साहित्य-
गुणांना उत्तेजन अन् आपला प्रेमळ आशीर्वाद देऊन
पुलकित केले त्या माझ्या
ती. तात
आणि
महन्मंगल मातेस—

श्रावण-धारा

: १ :

योगिनी गडबडीने आशूची तयारी करीत होती. आशूला आज डिस्चार्ज मिळाला होता. योगिनी आज तीन वर्षे परिचारिकेचे काम करीत होती. सबध रुग्णालयात ती सर्वांना हवी हवीशी वाटत होती. साधी वागणूक, सुशील स्वभाव आणि निर्लेप अंतःकरण ह्यामुळे सर्वांना तिने आपलेसे करून टाकले होते. डॉक्टर, मेट्रन पासून ते साध्या वॉर्ड-बॉय अन मेहतरपर्यंत सर्वांनाच तिच्याबद्दल आदर वाटत होता. योगिनी पेशंटबरोबर देखील इतक्या जिव्हाळयाने वागत असे की, त्याला देखील ती परिचारिका नसून आप्तापैकीच कुणी वाटे बरे होऊन घरी जाताना प्रत्येक पेशंट तिचा निरोप घेताना विरघळून जाई. पाणावलेल्या डोळयांनी तिचा निरोप घेताना आपणात एक नवीन नात निर्माण झाल्याचे तरंग त्यात उमटलेले असत. अशा वेळी योगिनी शरमिंधी होई. मनोमन तिचा उर भरून येई. तोंडाने मात्र ती त्या व्यक्तीला चुचकारून निरोप देई. ह्या तीन वर्षांत लहान थोर अनेक प्रकारचे, भिन्न स्वभावाचे पेशंट तिने न्याहाळले होते. रुग्णालय म्हणजे जणु विभिन्न प्रकृतीच्या व्यक्तींचं प्राणीसंग्रहालय !

आज पंधरा दिवसांपूर्वी दाखल झालेली आठ वर्षांची आशु घरी जाणार म्हणून योगिनीच्या मनात कालवाकालव चालली होती. आशूचे कपडे भरता भरता मनात विरहाची व्यथा उमटली. टायफॉईडच्या दुखण्याने आशु रुग्णालयात दाखल झाली. त्याचवेळी त्या गोंडस छोकरीने योगिनीला वेड लावले. योगिनी रात्रपाळीला असताना सबध वॉर्ड सोडून आशूच्या सेवेत मग्न होई. आशु एका श्रीमंत गृहस्थाची आईविना पोरकी मुलगी आहे, एवढेच तिला माहित होते. पहिल्या दोन दिवसात ती तापाने इतकी फुलून आली होती की तिला बोलताच येत

नव्हते. ती नुसती कण्हत होती. तिसऱ्या चवथ्या दिवसापासून तापाचा जोर कमी झाला. आशु बोलू लागली. तिच्या बोलांनी अन् गोड नाजुक हट्टांनी योगिनी भारावून गेली. नैसर्गिक स्त्री-ममता जणू ओसडून जात होती. योगिनी कोडकौतुकाने अन् वात्सल्याने ओंजारून – गोंजारून औषध घेण्यास तसेच ताप दाखविण्यास आशूला भाग पाडी. रात्री झोपताना आशु तिच्याकडे गोष्ट सांगण्याचा हट्ट करी.

योगिनी देखील आशूला आपल्या कुशीत घेत राजाराणीच्या गोष्टी सांगे. त्यामुळे आशूला योगीनीचा खूप लळा लागला होता. आजपर्यंत तो पोरका जीव होता. घरात फक्त वडील अन् म्हातारा नोकर गोपीकाका. स्त्री अशी कुणीच नव्हती. त्यामुळे स्त्रीममतेची – वात्सल्याची तिला लागलेली आच योगिनीच्या संपर्काने शमली जात होती. वडील भेटायला आल्यावर आशु त्यांच्याकडे सारखी बडबड करी—

' डॅडी – योगिनी आंटी आहे ना – ती फार चांगली आहे. मला खूप खूप गोष्टी सांगते. चॉकलेट आणून देते. मी बरी झाल्यावर तिला आपल्या घरी आणणार आहे. तिला आपलं घर बघायचं आहे. तुम्हाला देखील बघायचं आहे.

' हो ऽ हो ऽ! अग तुझी एवढी चांगली आंटी आम्हाला देखील पहायची आहे.

आमच्या आशुराणीला खूप खूप गम्मत सांगणारी खाऊ देणारी आंटी कोण आहे ते पाहू तरी '

' ती आता नसते काही डॅडी – ती रात्रीची येते ! '

' अस्सं ऽ ! पण आम्हाला रात्रीचं भेटता येणार नाही. बरी झालीस की मग तुझ्या आंटीला घरी बोलाव हं ऽ !'

आणि बापलेकीचा विषय तेथेच तुटत असे. आशूच्या ओथंबलेल्या ओढीने अन् लळ्यामुळे तिच्या वडिलांनी हॉस्पिटलच्या मेट्रनकडे सहज चौकशी केली होती. मेट्रन शांताबाई त्यांच्या ओळखीच्या होत्या. योगिनीबद्दल चांगलं सांगून उलट तिच्याबद्दल मनातून स्वतःस वाटणारी

आस्था अन् प्रेम देखील त्यांनी बोलून दाखविले. त्यामुळे आशूचे वडील मकरंद ह्यांनाही योगिनीची भेट घेण्याची अनिवार इच्छा निर्माण झाली. पण ती क्षणमात्रच ठरत असे. पाण्यावर येणाऱ्या बुडबुड्यागत ती निर्माण होई अन विस्मृतीच्या डोहात विफल ठरे

आशु देखील योगिनीकडे आपल्या वडिलांबद्दल खूप खूप बोलत असे. साहजिकच तिच्या वडिलांना पाहण्याची इच्छा योगिनीच्या मनात निर्माण होई. श्री. मकरंद विचारे पुण्यातील एक बडे उद्योगपति होते. एवढंच मेट्रनकडून तिला समजलं होतं. आज योगिनीची पाळी बदलली होती. दिवसपाळी असल्यामुळे आशूला घरी नेण्यास येणारे तिचे वडील ती पाहणार होती. 'तुमच्या ह्या गोड छबकडीने माझं मन जिंकलं. फार आवडली मला ती!' म्हणून ती त्यांना सांगणार होती. सुखदुःखाच्या मिश्र भावनेने ती आशूची तयारी करीत होती. छोटी आशु मात्र सारखी सांगत होती.

'आंटी ऽ! येणार ना तू आमच्या घरी? बघ हं ऽ! खोटं सांगू नकोस ऽ! योगिनी देखील तिला 'हं ऽ हं ऽ' करीत तिचे पापे घेत होती. त्या खेळीमेळीत वेळ वाढत चालला होता. भेटायला येणाऱ्या लोकांची गर्दी ओसरू लागली होती. योगिनीने सबंध वार्डमधील रोग्यांचे औषध अन् गोळ्या द्यायचे काम आटोपून घेतले. तेवढ्यात सहा वाजून गेले. तरी अजून आशूच्या वडिलांचा पत्ता नव्हता. इतक्यात मेट्रन शांताबाई तेथे आल्या. त्यांना देखील त्याच गोष्टीबद्दल चिंता वाटत होती.

'योगिनी' अग आता ह्या आशूचं काय करायचं ऽ? हिचे वडील अजून आले नाहीत!' इति शांताबाई.

'बाई, अर्धा तास वाट पाहू. मोठी माणसं आहेत. काही अचानक काम निघालं असेल..' योगिनी.

'हो ऽ! ते खरं ग ऽ! पण समज—'

'बाई, त्यांच्या घरी फोन आहे ना? फोन करून विचारू का?' शांताबाईची शंका पुढे वाढू न देता योगिनीने तोडगा काढला. शांताबाईंना तो एकदम पसद पडला. त्या लगबगीने पुन्हा ऑफिसमध्ये

गेल्या. विचारे यांच्या भेटचिठ्ठीकेवरील नंबर पाहिला. आपले जाड बोट नंबर फिरविण्यासाठी त्या लावणार इतक्यात टेलीफोनच्या घंटीचा ट्रिंग ऽ ट्रिंग ऽ असा आवाज झाला. त्या आगंतुक बेलने शांताबाई दचकल्या. त्यांनी योगिनीकडे पाहिले. योगिनीने त्यांच्याकडे पाहूत एक मंद स्मित केले. तिला जनू म्हणायचे होते, ' अहो 'असं होतं कधी कधी. ' शांताबाई रिसीव्हर उचलून कानाला लावीत उद्गारल्या.

' हॅलो ऽ ! '

' सुविधा रुग्णालय ' तिकडील आवाज.

' येस् ऽ '

' मी मकरंद विचारे बोलतोय. मला मेट्रन शांताबाई यांच्याशी बोलायचंय '

' मिस्टर विचारे, मी मेट्रन शांताबाईच बोलतेय. मी तुमचीच वाट पाहून आता तुम्हाला फोन करणार होते. तुमच्या मुलीला आज डिस्चार्ज मिळाला आहे. त्यासाठी तुम्ही तिला न्यायला येणार होता ना ? '

शांताबाईच्या प्रश्नाचं उत्तर देत मकरंद विचारे यांनी अधिक माहिती दिली. मकरंद यांना अचानक बोर्डाच्या मीटिंगला पाचारण आल्यामुळे त्यांना तिकडे जावे लागले. सभा तातडीची असल्यामुळे सहापर्यंत संपेल असं त्यांना वाटलं. पण सभेत चर्चेला अधिक फाटे फुटले अन वेळ वाढत चालला. शिवाय आणखीन किती वेळ लागेल ह्याचा अंदाज नसल्यामुळे त्यांनी हॉस्पिटलमधील एखाद्या सुजाण वार्ड-बॉयबरोबर आशूला घरी पाठविण्याची विनंती केली. त्याबद्दल त्याला योग्य ते बक्षिस देऊ असेही त्यांनी नमूद केले. आपली अडचण सांगून त्रास देत असल्याबद्दल त्यांनी माफी मागितली.

' अहो त्यात क्षमा कसलीय् ? मी योग्य ती व्यवस्था लावते. तुम्ही निश्चिंत रहा ! '

' थँक्स ! ' म्हणत तिकडून मकरंदने फोन खाली ठेवला. शांताबाईंनी देखील फोन खाली ठेवून योगिनीला मकरंदची अडचण सांगि-

तली. व लगेच वसंत नावाच्या एका वार्ड बॉयला त्यांनी हाक देखील मारली. वसंतला त्यांनी कां हांक मारली ते जाणून योगिनी म्हणाली.

'बाई, वसंताला कशाला बोलावता ? माझी ड्यूटी आता संपलेलीच आहे. मीच जाताना आशूला घेऊन जाते. तिला देखील तेवढंच बरं वाटेल. पत्ता द्या मला !'

'हो ग ऽ हो ऽ ! तुझी ड्यूटी संपली नाही का ? मग तूच घेऊन जा बाई सांभाळून !' असं म्हणत शांताबाईंनी टेबलावरील काचेखालील मकरंद विचारे यांची एक चिठ्ठी काढून दिली. भेटचिठ्ठीका घेत योगिनी आपल्या रूममध्ये गेली. तिने परिचारिकेचा गणवेष उतरवला अन् नित्याची श्वेत साडी अन् श्वेत ब्लाऊज घालून केस सावरीत आशूकडे येत तिने आशूला साद घातली.

'आंटी तू कुठे गेली होतीस – आणि माझे डॅडी अजून कसे आले नाहीत ?'

'तुमच्या डॅडींना काम निघालं – त्यांचा फोन आला होता. चल. मी येते तुझ्या घरी तुला पोहोचवायला. चालेल ना ?'

किंचित निराश झालेल्या आशूची कळी खुलली.

'खरंच आंटी, तू येणार आमच्या घरी –? मग चल ना लौकर !' असं म्हणत ती उठली देखील.

टॅक्सी मकरंद विचारे यांच्या घरासमोर येऊन थांबली. गाडीतूनच योगिनीने बंगली न्याहाळली. त्यावरून बंगलीच्या मालकाच्या श्रीमंतीची कल्पना आली. बंगली अद्यावत बांधणीची असून तिला दिलेली आकर्षक रंगसंगती उठून दिसत होती. बाहेर चिमुकला पुष्पकुंज, त्यात फुललेली गुलाब जाईजुईची रंगीबेरंगी फुले, उद्यानाच्या मधोमध फुलांच्या ताटव्याखाली ठेवलेला टीपॉय, अन सभोवताली चार खुर्च्या. योगिनीने बाहेर येऊन टॅक्सीचे पैसे चुकते केले. आशू तिला दरवाजापर्यंत घेऊन गेली. कधी तिला आपलं घर दाखविते असं तिला झालं होतं. आशूने दरवाजाजवळ येताच योगिनीला बेल दाखविली. तिच्या हुशारीचं कौतुक करीत योगिनीने बेल दाबली. बेलचा 'सा ग ऽ सा ग ऽ'

असा संगीतमय आवाज झाला. त्या मधुर स्वरांनी योगिनी मोहून गेली. दरवाजा उघडला गेला. आतून एक वयस्क नोकर बाहेर आला. ' गोपीकाका, गोपीकाका, ' बडबडत आशु त्याला बिलगली. अपरिचित योगिनीला पाहून गोपीला आश्चर्य वाटले. साश्चर्य त्याने विचारले ' आपण .. ? '

' मी हॉस्पिटल नर्स. ह्यांच्या वडिलांचा फोन आला की 'हिला घरी आणून सोडा.' मीच घेऊन आले. '

तिची ओळख मिळताच गोपीने नमस्कारासाठी हात जोडले अन् हसतच तिला आत येण्यास सुचविले.

' अजून आले नाहीत का आशूचे वडील ? ' योगिनीने आत जात प्रश्न केला. आशु तिला अधिकाधिक आत खेचीत गोपीला म्हणत होती–

' काका, काका, ही माझी आंटी. मी हिला आपलं घर दाखवायला आणली आहे. ही ना फार चांगली आहे. डॅडींना देखील भेटविणार आहे हिला ! '

आशु पुढे अन योगिनी मागे अशा प्रकारे ती दोघं दिवाणखान्यात आली. दिवाणखान्यात प्रशस्त सोफासेट होते. टेबलावर फुलदाणीत व्यवस्थित रीत्या टपोरी फुले माडून ठेवली होती. कपाटावर निरनिराळ्या प्रकारची नक्षी कोरलेली होती. भितीवर मोठमोठ्या तस्वीरी होत्या. हा सारा सरजाम पाहून योगिनी भांबावून गेली. आराम, ऐश्वर्य आणि सौंदर्य ह्या तिहेरी संगमानं नटलेलं सारं वैभव तिने पाहिले. सर्व दाखवून झाल्यावर आशूने चित्रावरून नजर फिरविली. त्यातील एका उमद्या अन सुहास्य तसबीरीकडे योगिनीचं लक्ष वेधलं. त्या फोटोतील गोड चेहरा तिला फार आवडला. आशूच्या देखील ती गोष्ट लक्षात आली. आशु तिला ओढीतच त्या फोटोकडे घेऊन गेली अन् म्हणाली.

' आंटी, हा फोटो कुणाचा ओळख पाहू ? '

' कुणाचा – तूच साग पाहू ? ' योगिनीने विचारले.

'हा फोटो आमच्या डॅडींचा ! हो की नाही, गोपीकाका ?'

'हो बाईसाहेब, हा आमच्या मालकांचा फोटो !' गोपीने पुस्ती जोडली.

'एवढया मोठया घरात तुम्ही तिघंच राहता ? '

'हो. मालक, मी अन् आमची छोटी आशु. बस्स. इनमीनतीन माणसंच आम्ही ! असं म्हणत गोपी आत गेला.

'आंटी, आमचं घर कसं वाटलं तुला ? ' आशूने प्रश्न केला.

'छान आहे ! '

'आमचे डॅडी कसे आहेत ?' वडिलांच्या फोटोकडे बोट दाखवीत तिने विचारले.

'फोटोत छान आहेत. पण प्रत्यक्षात कुठे पाहिले मी ? ' योगिनी सहज बोलून गेली.

'प्रत्यक्ष देखील छान आहेत. आता बघशील तू ! इतक्यात चहा-बिस्किटांचा ट्रे घेऊन आत येणाऱ्या गोपीला त्या छवकडीच्या बोलांचं हसू आलं. चहा टीपॉयवर ठेवून त्याने आशूला खुणाविले.

'आंटी, चहा घे ऽ ! ' आशु खुर्चीत बसत म्हणाली. योगिनी तिच्या शेजारी बसली. आशूबरोबर चहापान सपविल्यानंतर मनगटी घडयाळात पाहत ती अनुक्रमे दोघांकडे पाहत म्हणाली–

'बरं, आता मी जाते हं ऽ –'

'अंहं ऽ आंटी, थांब ना ! डॅडी येतील एवढयात.' आशु.

'तुमचे डॅडी बडे माणूस. त्यांचा काय नेम ? अधिक काम निघाले तर उशीर देखील होईल ! '

इतक्यात टेलिफोन घणघणला. योगिनीने मागे वळून पाहिले. गोपी टेलिफोन कानाला लावून बोलत होता. मकरंद आशूबद्दल विचारीत होते. गोपी सांगत होता की, ' आशु अगदी सुखरूप पोहोचली असून ती तुमची वाट पाहतेय ! ' योगिनी संभाषण ऐकत होती. एकाएकी तिच्या मनात विचार आले. निरभ्र आकाशांत वीज चमकावी तसे तिला वाटले. आता आपणाला जायला हवे. आपण आशूला सुखरूप

आणले. तिच्या इच्छेखातर तिचे घर देखील पाहिले. आता अधिक थांबणे मूर्खपणाचे आहे. आशूचे वडील आले तरी काय करणार होते? त्यांनी तिचे आभार मानले असते. पण तिने असे कोणते उपकार केले होते? केवळ एक छोटंसं कर्तव्य पूर्ण केलं होतं. तेही तिला आवडणाऱ्या आशूसाठी! विचारांसरशी आपला वटवा सांभाळीत ती जायला उठली. पण आशु कसली ऐकते? 'आंटी, थांब ना. डॅडी येईपर्यंत...थांब ना! नाहीतर मी रागावेन हं तुझ्यावर!' बोलत बोलत ती योगिनीचा पदर घट्ट धरून तिला अडवू लागली. शेवटी 'बरं बाई! थांबते. मग झालं?' असं म्हणत योगिनीने तिचा एक गोडसा पापा घेतला. अन् पुन्हा खुर्चीवर बसून ती आशूशी गप्पा मारू लागली. अधूनमधून ती मनगटी घड्याळ पाहत होती. वेळ अधिकाधिक होत होता. तेवढ्यात गोपी आला अन आशूला कपडे बदलण्यास घेऊन गेला. जाता जाता आशूने योगिनीस थांबण्याची विनंती केली होती.

एवढ्या मोठ्या दिवाणखान्यात ती एकटीच बसली होती. तेवढ्यात गजराच्या घड्याळात आठाचे टोले पडले. आता मात्र आशूची समजूत घालून जायचे असे ठरवून योगिनी उठली. तोच बाहेर पोर्चमध्ये गाडी थांबल्याचा आवाज झाला ती पुन्हा बसली. कां कोण जाणे, तिच्या छातीस धस्स झाले. तिने कयास बांधला. पावलांवरून अंदाज बांधला. त्या आवाजात एक बेछुटता होती. दमदारपणा होता. एक प्रकारचा गर्व होता. ह्या ऐश्वर्याच्या स्वामीच्या पावलांचा तो आवाज होता. योगिनी त्याला पाहायला उत्सुक झाली होती. तेवढीच घाबरली देखील होती. दरवाज्यातून आत पाऊल टाकताच मकरंदने 'आशु ऽ आशु ऽ ऽ!' अशा हाका मारल्या. त्या हाकेत मुलीवर प्रतीत असलेले प्रेम गुंजन करीत होते. परंतु समोर बसलेल्या योगिनीला पाहून तो गप्प बसला. योगिनी मंद स्मित करीत त्याच्यासमोर उभी राहिली तिने नकळत त्याला नमस्कार देखील केला. मकरंदने देखील प्रतिहास्य करीत तिला नमस्कार केला.

'आपण...... ?' पुढे तो शब्द शोधू लागला.

' मी सुविधा हॉस्पिटलमधील नर्स. शांताबाईंनी मला तुमच्या आशूला पोचविण्यास धाडले. ' योगिनीने शक्य तेवढे थोडक्यात सांगितले.

'ओहो ऽ! थँक्स ऽ ! मी आपला फार आभारी आहे. त्याचं काय झालं ... '

' ते मला सारं बाईंनी सांगितलं. शिवाय ह्यात आभार कसले मानायचे ? माझी देखील ड्यूटी सपली होती. मला देखील घरी जायचं होत; म्हटलं तुमच्या घराकडून जाव. आशूला देखील बरं वाटेल. ' त्याला पुढे बोलू न देता योगिनी म्हणाली.

तेवढ्यात गोपीकाका आशूला घेऊन आत आला. आशु आपल्या वडिलांना पाहताच त्यांना जाऊन बिलगली. मग तिला योगिनीची आठवण झाली. ती योगिनीची ओळख करून देऊ लागली.

' डॅडी ऽ! ही माझी आंटी. फार चांगली आहे. मला घरी सोडायला देखील आली. आणि आंटी ! हे माझे डॅडी – तुला सांगत नव्हते, फार चांगले आहेत म्हणून ? ' ती बडबडत होती.

' तुम्ही एवढ्या अल्पावधीत हिला आपलंस केलंत ह्याचं आश्चर्य वाटतं. तुमच्याबद्दल ही फार फार सांगायची. पण तुमची भेट मात्र होत नव्हती. आज मणिकांचन योग जुळून आला ! मकरंदने प्रथमच स्नेहार्द्र नजरेने तिला न्याहाळले. योगिनी सलज्ज होत म्हणाली—

' लहान मुलांचं काय ? त्यांच्यावर थोडंसं जरी प्रेम केलं तरी ती आपलीशी होतात ! '

' हो ' ही प्रेमाची मोहिनी भोळेपणाला जिंकते – '

' हो केवळ शैशवातील – तारुण्यातील नव्हे ! '

मकरंदने तिचे उत्तरे ऐकले. अवाक् होऊन तिच्यावर पुन्हा एकदा स्नेहार्द्र कटाक्ष टाकीत त्याने मद स्मित केले. एकाएकी बाहेर वीज चमकली. मेघांचा गडगडाट झाला. योगिनीने खिडकीतून बाहेर पाहिले. आकाशात काळे मेघ जमा झाले होते. योगिनी मकरंदला घरी जाण्याची संमति मागू लागली.

' थांबा हो. आता एवढा उशीर झालाय; तेव्हा जेवूनच जा ! '

'छे: हो ऽ ! आई वाट पाहत असेल. पुढील वेळी...'

' नाही आंटी. आज तू जेवूनच जा. तू मला हास्पिटलमध्ये भरवायचीस, आज मी तुला भरविणार हं ऽ ! गंमत होईल— '

' आमच्यासाठी नको पण ह्या तुमच्या आशूसाठी तरी रहा; नाहीतर रुसेल हो ती तुमच्यावर !' मकरंदने आशूचा पक्ष घेतला.

' नाही; पण पाऊस...?' तिने शंका काढली.

' त्यात काय ? मी गाडीने स्वत: सोडून येईन आपणाला. राहता कुठं ? ' मकरंद.

' पुण्यातच स्वार गेटजवळ.' ती उत्तरली.

' स्वार गेट ? हात्तीच्या ऽ मग फार लांब नाही; गोपी लौकर जेवण वाढ पाहू ! मकरंदने आज्ञा केली.

गोपी आत गेला. त्याने तीन ताटे केली. मकरंद आशु समवेत योगिनी जेवू लागली; आशु जेवता जेवता योगिनीला शाळेतील गमती जमती सांगत होती. योगिनी मध्येच हु ऽ हं ऽ करीत होती. मकरंद जेवता जेवता योगिनीकडे एखादा कटाक्ष टाकीत होता, नि त्याच्या त्या मंद कटाक्षाने योगिनी लज्जित होत होती.

' गोपी ऽ अरे बाईना वाढ की ! आशु ! तुझ्या आंटी जेवायला लाजतात. ' मकरंद मध्येच बोलून गेला.

' नको हं गोपीकाका – मी कमीच जेवते. '

' नाही आंटी, घ्यायला हवं. काका आंटीला पुलाव घाल ! मी सांगते ना ?' आशूने हुकुम सोडला.

' अग वा ग वा ऽ असा सूड घेतेस ? लबाडे ! मकरंदकडे एकवार पाहून ती आशूला म्हणाली.

जेवण संपविता संपविता मकरदने योगिनीला पुढील रविवारी आशूचा वाढदिवस असल्याचे सांगितले. त्यासाठी तिला सबंध दिवस येण्याचे निमंत्रण दिले. प्रथम ' बघू या ' म्हणून तिने टाळाटाळ दर्शविली. तेवढ्यात आशूने आपले अस्त्र बाहेर काढले.

'आंटी ! तू आली नाहीस, तर मी माझा 'बर्थ डे' साजरा करणार नाही. समजलं ?" आशूच्या ह्या अटीपुढे तिचे काही चालले नाही. साहजिकच तिला होकार द्यावा लागला.

जेवण आटोपल्यावर प्रथम मकरंदने जाऊन गाडी काढली. योगिनीने त्याच्या तत्परतेबद्दल त्यास धन्यवाद देऊन 'मी एकटीच जाते' असे सांगितले. परंतु त्याच्या अधिक आग्रहाने अवघडून संकोचाने ती गाडीत पुढील सीटवर त्याच्या बाजूसच बसली. गाडी रस्त्यावर आली. वातावरणात रिमझिम पाऊस पडत होता. योगिनी निस्तब्धपणे बसून बाहेरील काचेवरील पाण्याचे थेंब बाजूस सारणाऱ्या वायपरची द्रुत हालचाल पाहत होती. बाहेरील शीत वारा देखील तिच्या अंगाला स्पर्शून जात होता. तिला त्याने सुखद रोमांच लाभत होते. इतका वेळ स्तब्ध असलेला मकरंद बोलून गेला–

'आशू म्हणत होती, आमचं घर तुम्हाला फार आवडलं ! '

'हो – पण फक्त तिच्या समाधानासाठी म्हणाले मी ! ' योगिनीने गंभीरपणे उत्तर दिले.

'कां ?' मकरंदने चटकन् प्रश्न केला.

'कोणतीहि वस्तु कितीहि सुंदर असेना का ? पण तिला शोभा हवी ! फूल कितीहि सुंदर असलं तरी त्याला सुगंध हवा. मंदिर कितीहि भव्य असलं तरी त्याचा गाभारा रीता असेल तर काय फायदा ? ' योगिनी त्याच्याकडे न पाहता बोलून गेली.

'हं ऽ समजलो. पण मी अगतिक आहे '

'तुम्ही दुसरं लग्न का नाही केलंत ? ' भावनेच्या भरात योगिनीने प्रश्न केला. क्षणभरात तिला वाटले की असा प्रश्न आपण विचारावयास नको होता. पण शब्दशर सुटून गेला होता. तरीही क्षमा मागण्याच्या इराद्याने ती त्याला काही म्हणणार, ...इतक्यात मकरंदच बोलून गेला.

'केवळ आशूच्या जीवनासाठी कदाचित मी असं कधीच करू शकत नाही ! '

'माफ करा. मी मूर्खपणानं बोलून गेले.'

'त्यात काय आहे ? मनात आलेली प्रत्येक गोष्ट माणसाने उघड केली पाहिजे; मनातल्या मनात ठेवल्याने त्या गोष्टीचा अपमान होतो.'

'खरं म्हणजे एवढ्या मोठ्या घरात कुणाला चालता फिरताना, हसता खेळतांना, पाहिलं नाही म्हणून फार दुःख झालं !'

'परंतु आशूच्या बाललीलेनं सबंध घर तुडुंब भरून जाते.

'फार गोड छोकरी आहे ! मला तुमच्याबद्दल सारं काही तिने सांगितलं.'

'काय सांगितलं ? सांगा तरी ! आम्ही तुमच्या तोंडून ऐकतो.'

असं म्हणताना मकरंदची नजर योगिनीच्या चेहऱ्यावर खिळली. क्षणभरच. पण त्या क्षणभरात तिच्या सौंदर्याचं त्याला दर्शन घडलं.

'ते आम्ही नाही सांगणार ! पण घाबरू नका वाईट मुळीच नाही.' योगिनीने गोड लकबीत उत्तर दिले. त्यावेळचा तिचा नाजुक भ्रुकुटीभंग पाहून मकरंद हबकून गेला. इतक्यात – सामोरील 'पों ऽ पों ऽ' आवाज ऐकून तो भानावर आला. जलदगतीने त्याने स्टेअरींग डाव्या बाजूला जोरात फिरविले. त्यामुळे त्याचा खांदा सहजच योगिनीच्या स्कधाला चाटला गेला. संभाव्य गंभीर अपघात टळला होता. पण घडलेल्या गोड आघाताने मात्र मकरंद संकोचून गेला. तो लागलीच बोलून गेला 'सॉरी हं!' त्याच्या त्या बोलण्यानं ती सकोचली. तिला काय बोलावं ते कळेना. तिने एकवार फक्त त्याच्याकडे पाहिले. जणु नजरेतून तिला म्हणायचे होते. 'त्यात सॉरी कसल ?' मनोमन मात्र त्याच्या सौजन्याबद्दल तिला आपुलकी वाटली.

स्वारगेट येईपर्यंत दोघेही गप्पच होती. स्वारगेटपाशी खाली उतरून मकरंदचे आभार मानत योगिनी आपल्या घराकडे जाऊ लागली. तिच्या चालीत घाई होती. गाडी क्षणभर तशीच उभी ठेऊन मकरंदने सिगारेट काढून शिलगावली.

झुरका मारता मारता त्याने सहजच पाहिले. दूर एका बोळात योगिनी शिरत होती. त्याचवेळी तिने देखील मागे वळून पाहिले होते अगदी क्षणभर. ती दृष्टीआड झालेली पाहून मकरंद मागे फिरला होता. योगिनी घराजवळ पोहोचली. दारातच तिची आई वाट पहात होती. योगिनीला समोर पाहताच तिचा जीव भांड्यात पडला.

' योगा ऽ ! पोरी आज किती उशीर केलास ? '

' अग आई, जरा बाहेर गेले होते ! ' योगिनी आत जात उत्तरली. तिची आईही आत आली. मुलीला जेवायला वाढायला घेत ती उद्गारली, ' चल, कपडे बदल पाहू ! मी जेवायला वाढते. भूक लागली असेल— '

' आई जेवायला नकोय मला ऽ. जेवून आलेय मी. अगदी पोटभर ! '

' कुणाकडे ग ऽ ? शालिनीकडे गेली होतीस की काय ? ' तिच्या मैत्रिणीचा विचार मनात येऊन आईने पृच्छा केली.

' छे. ग ऽ! त्या आशु मुलीबद्दल मी तुला म्हणत होते ना ? तिला आज डिस्चार्ज मिळाला. मीच तिला घरी सोडायला गेले होते. हट्टाने पोटभर जेवण्यास तिने भाग पाडले. जाऊच देईना.' असं म्हणत गोड हसत योगिनी आपल्या खोलीत गेली. तिची खोली अगदी व्यवस्थित रीतीने सजविलेली होती. टापटीप तिला फार आवडे म्हणूनच तिची आई वत्सलाबाई देखील आपल्या एकुलत्या एक मुलीच्या त्या खोलीची जातीने काळजी घेत. परंतु आता आपली खोली पाहता पाहता योगिनीच्या नजरेसमोर मघा पाहिलेला मकरंदचा दिवाणखाना उभा राहिला. मनोमन ती या छोट्या खोलीची अन् त्या दिवाणखान्याची तुलना करू लागली. आपली खोली तिला काजव्यागत भासली. तो दिवाणखाना सूर्याइतका मोठा होता. होता होता तिच्या विचारलहरी मकरंदवर येऊन खिळल्या. ती मकरंदबद्दल विचार करू लागली. कुणालाही भुरळ पडावी असा मकरद होता. उंचनिंच शरीरयष्टीला निमगोरा वर्ण लाभला होता. चेहऱ्यावर श्रीमंतीचे अन् हुशारीचे तेज झळाळत होते. त्याच्या ललाटाचा भाग बराचसा रुंद होता. किंचित भरीव पिंगट केसामुळे

तो अधिकच रुबाबदार वाटे. बोलक्या डोळ्यांमुळे तो नकळत समोरील माणसाला आपलेसे करून घेई. त्यातील तेजामुळे त्याच्या चेहऱ्याला अधिक भव्यता प्राप्त होई.

'योगा ऽ ? कसला विचार करते आहेस ? माझं जेवण आटोपल तरी तू अजून कपडे बदलले नाहीस. चल कपडे बदल आणि झोप पाहू !' आईच्या शब्दांनी योगिनी भानावर आली. विचार तरंगांतून वर आली. 'काही नाही ग ऽ त्या छोटया आशूबद्दल...! किती बोलघेवडी अन् हुषार आहे. मला फार फार आवडली ती !' योगिनी वरकरणी खोट बोलत होती. तिच लक्ष आईकडे गेल. वत्सलाबाई डोळयांतून ओघळणारी आसवे टिपीत बाहेर निघून गेल्या. योगिनीला देखील वाईट वाटले. तिला आपल्या छोटया मनीषाची आठवण झाली. मनीषा तिच्या पाठीवर जवळ जवळ दहा वर्षांनी झाली होती. त्यावेळी वयात आलेल्या योगिनीला आपली छोटी बहीण खूप आवडत होती. खिन्न मनाने योगिनीने झोपण्याची तयारी केली.

× × × ×

गाडीतून घरी येता येता कुंद वाऱ्याच्या झुळकीबरोबर मकरंदच्या मनात योगिनीबद्दलच्या विचार लहरी संचरू लागल्या. त्याच्या नजरे-समोर ती श्वेतसुंदरी उभी राहिली. आजपर्यंत मकरन्दने खूप तरुणी पाहिल्या होत्या. कामानिमित्त किंवा अन्य कारणांनी म्हणा तो त्यांच्याशी हसला बोललादेखील होता. पण त्या पुन्हा कधीही त्याच्या मनात उगवल्या नव्हत्या. त्यांच्याबद्दलच्या पुसट विचारांना देखील त्याच्या मनात थारा मिळाला नव्हता. पण योगिनी मात्र ह्या सर्वांपेक्षा आगळी – वेगळी होती. आशूची अन् तिची अशी दाट मैत्री जमली होती की जणू पूर्वजन्मीचे संबंध ! त्याच्याबरोबर ती वागली देखील होती सौजन्याने. एरव्ही परिचारिका म्हटल्यावर प्रथमदर्शनी त्याला तिच्याबद्दल तेवढीशी आपुलकी वाटली नव्हती. आजकाल परिचारिका म्हटल्यावर सज्जन माणसाला कसला तरी वास येतो. साहजिकच आहे ते ! काही परिचारिका ह्या व्यव-सायाला आपल्या वागणुकीने कलंक लावीत असल्याची उदाहरणे

लोक प्रत्यक्ष पाहतात. म्हणूनच सुरुवातीला योगिनीबद्दल त्याचा तितकासा चांगला ग्रह नव्हता. योगिनीला प्रत्यक्ष पाहिल्यावर मात्र त्याच्या मनातील सर्व ग्रह क्षणार्धात लुप्त झाले. तिच्या सोज्वळ दर्शनाने तो हुरपला गेला. योगिनीचा गौरवर्ण, विशेषतः तिला लाभलेले स्नेहार्द्र डोळे पाहताच, पाहणाराच्या मनात चटकन् आपुलकी निर्माण होई. तिला लाभलेल्या सौंदर्यात दैदीप्यमान मंगलता होती. त्यामुळे मनोमन मकरंददेखील स्तिमित झाला. तिच्या मोकळया वागण्याने तर त्याला अधिकच आश्चर्य वाटले. कधी कोणत्या स्त्रीशी अधिक न बोलणारा तोही बोलका झाला.

तिच्या थट्टा-मस्करीत त्याने अगदी दिलखुलास भाग घेतला. विचारांच्या वेगाबरोबर गाडी कधी घरापर्यंत येऊन पोहोचली तेही त्याला उमगले नाही. घरात पाऊल टाकताच मात्र पुढील रविवारी आशूच्या वाढदिवसासाठी योगिनी पुन्हा घरी येईल ह्या खुषीत तो आत गेला.

आठवडयाचे दिवस सशाच्या वेगाने गेले तरी मकरंदला मात्र आजचा आलेला रविवार कासवाच्या गतीनेच आल्यासारखा वाटला. आज आशूचा वाढदिवस होता. दिवाणखान्यात खूप मुले जमली होती. गोपी खेळण्यांचा ढीग सारखा करीत होता. हत्ती – घोडे – वाघ – सिंह – अगदी ससा – कासवांसह सर्वजण एकत्र जमली होती. मुले आपआपसात खेळत होती. मकरंद जमलेल्या स्नेह्यांवरोबर गप्पा मारत होता. तेवढयात योगिनीचा मंजुळ आवाज कानी आला. – शहनाईसारखा !

' पार्टी सुरू होतेय – सर्व मुलांनी खेळ बंद करून आशूजवळ जमावे ! '

तिच्या हाकेनं मकरंदचे लक्ष चटकन् तिच्याकडे वेधले. गुलाबी रंगाची साडी अन् तसलाच पोलका तिने चढविला होता. आज अधिकच मोहक वाटत होती ती. बर्थ डे पार्टीची सर्व व्यवस्था गोपीला घेऊन तीच पहात होती. दिवाणखान्याच्या मध्यावर एक शृंगारलेले टेबल मांडण्यात आले. त्यावर आठ छोटया मेणबत्त्या जळणारा केक ठेवण्यात आला. योगिनीने आशूला जवळ बोलावून त्यावर फुंकर मारण्यास सांगि-

सले. आशूने एका फुंकरीसरशी त्या सर्व मेणबत्त्या विझविल्या. त्याबरोबर सर्व बालगोपाळांनी टाळ्या वाजवून 'हॅप्पी बर्थ डे !' चा जयघोष केला. त्यात निर्व्याज आनंदी सूर तरळत होते. आशूने केक कापला. पहिला घास मकरंदपुढे केला. मकरंदने प्रथम तो तुकडा आशूच्या तोंडात घातला. पुढे सर्वांना केक वाटण्यात आला. त्यानंतर फराळाची मिठाई वाटण्यात आली. मुले आनंदाने नाचत बागडत होती. आनंदाला भरते आले. त्याचबरोबर वेळेलाही. हळूहळू जमलेली मंडळी पांगू लागली. होता होता सर्वजण निघून गेली. शेवटी पाहुणी म्हणून फक्त योगिनी शिल्लक राहिली. गोपीबरोबर ती सामानाची आवराआवर करीत होती. आशु आपले नवीन खेळ पहाण्यात रंगली होती. मकरंद योगिनीजवळ जात कृतज्ञपणे म्हणाला—

'तुम्हाला फार त्रास झाला त्याबद्दल दिलगीर आहे !'

'ह्यात दिलगिरी कसली ? तुम्हीच मला बोलाविलंत ना ? आठवतं ना ?'

'होऽ! पण असं काम करायला नव्हे; नुसतं पार्टीला !' तेवढ्यात त्या दोघाना एकांत देण्यासाठी की काय, गोपी आत गेला.

'त्यात काय? घरची कामं स्त्रियांनी करणे हा धर्म आहे !' योगिनी.

'तुम्ही मागील खेपेस म्हणालात ते खरं आहे !' मकरंद विचार करीत बोलून गेला.

'कशाबद्दल बोलता आपण ?' योगिनीने आठवत विचारले.

"स्त्री शिवाय घराला शोभा नाही !' मी आज पाहिलं. तुमच्या हालचालीनं घराची अवकळा गेल्यागत भासत होती. वाटलं असा प्रसंग रोज घडावा या घरात...'

'रागावू नका. एक सांगू...त्यासाठी...'

'नाही. त्यासाठी जे तुम्ही म्हणणार आहात ते करणे शक्य नाही. मी अगतिक आहे. माझं मन तसा निर्णय घेऊ शकत नाही. मला न मानवणारी गोष्ट आहे ती. तेव्हा तुम्ही सांगा की दुसऱ्या

कोणत्या अन्य मार्गाने मी या आशूची अन् घराची देखभाल करू शकेन का ? ' योगिनीचं वाक्य तोडतच मकरंदने विचारले.

' का नाही ? आजच्या सुधारक युगात तुम्ही आया ठेवू शकता. पाश्चिमात्य पद्धतीत तिला ' गव्हर्नेस ' म्हणता येईल ! '

' पण यामुळे माझ्या मनाला शांतता लाभणार नाही. तसं असतं तर ह्यापूर्वी आपण म्हणता तशी योजना मी करू शकलो असतो. पण त्यामुळे माझ्या मुलीला आंतरिक प्रेम थोडंच मिळणार आहे ? माया केवळ पैशाने विकत घेतली जात नाही. म्हणूनच आजपर्यंत आई-वडिलांची एकपात्री भूमिका करून मी आशूला सुखात ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे ! ' मकरंदने योगिनीला उत्तर दिले.

' पण हे सारे मनावर दगड ठेवल्यागत कर्तव्य म्हणून तुम्ही करीत असताना तुमचं हृदय खरोखरच पत्थराइतकं कठोर झालं नाही म्हणजे मिळविली ! '

योगिनी बोलून गेली तिच्या त्या उत्तराने मकरंदचा मात्र तोल गेला. तो गप्प झाला. तसं पाहता योगिनीच्या बोलण्यात असत्य नव्हते. व्यवहारी जगाचे तडाखे सोसलेली जाणती स्त्री होती ती ! तिच्याहि मनात स्त्रीसुलभ विचार निर्माण होत होते. तिचे विधान ऐकताच त्यातील गूढार्थ मकरंदच्या लक्षात आला. त्याच्या कपाळावर जमलेले घर्मबिंदु पाहून योगिनी घाबरली. अन् चटकन बोलून गेली.

' आय ॲम सॉरी, मिस्टर विचारे. मी असं बोलायला नको होतं. मी तुमच्या भावनेचा अपमान केला. पण खरोखर माझा तसा हेतु नव्हता— '

' छे: छे: तस काही नाही. मी ह्यापूर्वीही तुम्हाला म्हणालोच आहे, की आपल्या मनात निर्माण होणाऱ्या विचाराना वाट करून द्यायला हवी. नाहीतर आतल्या आत ते वाट चुकतात आणि त्याचा त्रास मात्र स्वत:लाच होतो. तुम्ही म्हणता तो दाईचा तोडगा मला पटला. आशूसाठी

आ. धा. २

चालती बोलती स्त्री या घरात वावरावी हे मला पटू लागलं. आताच पहा ना – तुम्ही निघून गेल्यावर ह्या घराला अगदी अमावास्येची अवकळा प्राप्त होईल. तेव्हा यासाठी मला तुमचीच मदत घ्यावी लागेल.'

'माझी... ?'

'...म्हणजे दाईच्या बाबतीत !'

'म्हणजे ?' योगिनीने लागलीच प्रश्न केला.

'म्हणजे असं, की आशूसाठी एखादी चांगली गव्हर्नेस शोधण्याची जबाबदारी मी तुमच्यावर टाकीत आहे !'

'चालेल. मी तुम्हाला मदत करीन !' योगिनी उत्तरली.

'तुम्ही एवढी तसदी घेतलीत तर—'

'मला आशूबद्दल काहीच वाटत नाही कां ?'

'तिच्या त्या प्रश्नाने मकरंदच्या मनोसागरावर आगळयाच लाटा उभारून आल्या. नूतन सुखाची किरणे त्याला क्षणभर स्पर्शून गेली. मकरंद तिच्याकडे पाहत राहिला. तिने काम संपविले होते. पदराने तोंड पुसून झाल्यावर ती मकरंदला म्हणाली.

'बरं. – आता मी आते. सर्व काही उरकलं.'

'एवढ्या लौकर ? अन् आशूला न सांगता ? ते काही नाही. काम संपलं. आता तुम्ही माझ्याबरोबर चहा घ्यायला हवा !'

मकरंदने तिला गळ घातली. योगिनीला त्याचं मन मोडणं कठीण वाटलं. क्षणभर विचार करून ती म्हणाली—

'पण इथं नाही. तुमच्या छोटया बागेत... चालेल ?'

'भलत्याच रसिक दिसता तुम्ही. अहो मोकळ्या आभाळाच्या छायेत बसायला कुणाला आवडणार नाही ?' मकरंदने गोपीला बागेत फराळ आणायला सांगितले. तोवर योगिनी छोटया बागेत जाऊन बसली. निळ्या आभाळात तारका नुकत्याच लुकलुकत होत्या. वातावरणातील निर-निराळ्या फुलांच्या गंधाने ती पुलकित झाली. परिमळाच्या हिंदो-ळ्यात ती इतकी तन्मय होऊन बसली होती, की मकरंद तिच्यासमोर कधी

घेऊन बसला ते देखील तिला कळलं नाही. मकरंदने जेव्हा चहाची तयारी केली तेव्हा तिच्या लक्षात आलं. ' अय्या ऽ मी या वातावरणात अगदी मंत्रमुग्ध होऊन गेले होते ! '

' हो ऽ ना ! तशाच आता खाण्यात देखील व्हा ! ' असं म्हणत मकरंदने तिला फराळ सुरू करण्याचे सूचित केले. हसतच अधिक आढेवेढे न घेता तिने फराळ सुरू केला.

जवळ जवळ अबोलपणेच दोघांनी फराळ आटोपल्यावर योगिनीने सहजगत्या म्हणून मकरंदला विचारले—

' मी तुम्हाला एक विचारू का ? '

' विचारा ना. त्यात संमती घ्यायची गरज नाही. तुम्ही काही आता परक्या नाहीत ! '

' आशूच्या आईचा स्वर्गवास होऊन किती वर्षं झालीत ? '

' सात ! '

' नाव काय होतं तिच्या आईचं ? '

आता मात्र मकरंद थोडा गंभीर झाला. क्षणभर थांबून त्याने उत्तर दिले— ' मालती. '

' रागावू नका – अधिक खोलात शिरते म्हणून ! पण तिची कधी तुम्हाला आठवण येत नाही ? ' योगिनीने घाबरत विचारले.

' मिस् योगिनी— '

योगिनी अधिकच घाबरून गेली. तिने पाहिले की मकरंदचा चेहरा रागाने लालीलाल झाला होता. परंतु योगिनीची कोमेजलेली मुद्रा पाहून त्याने आपला सारा राग गिळून टाकला.

' मी अगतिक आहे – असमर्थ आहे ! ' हलक्या सुरात पुटपुटत तो मंद पावलांनी बंगलीत निघून गेला. त्याची पाठमोरी आकृती पहात योगिनी तेथेच बसून होती. मनोमन ती विचार करीत होती, की आपण उगाचच मकरंदच्या मर्मावर घाव घातला. स्वतःच्या मनाचा भारी राग आला तिला. काही वेळ तसाच विचार करीत ती आभाळाकडे पहात राहिली. आभाळाच्या गहिरतेइतकंच तिला मकरंदचं गूढ

वाटलं. थोड्या वेळाने आत जाऊन तिने आशूचा निरोप घेतला, अन् खिन्न मनानेच ती घरी परतली.

× × × × ×

•

जवळ जवळ पंधरा दिवसानंतरची गोष्ट! योगिनी आपल्या ड्यूटीवर चालली होती. तेवढ्यात मुख्य रस्त्यावर आल्यावर ऽाग ऽ ऽाग ऽ' असा तिच्या परिचयाचा आवाज आला. आवाजाबरोबर तिच्या-समोर गाडी थांबली. गाडीतून आशु लगबग उतरून धावत तिच्या कमरेला बिलगत 'आंटी ऽ आंटी ऽ' करीत तिला साद घालू लागली आशूच्या दृढ मिठीत योगिनीला एक सुखद संवेदना जाणवली.

'आंटी ऽ तू इतके दिवस कुठे होतीस? मला तुझी रोज आठवण होई. म्हणून शेवटी मी पपांना तुझ्या घरी नेण्याचा हट्ट धरला.'

'आशु अगदी खरं सांगते आहे. मी खूप समजाविले तिला. पण माझं ऐकेल तर ती आशु कसली? म्हटलं चला! तुम्हीही आमच्यावर रागावला असाल तर जाऊन तुमचा राग काढावा!' इतका वेळ संभाषणात भाग न घेतलेला मकरंद एकबार योगीनीच्या नजरेस नजर भिडवीत बोलून गेला.

'छे:! मला बाई कसला आलाय राग! पण फुरसतच मिळाली नाही! अगदी खरं सांगते—'

'आशु ऽ अगदी खोटं बोलते आंटी!'

'नाही हं ऽ डॅडी! माझी आंटी कधी खोटं बोलणार नाही.'

'वा ऽ ग वा – म्हणजे मी खोटं बोलतो तर? बरीच ग ऽ तुझी आंटी – नाकामागून आली अन् तिखट झाली!'

मकरंदच्या शेवटच्या म्हणीने मात्र योगिनी देखील मोकळी हसली.

'आंटी तू कुठे निघालीस?' आशूने योगीनीचा बटवा ओढत विचारले.'

'ड्यूटीवर – हॉस्पिटलमध्ये!' योगिनी उत्तरली.

'तर मग आम्ही भलत्याच वेळी आपणाकडे आलो! मला वाटलं या आठवड्यात तुमची 'डे' असेल.'

'डे'च होती खरी. पण एक नर्स अचानक सुट्टीवर गेल्यामुळे तिची नाईट मला करावी लागतेय! पण तुम्ही चला ना घरी. आशु! चल आमच्या घरी!'

'छे: छे: तसं नको. तुम्हाला उगाच उशीर कशाला?' मकरंद.

'अहो पण तुम्ही आशूला घेऊन एवढे मुद्दामहून घरी आलात, अन् मी ड्यूटीवर जावं हे शोभेल का मला?' मकरंदकडे पहात योगिनीने विचारले.

'आज मुद्दामहून आलो. काय आशु? – पुढे बोलावून येऊ. त्यात काय मोठसं?'

'ते काही नाही. आता आला आहात, तेव्हा गरिबाची झोपडी पाहून जायला हवं!'

'हे बघा! उगाच असले शब्दच्छल करून वादाची भिंत उभी करू नका. तुमचं कर्तव्य काय, याची आम्हाला जाणीव आहे. तेव्हा आमच्या पाहुणचारापायी आम्ही तुमच्या सेवाधर्माला बुडवावे हे आपल्याला पटत नाही. अहो तुम्हाला या आशूला भेटायचं होतं – तुम्ही भेटलात – बस्स ... आशु खूष! काय आशु? आंटी तुला भेटली ... तू खूष ना?' मकरंदने समेट केला.

'शी बाई, तुम्ही घरी यायला अन् माझी पाळी तीच् रहायला कशी मेली एक गाठ पडली!' योगिनी वैतागली.

'अहो, त्यात काय एवढं? आयुष्यात नेहमी अशीच चुकामूक घडते. मन काही एक योजतं, अन् दैव – कान नाहीतर नाक पकडून – दुसऱ्या दिशेने घेऊन जाते. जगाचा नियमच होऊन बसलाय हा!'

याच्या विचार शलाकांनी योगिनी भारावून 'गेली. किती विचारवंत होता तो!' तिला त्याचे विचार पटले. ती बोलून गेली.

'मी ड्यूटीवर जाऊ तर?'

'आ ना आंटी, बेलाशक. पण आंटी, तुला ऑफ असेल तेव्हा आमच्या घरी ये हं ऽ! मला आता सुट्टी पडली आहे.' आशु म्हणाली.

'अच्छा, मग मला बुधवारी ऑफ आहे. तेव्हा येईन हं तुझ्या-कडे.' असं म्हणत योगिनीने आशूचा गोड पापा घेतला. ती जायला निघणार असं वाटून मकरंद तिला म्हणाला--

'मी तुम्हाला एक काम सांगितलं होतं. त्याचं काय झालं ?'

'कोणतं बरं ?'

'गव्हर्नेसबद्दल !'

'अच्छा. ते ना ? माझ्या लक्षात आहे. चांगली गव्हर्नेस मिळताच घेऊन येईन तुमच्याकडे ! बरं चलते मी. अच्छा आशु 'टा ऽ टा ऽ' असं म्हणत योगिनी निघून गेली.

मकरंद मात्र घरी येईपर्यंत योगिनीबद्दल विचार करीत होता. मनोमन त्याला वाटे, योगिनीला भरपूर पगार देऊन तिलाच आशूची गव्हर्नेस केली तर काय हरकत आहे ? पण लागलीच काचेवरील पावसाचे पाणी वायपरने पुसले जावे, तद्वत ते विचार पुसले जात. पुन्हा तो म्हणे छेः छेः ! आशूची गव्हर्नेस म्हणून योगिनीची नियुक्ती म्हणजे योगिनीचा केवढा मोठा अपमान होता. आपल्या मनात अशा प्रकारची कल्पनाच कशी रुजली ह्याबद्दल त्याला खेद वाटला. पण नंतर त्याला कळून चुकले की, आपणालाही योगिनीच्या सहवासाची आसक्ति जडलीय. तिच्या सोज्वळ मूर्तीने – आशूबद्दलच्या जिव्हाळ्याने त्याला तिची भुरळ पडली होती. त्याला वाटले आपण हळू हळू योगीनीच्या प्रेमात तर पडत नाही ना ? विजेगत विचार चमकला. आंतरिक अन् बाह्य मनाचा गडगडाट झाला. मकरंद जणू आपल्या मनाला मनो-मन सांगू लागला – 'नाही ऽ नाही ऽ! तुला प्रेम – लग्न ह्या सर्व गोष्टी वर्ज्य आहेत. याबाबत तू शापित आहेस......'

● ●

: २ :

' मालक जेवणाची ताटे मांडलीत. '

गोपीनं दिवाणखान्यात येऊन मकरंद अन् आशूला सांगितले. आशू छोटे गोष्टीचे पुस्तक चाळण्यात गर्क होती.

' आशु बेटा, जा जेवण कर अन् मग वाचत बैस जा ! ' मकरंदने आशूच्या हातून अलगद पुस्तक काढून घेतले.

' आणि डॅडी तुम्ही ? तुम्हाला नाही जेवायचं ? ' आशूचा प्रश्न.

' मला भूक नाही बेटा. मला आता एका महत्त्वाच्या कामाकरिता बाहेर जायचे आहे. रात्री उशीर झाला तर वाट पाहू नकोस हं ऽ ! ' असं म्हणत मकरंदने तिचा गोड पापा घेतला.

' अहं ऽ डॅडी ! तुम्ही हवेत बरोबर; नाहीतर मी नाही जेवणार ! ' आशूने हट्ट धरला.

' असं काय बरं मालक... बाहेर जायला निघालात ? जेवणाच्या वेळेला अन्न टाकून जाणं चांगलं नाही. दोन घास खाऊन जा. आशूलाहि बर वाटेल ! ' गोपीने मध्येच तोंड घातले. त्या वृद्धाला चूप करणे अन आशुला निराश करणे मकरंदला बरे वाटेना.

खरं म्हणजे मकरंद जेवायच्या परिस्थितीत नव्हता. तरी देखील त्याने आशूबरोबर कसेबसे दोन घास गिळले. माणसाच्या मनाला एखादी चिंता त्रस्त करीत असली म्हणजे अन्नपाणी गोड लागत नाही. त्याच्या साऱ्या इच्छाशक्ति त्या व्यग्र चिंतेच्या जात्याखाली भरडून निघतात.

गाडी स्टार्ट करता करता आशुला ' टा ऽ टा ' करीत मकरंद निघून गेला. तो मध्यम वेगाने गाडी चालवीत होता... रस्ता तसा निर्मनुष्य अन् निर्वदळीचा होता. तरी देखील त्याला गाडी जोरात हाकावी असं वाटत नव्हतं. माणसाचं मन उल्हसित असलं म्हणजे त्याच्या क्रिया-शक्तींना स्फुरण येतं, त्याला प्रफुल्लित होता येतं, पण योगिनीला सोडून

घरी येताच मकरंदला मिळालेल्या तारेमुळे त्याच्या प्रफुल्लित भावनांवर जडता आली होती. एखाद्या फुलावर जळता निखारा पडावा तद्वत त्याच्या प्रमुदित मनावर त्या तारेमुळे विकलता आली होती. रात्रभर तो विचार करीत होता. सकाळी तो नुसता कारखान्यातून राऊंड करून घरी आला. आता नाइलाजास्तव आशूसाठी दोन घास खाऊन तो बाहेर पडला होता. • त्याला आलेलं पत्र विश्वास सातपुते ह्याचं होत.

विश्वास मकरंदचा कॉलेज-मित्र होता. परंतु पदवीपरीक्षा पास झाल्यानंतर विश्वासला नोकरी पत्करावी लागली होती. विश्वास सातपुते येरवड्याच्या तुरुंगात प्रमुख जेलर होता. त्यानेच मकरंदला तार केली होती. प्रथम ती तार वाचल्यावर विंचू डसल्यागत मकरंदच्या अंगावरून झिणझिण्या गेल्या. गाडी हाकता हाकता तारेतील मजकूर त्याला आताही आठवला. त्या आठवणीने त्याच्या अंगावरून भीतीची एक लकेर लहरून गेली. कारण मालतीने त्याला भेटायला बोलाविले होते. आशूला सुट्टी पडणार आहे, ह्याची तिला कल्पना होती. विलासने ' माझ्यासाठी तरी ये ' म्हणून आर्जविले होते. परंतु मालतीला भेटणे त्याला आवडत नव्हते. तरी देखील तिला भेटायला हवे हे त्याला पटत होते.

मालती येरवड्याच्या तुरुंगात कैदी म्हणून पडली होती. तिला चौदा वर्षं जन्मठेपेची शिक्षा झाली होती. आजपर्यंत सात वर्षं तिने काढली होती. अजून सात वर्षं उरली होती. ती आपल्या अपराधाची शिक्षा भोगीत होती. मकरंदने आशूला मात्र ' तिची आई मेली ' म्हणून सांगितलं होतं. कारण मकरंदचा विश्वास होता की, काही झाले तरी मालती तुरुंगाबाहेर जिवंत कधीच येणार नाही. ती त्या अंधार कोठडीत झुरून मरून जाईल. मालतीबद्दल विचार करता करता त्याच्या डोळ्यासमोर योगिनीची मूर्ती उभी ठाकली. त्याला वाटले, ' योगिनीला हे रहस्य समजले तर ? ' त्याच्या मनात कंप निर्माण झाला. त्या प्रश्नाभोवती त्याचं मन पिंगा घालू लागलं. ' जर हे सारं योगिनीला कळलं

तर ती आपला तिरस्कार करील का ? आपल्यापासून दूर जाईल का तिच्या मैत्रीत खंड पडेल का ?' निश्चल पाण्यात एखादा दगड टाकल्यावर वलयामागून वलये निर्माण व्हावीत, तद्वत मकरंदच्या मनात प्रश्न दाटले. ह्या विचार-तरंगांत पोहत तो तुरुंगापर्यंत कधी येऊन पोहोचला ते त्याला समजलं देखील नाही.

विश्वास त्याचीच वाट पाहत होता. मकरंदला पाहून पुढे येऊन त्याने हस्तांदोलन केले. विश्वास त्याला आपल्या कचेरीत घेऊन आला. स्थानापन्न झाल्यावर मकरंदने भीतभीत सबंध खोलीभर चौफेर नजर फिरविली. मग समाधानाने तो बोलू लागला.

'विश्वास ! काय झालं ? तार करण्याइतपत काही घडलं का ?'

'होय ! मालती वहिनीची तब्येत बिघडलीय ! ' विश्वास.

'मग – मी काय करू म्हणतोस— ? '

'तिला आशूला पाह्यचयं आहे. तिने तसा ध्यास घेतलाय– '

' नाही, नाही. हे कदापि शक्य नाही. विश्वास ! मी तिची सावली देखील आशूवर पडू देणार नाही. आशूचं नख देखील तिच्या दृष्टोत्पत्तीस पडणार नाही ! ' मकरंद लाल झाला.

'पण मकरंद विचार कर... '

' तिच्या अविचाराचा मी विचार करू ? निर्दयीला दया दाखवू ? हे कदापि शक्य नाही, मित्रा ! ' विश्वासला पुढे बोलू न देता मकरंद म्हणाला.

' बरं बुवा ! ते सारं तिला सांग चल ! '

असं म्हणत विश्वासने मकरंदला नेऊन मालतीच्या बंद कोठडीच्या समोर उभं केलं. पाहरेकऱ्याला आदेश दिला. टाळे उघडल्यावर तो मकरंदला घेऊन आत गेला. आत प्रवेश करताच समोर मालती येऊन उभी ठाकली तिच्या अंगावर तुरुंगातील मलीन, बेढब वस्त्रे होती. केस विस्कटलेले, चेहरा मलूल, डोळे जणु दोन खोबणीत ठेवलेल्या पिचक्या गोट्या वाटत होते. जणु ओबडधोबड वस्त्रे लपेटलेला हाडांचा सापळाच त्याच्यासमोर उभा होता. मकरंद क्षणभर

तिला पाहत राहिला. मनोमन तो विचार करीत होता. ज्या वेळी मी प्रथम हिला पाहिले त्यावेळी ही कशी दिसत होती ? मूर्तिमंत सौंदर्याची पुतळी. चेहऱ्यावर पौर्णिमा, डोळ्यात तेजाचा नंदादीप, अंगप्रत्यंगात तारुण्य साठविलेली मालती कुठे... अन आताची मालती कुठे ? ' त्यानंतर आठवणींची एकच गर्दी त्याच्या मनःपटलावर उभारून आली. मालतीबरोबरचे छोटे मोठे प्रसंग त्याच्या नयनचक्षूसमोर उभे टाकले.

' हे बघा, माझ्या आशूला एकदा डोळे भरून पाहायची आहे मला! ' मालतीच्या करुण शब्दांनी मकरंद भानावर मात्र आला. तिच्या शब्दांतील करुणता त्याच्या हृदयाला पाझर फोडू शकली नाही.

' ते कालत्रयी शक्य नाही ! ' मकरंदचा निश्चयी सूर.

' पण कां ? '

' कारण मी आशूला सांगितले आहे की ' तुझी आई मेली ' म्हणून! '

' पण मी तर जिवंत आहे ! ' मालती लेकमली.

' कांही माणसे जिवंत असून देखील मेल्यागत असतात. लोकांना त्यांच्याबद्दल काडीचंही सोयरसुतक नसतं ! '

' पण माझ्या भावना जिवत आहेत. ममता जिवंत आहे. माझ्या हृदयात अपत्य प्रेमाचा ओलावा आहे— '

' असली भाषा तुझ्या तोंडी शोभा देत नाही. तुझ्या पापाचा वास देखील त्यातील एकाही शब्दास शिवता कामा नये. जिवंत मेल्यागत ह्या साऱ्या भावनांची तुला हत्या करायला हवी ! '

मालती वंचित होऊन त्याच्याकडे पाहत होती. तिच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहू लागल्या. ह्या अश्रूंचीहि तमा न धरता मकरंद पुढे बोलू लागला—' ह्या खेरीज तुला कोणताहि रस्ता नाही. परमेश्वर ह्याच जन्मी तुला केलेल्या पापाचे प्रायश्चित देत आहे. करावे तसे भरावे, ही जगाची रीत आहे. तुझ्या रोमारोमात ममता – मांगल्य – वासल्य नसून विष आहे विष ! समजलीस ? '

मकरंदच्या संतप्त शब्दांची फेर मालतीला सहन होईना. तिने कानांवर हात ठेवले. तरीहि मकरंद रागाने खूप खूप बोलत होता. त्याचे

ते क्रूर शब्द ऐकता ऐकता मालती बेशुद्ध झाली. मूर्च्छा येऊन ती जमिनीवर कोसळली. तिला आधारही न देता मकरंद लांब पावले टाकीत बाहेर निघून आला. विश्वासने पाहरेकऱ्याला डॉक्टर बोलाविण्यास फर्माविले. मालतीला शुद्ध येईपर्यंत विश्वास तेथेच होता. डॉक्टरांनी तपासणी केली. विश्वासला रिपोर्ट देऊन ते निघून गेले. विश्वास आपल्या खोलीत परतला. मकरंद त्याच्या टेबलावर डोकं टेकून बसला होता. मालतीच्या भेटीनं अन मागणीनं तो त्रस्त झाला होता. त्याच्या डोक्यात झिणझिण्या उठल्या होत्या. मालतीचा त्याला राग आला होता.

'वहिनीला एकदा आशूला भेटवलं असतं तर बरं झालं असतं, मकरंद !' विश्वासच्या शब्दांनी मकरद भानावर आला. एकवार विश्वासकडे पाहत तो हलकेच म्हणाला—

'नाही, नाही. विश्वास ! तुला कळत नाही मित्रा ! एकदा तिने आशूला पाहिले म्हणजे सुप्तावस्थेतील वात्सल्याची वेल बहरून येईल. ममतेला कोंब फुटतील. ती नेहमी तिला पाहण्याचा हट्ट धरील. तृप्तीने तृप्ती वाढत जाते माणसाची. शिवाय आशूच्या मनावर तिची आई मेली असा जो ठसा उमटला आहे त्याचे काय ? तिची आई जिवंत आहे, आणि ती सुद्धा तुरुगात ! हे जर तिला कळलं, तर त्या बालमनात नाना बऱ्यावाईट कल्पना साकार होऊन समूर्त होतील !'

'पण मकरंद डॉक्टरांचा रिपोर्ट आहे की ती आता अधिक काल जगू शकणार नाही !' विश्वास.

'त्याला मी काय करू ? भावनेच्या भरात वाहत जाऊन माझ्या मुलीचं जीवन वाया घालवू ? आशूचं भवितव्य कलंकित करण्याचं पातक मी करणार नाही !'

'मग एक काम कर !'

'कोणतं ?'

'नाही म्हणू नकोस. माझं ऐक !'

'बोल तर खरं... ?'

'एक दिवशी आशूला तू माझ्याकडे पाठवून दे. मी बोलून का होईना, वहिनीला आशु दाखवीन. बिचारीची शेवटची इच्छा असेल; होऊ दे पुरी ! '

'पण... '

'ऐक तर पुढे !– मात्र ही गोष्ट आशूच्या मुळीच लक्षात येणार नाही असं मी तुला वचन देतो ! ' काही काल विश्वासच्या बोलण्यावर विचार करीत मकरद म्हणाला–

'पण वात्सल्यापोटी मालतीनेच आशूला काही कमी जास्त सांगितलं तर ? '

'नाही मकरंद; तसं कधीच घडणार नाही. विश्वास ठेव माझ्यावर !'

'बघ ? '

'मकरंद ! आशूचं निर्मळ आयुष्य मी कधी गढूळ होऊ देईन असं तुला वाटतं का ? पण वहिनीचं तुटणारं हृदय देखील आज सात वर्षं पाहतोय मी ! मला बघवत नाही, म्हणून त्रयस्थासारखी ही माझी खटपट आहे. समजलं ? तू निश्चिंत रहा ! आशूच्या भेटीला मी कसलेहि गालबोटं लागू देणार नाही. समजले ? ' विश्वासने गंभीर शब्दांत सांगितले.

'अच्छा विश्वास ! मी तुझ्यावर सारं सोपवीत आहे. ' असं म्हणून मकरंदने विश्वासचा निरोप घेतला.

आठवड्यानंतर खरोखरच आज सकाळी विश्वास आपली जीप घेऊन मकरंदच्या घरी हजर ! मकरंदनेहि आशूला त्याच्याबरोबर पाठविले. विश्वासकाका आशूला तसा परिचित होता. पण, ती त्याच्या घरी कधी गेली नव्हती. मकरंदलाही आज कारखान्यात महत्त्वाचे काम निघाले होते. त्याने विश्वासकडे अर्थपूर्ण कटाक्ष टाकून आशूचा निरोप घेतला.

संध्याकाळी विश्वासने आशूला घरी आणून सोडले तरी देखील मकरंद घरी परतला नव्हता. वाट पाहूनही मकरंद परतला नाही तेव्हा गोपीकडे निरोप ठेवून अन आशूला 'टा ऽ टा ' करून विश्वास निघून गेला. आशु मात्र आपल्या डॅडीची वाट पाहत बसली होती. विश्वास

काकाच्या घरच्या गोष्टी गमती-जमती ती गोपीला सांगत होती. तेव-ढ्यात मकरंद आला. ' डॅडी – डॅडी ! ' करीत आशूने मकरंदला मिठी घातली; आणि आपला आजचा दिवस कसा गेला त्याचं ती रसभरित वर्णन करून सांगू लागली. सांगता सांगता शेवटी मात्र ती म्हणाली–

' डॅडी ऽ ! पण तिथं ना... एक भयंकर बाई पाहिली मी...! '

तिचे शब्द ऐकताच मकरंद रागाने लालीलाल झाला.

' आशू ऽ ! तू त्या बाईला पाहिलेसच का ? '

' डॅडी ऽ ! मी काही मुद्दामहून पाहिले नाही. काकांच्या दीपकबरो-बर मी चेंडूने खेळत होते ना ? तेव्हा चेंडू गेला तिकडे. तो आणायला मी गेले, तेव्हा पाहिले. '

' पण हे चांगलं नाही. अशा बायकांशी बोलणं देखील वाईट असतं ! '

' तुम्ही ओळखता पपा तिला ? '

' नाही. पण तू तिला अगदी जवळून पाहिलेस का ? '

' नाही डॅडी. मला पाहताच ती बाई पळून गेली, रडत रडत. मला घाबरली ती ! काकांना मी म्हणाले देखील की ' काका ! तुम्ही जेलर असून तुम्हाला कोणी भीत नाही. पण मला बघा, ती बाई भिऊन पळाली.' तशी जेलर काकांचा दीपक मला सांगू लागला की, ' ती भिऊन नाही पळाली. ती बिचारी म्हणे आपल्या मुलीच्या आठवणीने रडत असते. माझ्याएवढी होती म्हणे तिची मुलगी... '

ते सारे ऐकून मकरंदच्या डोळ्यात अंगार फुलले. मनातील क्रोध डोळ्यांवाटे बाहेर पडू पाहत होता. त्याचा तो अपरिचित बदलता अव-तार पाहून आशु मात्र बोलायची गप्प झाली.

' जेलरकाकांचा दीपक खोटं सांगत होता. – तुझी समजूत घालण्या-साठी. समजलं ? जा आता जाऊन झोप जा ! रात्र फार झालीय. आशूने ताडले, की डॅडींच्या आवाजात थोडासा राग आहे. अधिक न बोलता ती आज्ञाधारक मुलगी डोळे किलकिले करीत निघून गेली. आशु निघून

गेला पण मकरंदच्या मनातील विचार अजूनही तेथेच होते. विचा-रांचा प्रक्षोम दाटला होता. उद्वेगाच्या ज्वाळांत अजूनही तो जळत होता. आठवणींनी पेटत तो स्वतःशीच बोलू लागला.

' छेः. आपणच मूर्ख आहोत! आशूला उगाच विश्वासबरोबर पाठवून दिली. आशूला जर कळले, आपली आई जिवंत आहे – ती एक खूनी स्त्री आहे – तर त्या बालमनाला काय वाटेल ? तिच्या बालमनावर अशा प्रकारचा ठसा उमटला तर ? मग आपल्याबद्दल तिचं काय मत होईल ? ती म्हणेल, 'आपल्यावर इतकं अपार प्रेम करणारा आपला पिता अविश्वासी आहे; खोटारडा आहे.' आई खूनी अन् बाप विश्वासघातकी म्हणून ती दोघांचाहि तिरस्कार करील. आणि तो ठसा जो उमटला जाईल तो अगदी कायमचा ! तिचं भावी आयुष्य फुकट जाईल. जीवन-मार्गावर मागे-पुढे फक्त अंधार दाटलेला असेल. त्या अंधारातून ठेचाळत, चाचपडत, रक्तबंबाळ होत तिला मार्ग आक्रमावा लागेल. खूप वेळ बिछान्यावर पडल्या पडल्या मकरंद त्याच विचारचक्रात घुटमळत होता. त्याला झोप येत नव्हती. आशूला झालेले मालतीचे दर्शन त्याला सतावीत होते. तेवढ्यात गजराच्या घड्याळाने दहाचे टोले दिले. मकरंद बिछान्यावरून उठला. त्याने समोरचा रेफिरजरेटर उघडला; आतून व्हिस्की अन् सोड्याची बाटली काढली. ग्लास घेतला. दोन तीन पेग एकाच वेळी ग्लासांत ओतून त्याने एका दमात ते पेग पोटात ढकलले.

त्या उन्मादामुळे त्याच्या मनावरील ताण किंचित कमी होत होता. त्याने सिगारेट शिलगावली. तिचे झुरके मारीत मनातील विचार दूर घालविण्याचा तो प्रयत्न करीत होता. पुन्हा त्याने ग्लासात दोन पेग ओतले. सिगारेटचे झुरके मारीत तेही त्याने खाली केले. मग रीता ग्लास खाली ठेवीत बिछान्यावर स्वतःला टाकून, उशीत तोंड खुपसून तो विचार करूं लागला. तेवढ्यात टेलिफोनची घंटा वाजली. जडपणे मकरंद उठला. अन् रिसीव्हर कानाला लावून लागलीच मोठ्यांदा म्हणाला.

' हॅलो ऽ ! दुसऱ्या टोकाकडून आलेल्या आवाजाने मात्र तो सर्द झाला. कारण तिकडून योगिनी बोलत होती.

'हॅलो ऽ ! कोण, आशूचे डॅडी ना ? आशु काय करतेय — ती आज आपल्या काकांकडे जाणार होती ना ?

' हो जाऊन आली देखील ! '

' बरं, तिला म्हणावं — ' मी उद्या सकाळी तिला भेटायला येतेय ! हं ऽ अच्छा ! गुड नाईट ! ' तिने टेलीफोन बंद केला. मकरंदने बऱ्याच वेळाने रिसीव्हर खाली ठेवला. तो हलक्या फुलक्या वातावरणात जड-तेने फिरत होता. त्याला आता विचार पडला, हा प्रताप व्हिस्कीचा आहे, कां योगिनीचा ? खरच मदिरेची नशा श्रेष्ठ का मदिराक्षीची हे जाणणे कठीण गोष्ट आहे !

ह्यापूर्वी मकरद मालतीच्या विचारात गुरफटला होता. परंतु आता त्याचे संपूर्ण विचार योगिनीवर केंद्रित झाले. त्याच्या नयनपटा-वरील तुरुंगाच्या गजाआड उभी असलेली दैन्यावस्थेतील मालतीची मूर्ती पुसली गेली. त्या ऐवजी आपल्या दिवाणखान्यात मधोमध उभी असलेली श्वेतांबरी योगिनी उभी राहिली. तो विचार करीत होता तेवढयांत टक् टक् झाली...

" दरवाजा उघडा होता. मकरंद पलंगावरून कोण येतयं ते पाहत होता. दरवाजा उघडून आत आलेली व्यक्ती पाहून त्याला खूप आनंद झाला. कारण ती योगिनी होती. पाढऱ्या शुभ्र पोषाखात ती एखाद्या परीसारखी भासली. ' योगा ऽ योगा ऽ ' करीत मकरंद हलकेच पलंगा-वरून उठला अन त्याने जाऊन तिला आपल्या कवेत सामावून घेतले. मकरद तिला अधिकाधिक घट्ट बिलगत होता. ती ' मकरंद ऽ मकरंद ऽ ! ' म्हणून हलकेच साद घालीत त्याला कुरवाळीत होती. आपले दोन्ही हात तिने त्याच्या पाठीवरून फिरवीत त्याच्या गर्दनी-जवळ आणून थांबविले, न् मान वर करून सलज्ज त्याच्याकडे पाहिले. मकरंदने तिचा उजळ चेहरा आपल्या दोन्ही हातांच्या ओंजळीत धरला. एखादे कमलपुष्प हाती धरल्यागत योगिनीचा चेहरा त्याला भासत होता. तिच्या श्वासोच्छवासात त्याला जणु काय पारिजातकाचा उन्माद भासला. त्याच्या शरिरावरून एक प्रकारची रोमांचकारी लहर सणसणून गेली.

त्याने हलकेच आपले ओठ तिच्या ओठांवर टेकले. पक्व आम्रफल चोखावं तसे एक – दोन – अनेकदा तो तिचे ओठ चोखू लागला. तृप्तीने तृप्ती वाढत गेली. योगिनीला तसेच कवेत करून मकरंद पलंगाकडे आणू लागला. त्या वेळी योगिनीच्या चेहऱ्यावरील इंद्रधनुष्यी लज्जेचे भाव पाहून तोहि लाजला. परंतु त्याला योगिनीची दूरता व्याकुळ करू लागली. त्याने हलकेच जाऊन तिचा पदर खेचला. तिची छाती उघडी पडली. तिचा उघडा वक्षभाग पाहून त्याच्याही मनाची स्थिती उत्कट झाली. शेवटी तिच्या कमरेत हात घालीत त्याने तिला पलंगावर घेतले. ती लाजत होती, म्हणून त्यानेच तिच्या अंगावरील कपडे दूर केले. यावेळी 'शी!' करीत योगिनीने डोळे मिटून घेतले. तिची ती कृती फार आवडली त्याला. त्याने तिच्या अंगावर रेलत तिच्या दोन्ही डोळ्यांची पटापट चुंबने घेत पुन्हा तो तिच्या ओठांकडे वळला आणि मग... ती अन् तो एकरूप झाले..."

मध्यरात्री अचानक मकरंदला जाग आली. त्याने डोळे उघडले, अन् भिरभिरत चारी बाजूला पाहिले. शेवटी सारा प्रकार त्याच्या लक्षात आला. योगिनीबद्दल त्याला स्वप्न पडलं होतं. स्वतःशीच हसत तो पुन्हा झोपी गेला.

सकाळी मकरंद ताजी वर्तमानपत्रे चाळीत होता. गोपी आत नाश्ता तयार करीत होता. तेवढ्यात मकरंदला कुणाची तरी चाहूल लागली. परंतु अधिक वेळ त्याला कोड्यात राहावे लागले नाही. कारण बाहेरून योगिनी 'आशु ऽ आशु ऽ ऽ' अशा हाका मारीत आत आली.

'गुड मॉर्निग !'

'गुड मॉर्निग !' योगिनीच्या प्रफुल्ल सौंदर्याचा आस्वाद घेत मकरंद उत्तरला.

'आशु कुठाय ?'

'बहुदा झोपली असेल !'

' आश्चर्य आहे ! रात्री फोन केला तेव्हा झोपली होती. आता फोन केला, तेव्हा देखील झोपली आहे ! रात्रंदिवस तिला झोपवूनच ठेवता वाटतं ? '

' मग काय करणार ? तिला वाटते तेव्हा उठते – वाटते तेव्हा झोपते ! सध्या शाळेला सुट्टी आहे ! मकरंदने अधिक माहिती दिली.

' परतु जास्त झोप चागली नाही. त्याने सुस्ती येते आणि आळशीपणाची सवय जडते ! '

' नर्स कम डॉक्टर आहात तुम्ही ! बसा तर ! गोपी, ऽ आण-खीन एक ट्रे आण ऽ ! ' त्याने घरात गोपीला आवाज दिला.

' छे: छे: ! नाश्ता नको. मी घरून करून आलेय ! ' योगिनी.

' इथे अजून देखील तुम्हाला परकेपणा वाटतो का ? ' मकरंद हलकेच म्हणाला.

' तुमच्याकडे पाहिल्यावर तुम्ही विव्हलतेचे स्वानुभव अनुभवले असतील असं वाटत नाही ! हे सुख हा ऐषआराम, हे धन, ही प्रतिष्ठा, आशूसारखी गोड छोकरी ! कोण्या गोष्टीची कमतरता आहे तुम्हाला ? – ' परतु ती हे ऐकवत असता मकरदच्या चेहऱ्यावरील गभीरता खूप गडद झाली. ललाटावर आठयांचे जाळे पसरले. योगिनीला स्वतःचा राग आला. तिला मकरदच्या व्यक्तिगत विचाराना आपण उगाच हात घातल्यासारखे वाटले. मग न राहवून ती पुन्हा म्हणाली–

' आय ऍम सॉरी ! भावनेच्या भरात काय बोलते ते माझं मलाच कळत नाही. तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. '

' अहो पण त्यात काय खोट आहे ? योगिनी, सारी सुख दासी-प्रमाणे माझ्यासमोर उभी असूनही मी सुखी नाही. माझ्या मनाला शांती नाही. चहूंबाजूच्या सुखरूपी वणव्यात सापडलेल्या पाखरागत स्थिती झाली आहे माझी ! ' योगिनीला मकरदच्या आतरिक बोल-ण्याचा उमाळा आला. ती काहीतरी बोलणार तेवढ्यात आशू अन गोपी तेथे आली.

श्रा.-धा. ३

'अरे आशु बेटा ऽ चल, चल ! नाश्ता कर पाहू ! अन लौकर आंघोळ आटोपून घे ! आज मी तुला फिरायला घेऊन आणार आहे.' आशूला योगिनीबरोबर फिरायला जायला मिळणार ह्या कल्पनेने तिने जलदीने नाश्ता केला. खेचतच तिने गोपीला बाथरूमकडे नेले. मकरंद अन योगिनी पुन्हा दोघंच दिवाणखान्यात होती. वातावरणात नीरव शांतता होती.' ती शांतता असह्य होऊन की काय मकरंदने योगिनीला सहज म्हटले–

'कसला विचार करताय एवढा ऽ ?'

'करतेय एका गोष्टीचा !'

'कोणत्या ?'

'सांगितल्यावर रागावणार तर नाही ना ?'

'मी आणि तुमच्यावर रागावणं, कधी तरी शक्य आहे का ?'

'तरी देखील...'

'अगदी कोणताही किंतु मनात न बाळगता खुशाल सांगा... बस्स ?' असं म्हणून तो हसला.

'तुम्हाला आत्मशांती हवी आहे ना ? तुम्ही शक्य तो लवकरात लवकर विवाहबद्ध व्हा !'

योगिनीचे शब्द मकरंदला बाणासारखे विव्हल करून गेले. त्याच्या चेहऱ्यावर असंतोषाचे जाळे पसरलेले पाहून तिला वाटले की पुन्हा एकदा आपण नको ते बोलण्याचा गुन्हा केला.

'योगिनीबाई ऽ ! तुम्ही म्हणता ते अगदी योग्य आहे. मलाही तसंच वाटतं ! पण एखादी कुमारिका ह्या परिस्थितीत माझ्याशी लग्न करावयास तयार होणं कसं शक्य आहे ?' मकरंद अगदी हसत उद्गारला.

'कां ? पतीला लागणारे सर्व गुण आपणांत आहेत ! ऐश्वर्य–प्रतिष्ठा–मान-मर्यादा–स्वरूप–गुण सारं काही आहे ! हृदयदेखील विशाल आहे तुमचं ! अगदी आभाळासारखं !'

' अहो ह्या साऱ्या काव्यमय कल्पना ! परंतु मला माझी सहधर्मचारिणी अशी पाहिजे की तिला माझ्या ऐश्वर्यापेक्षा आशु अधिक मोलाची वाटावी. माझ्या सहानुभूतीचा अधिक विचार करणारी ती हवी .. '

बोलता बोलता मकरंद थांबला. त्याला योगिनीच्या नयनात काहीतरी झळाळताना दिसले. त्याने ते अधिक पाहण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मान खाली घालत ती बोलू लागली.

' आपले विचार योग्य आहेत. सावत्रपणाचा शाप एकदा का जडला म्हणजे संसाराला कीड लागेल; आशूचं भविष्य धोक्यात येईल ! '

' म्हणूनच मी या गोष्टीचा विचार करीत नाही. मनात येतं, जी कुणी येईल ती स्वतःच्या स्वार्थासाठी. माझ्या दुःखी मनावर ती काय मलमपट्टी करणार ! '

' आणि जर कुणी हृदयावर मलमपट्टी करणारी भेटली तर ? '

' तर लागलीच लग्न ! ...पण तुमच्या सल्ल्याने ! ' ह्यावर दोघंही जण मोठमोठ्याने हसू लागली. तेवढ्यात आशु तयार होऊन आली. योगिनीने मकरंदचा निरोप घेतला व ती आशुबरोबर चालू लागली. आशु अन् योगिनीला तसे एकत्र पाहून मकरंदच्या हृदयातील समाधान दुथडी भरून वाहत होते. मनात हर्षाचं चांदण फुललं होतं !

× × × ×

आज मकरंद आशूसह आपल्या घरी येणार म्हणून योगिनीला अगदी सकाळपासून आनंद झाला होता काल संध्याकाळी तिने फोनवरून मकरंदला तसा निरोप दिला होता. मकरंदने प्रथम खूप कारणे दाखविली होती. पण योगिनीने हट्टाचा आग्रह धरला होता. मग मात्र तिचा गोड आग्रह त्याने मानला होता. आज सकाळी तिने आपले केस धुतले होते. आपली खोली टापटीप करून व्यवस्थित ठेवली होती. आज मकरंद अन् आशुसाठी कोणकोणत्या वस्तु बनवाव्यात ह्या विचारात ती गढली होती. त्याच्या आवडी तिला माहीत होत्या.

होता होता तिच्या मनात मकरंदबद्दलचे विचारतरंग लहरू लागले मकरंद तिच्यासमोर येत होता. आजपर्यंत अशा गोष्टी तिच्या डोक्यात कधी आल्या नव्हत्या. पण आजकाल ती अधिकाधिक आशुजवळ चालली होती, त्याच गतीने मकरंदकडेही चालली होती. तिला वाटे, कधी तरी आपण त्यांच्या जीवन यात्रेत सामावून जावे. दोन भिन्न दिशांनी आलेले प्रवासी एकमेकांना साथ देत जीवन पथावरून जावेत. परंतु लागलीच तिचं दुसरं मन बोलू लागलं– 'अरे आपण हा कसला विचार डोक्यात घेतला ? आपण लग्न केलं तर ह्या आपल्या आईचं काय होईल ? आयुष्यभर खस्ता खाऊन जिने आपणाला वाढविले त्या आईला म्हातारपणी आपल्या सुखासाठी अंतर देणे हा कुठला न्याय ..? नाही नाही ! मला आईला खूप खूप सुख द्यायचं आहे. त्यासाठी माझ्या सुखाची आहुती गेली तरी हरकत नाही!' इतक्यात 'आंटी ऽ आंटी ऽ ऽ' अशा गोड हाकांनी ती भानावर आली. तिच्यासमोर आशु होती. आशुबरोबर तिची नवीन दाई पाहून मात्र ती नाराज झाली. परंतु मनोमन समजूत घालीत तिने आशूला उचलून तिचा पापा घेतला. परंतु तिची नजर बाहेर होती. गाडी बंद करून मकरंद कधी येतोय असं झालं होतं तिला !

'आंटी ऽ ! डॅडींनी 'सॉरी' म्हणून सांगितलं, – चांगलं पाच वेळा हं ऽ ! त्याना एक महत्त्वाचं काम निघालं म्हणून ते येऊ शकले नाहीत. संध्याकाळी येतील.'

'खरंच योगिनीबाई, संध्याकाळी येतोच म्हणाले !' इति कौसल्या दाई.

कौसल्या दाईला योगिनीनेच नोकरीस ठेवले होते. कौसल्या बिचारी गरीब विधवा होती. योगिनीच्या सौजन्याला ती फार मानीत असे. कौसल्यासमोर मनातील भाव प्रगट होऊ नयेत ह्याची ती दक्षता घेत होती.

दिवसभर आशूबरोबर योगिनी लहान होऊन खेळत होती. तिच्या बरोबर ती अगदी समरस झाली होती – तिच्या मैत्रिणीसारखी.

योगिनीच्या आईला देखील ती चलाख पोरगी फार आवडली. संध्याकाळ झाली. अचानक आठवल्यासारखे करीत तिने मनगटी घड्याळ पाहिले. साडे सहा होत आले होते. तिच्या मनाने एक निश्चय केला. ती तत्काळ, बोलून गेली.

' आशु ! तू आईबरोबर गप्पा मार हं ऽ ! आई मी वंदनाकडे जाऊन येते ! '

' कां ग ऽ ? '

' अग, दोन दिवस झाले. तिला ताप येतोय. आता आठवण झाली— '

' अग, पण आशूचे वडील येणार आहेत ना ?

' त्याचा काही नेम नसतो. विचारलेच तर साग ! माझं बाहेर जाणं आवश्यक होत ! त्याना जेवायचा आग्रह कर. पण ते थांबणार नाहीत. जायला निघाले तर आशूसाठी आणलेला नवीन फ्रॉक दे हं ऽ जाताना !' आई पुढे काही तरी विचारणार ह्याची कल्पना आल्यामुळे ते चुकविण्यासाठी ती धाडधाड जायऱ्या उतरत रस्त्यावर आली. तिची आई मात्र तिच्या त्या वर्तनाबद्दल विचारात पडली. योगिनी मकरंदवर रागावली होती. परंतु त्या रागात तिला समाधान वाटत होते, ते हे की आता येणारे मकरद देखील तिचे दर्शन न होता विन्मुख परतणार होते. विचार करीत ती झरझर चालली असता तिच्यासमोर मोटारीचा ' पों ऽ पों ऽ असा आवाज झाला.' दचकून समोर पाहताच मात्र योगिनी एखाद्या यक्षामारखी जागच्या जागी खिळून उभी राहिली. तेवढ्यात मोटारीचा दरवाजा उघडून ती व्यक्ति समोर येऊन बोलू लागली.

' आय ऍम सॉरी योगिनी ! '

' अं ऽतुम्ही आलात ? तिचा रागीट स्वर

'मला कल्पना आहे की तुम्ही माझ्यावर रागावला आहात – मला संध्याकाळी देखील उशीर झालाय यायला – '

' छेः ! तुम्हाला कुठ उशीर झालाय ? उलट तुम्ही तर आता पधरा मिनिटे लौकर आलात ! ' मनगटी घड्याळात पाहुन

ती बोलून गेली. यावेळी आपल्या स्वरातील लटका राग अन् चेहऱ्यावरील भाव मात्र ती लपवू शकली नाही. मकरंदने ते ताडले होते. म्हणूनच तो सहज बोलून गेला.

' आपण एवढ्या चिंताग्रस्त होऊ शकता हे मी आताच अजमाविले ! ' योगिनीने स्नेहार्द्र नजरेने मकरंदला न्याहाळले. ह्यापूर्वी एवढा मोकळा हसताना तिने त्याला कधीच पाहिले नव्हते.

" कुठे बाहेर जायचा विचार आहे का ? '

" नाही ऽ ! आपलीच वाट बघत सहज खाली आले होते ! '

" तर मग चला ऽ आम्ही आलो ऽ ! '

योगिनीने मकरंदला घरी आणले. आशुने आपले डॅडी आलेले पाहून एकच आरडाओरडा केला. जेवण उरकेपर्यंत योगिनीची आईसारखी मकरंदला न्याहाळीत होती. योगिनीने बांधलेले मकरंदच्या प्रशस्तीचे पूल कितपत मजबूत आहेत ते ती न्याहाळीत होती. मकरंदने घरी जायला निघताना योगिनीसह तिच्या आईचे आभार मानले.

' आपण कसले आभार मानता–? आभार तर खरे मी मानायला हवेत ! '

' कशाबद्दल बुवा ? '

' आपणासारखी बडी माणस आम्हा गरीबाच्या झोपडीत आल्याबद्दल ! '

' आमच्या महालापेक्षा ही झोपडी कितीतरी श्रेष्ठ आहे. कारण इथ खर सुख आहे – शांती आहे ! '

' मग पुन्हा कधी येणार ? ' योगिनीच्या आईने मध्येच प्रश्न केला.

' तुम्ही बोलवाल तेव्हा ! '

' आम्ही काय रोज बोलावू – पण तुम्ही थोडेच रोज येणार आहात ? '

" रोज नाही. पण जेव्हा मनाची शांति भंग पावेल तेव्हा जरूर येऊ ! " असं म्हणत त्याने सर्वांचा निरोप घेतला.

गाडी चालविता चालविता मकरंद विचार करीत होता. मागच्या सीटवर कौसल्याबाईंच्या कुशीत दिवसभर बागडलेली आशु निवांत झोपली होती. मकरंदच्या विचारगतीला अधिक वेग मिळत होता. त्याला आजची येरवडयाच्या तुरुंगातील मालतीची भेट आठवली - अगदी भिन्न चित्र म्हणून ती त्याच्या नजरेसमोर उभी ठाकली......

तुरुंगाच्या छोटयाशा रुग्णालयात तो इकडे तिकडे फेऱ्या मारीत होता. रुग्णशय्येवर पहुडलेली निष्प्रभ मालती त्याने पाहिली होती. तिचे कण्हणे विव्हळणे ऐकले होते. यातना पाहिल्या होत्या. म्हणूनच तो अस्वस्थ झाला होता. तेवढयात डॉक्टर अन् विश्वास जवळ आले.

'डॉक्टर, पेशंटची तब्येत कशी काय आहे ? ' त्याने प्रश्न केला.

'एवढी चिंताजनक नाही. परंतु प्लुरीसीचा अॅटॅक आहे. इंजेक्शन दिले आहे ! ' डॉक्टर.

'आणखीन काही औषध हवी असली तर... ? '

'वेळ आल्यावर सांगितली जातील— ' मध्येच विश्वास बोलून गेला. डॉक्टर अन् नर्स निघून गेले. मग विश्वासने शांतपणे मकरंदला विचारले.

'जे औषध येथे मिळणार नाही, ते तू आणून देशील ? '

'हं ऽ. कितीही किंमत मोजावी लागली तरी ती द्यायला मी तयार आहे'

'मालती वहीनीचं औषध एकच आहे ... '

'कोणतं ? '

'तिची मुलगी आशु ! '

'विश्वास ऽ ! ' मकरंद मोठ्यांदा किंचाळला.

'मग त्या दोघांत खूप बोलणी झाली होती. ती मुलाखत संपवून मकरंद योगिनीच्या घरी आला होता. त्या वातावरणात एक आगळीच खुमारी होती. त्या भिन्न वातावरणात तो लवकरच मिसळला होता. आणि आता घरी निघाला होता.

× × × × ×

' योगिनी अंथरुणावर पडल्या पडल्या मकरंदचा विचार करीत होती. तेवढ्यात पलीकडे पहुडलेल्या तिच्या आईने हलकेच प्रश्न केला.

' योगा ऽ कसा काय माणूस आहे — मकरंद ? '

' श्रीमत आहेत – प्रतिष्ठित आहेत. मनाचा मात्र थांग लागत नाही ! "

"मनानेही सुरेख आहे. मला विचारून घे. वयानेही तसा लहानच आहे. कुणी ह्याचं लग्न झालं आहे असं म्हणणार देखील नाही ! मग दुसरं लग्न कां करीत नाही ? "

" मला काय माहीत ? "

' तू कधी त्याच्या मनाचा थांग घेतला आहेस ? '

' हो ऽ ! ' असं म्हणत तिने लग्नाबद्दलचे मकरंदचे विचार सांगितले.

' अग, पण तुझ्या प्रीतीच्या जोरावर त्याचे विचार बदलणे तुला शक्य नाही का ? त्याच्या मनात शिर, त्याला आपलेसे कर. असा पती तुला मिळाला तर मला सुखाने मरण येईल. आशूचाही तुझ्यावर जीव जडला आहे. अनायासे आईच हो तिची ! '

' पण – पण आई ऽ !

' पोरी तुझं त्याच्यावर मन जडल आहे ते जाणलंय मी ! '

' आई ऽ अशी लाडीक हाक आईला मारीत योगिनीने पांघरूण घेतले. अंधारातही डोळे मिटून ती शांतपणे मकरंदचा विचार करीत होती. खरच तो तिला [illegible]ापासून आवडत होता. तरीहि ती त्याच्यापासून दूर रहात होती. पण अलीकडे तोच समीप येत होता. तिने त्याचवेळी निश्चय केला. आपल्या प्रेमाच्या जोरावर तिने त्याला जिंकण्याचा पण केला. त्यातच तिचा डोळा लागला. स्वप्नांच्या साम्राज्यात ती मकरंदच्या मिठीत होती.

दुसऱ्या दिवसापासून मात्र योगिनीने आपल्या निश्चयाच्या कृतीस सुरुवात केली. तिने मकरंदशी येणारा संबंध तोडून टाकला. आज पंधरा दिवस होत आले ह्या गोष्टीला. मध्ये दोन चार वेळा हॉस्पिटलमध्ये मकरंदचा फोन आला होता. पण तिने ' वेळ नाही ' अशी सबब

सांगून सरळ धुडकावून लावले. एकदा तो गाडी घेऊन स्वतः तिच्या घरी आला होता. ती घरी होती. परंतु तिने आईला घरी नाही असे सांगायला भाग पाडून त्याला वाटेला लावले. परंतु ती घरी असल्याचे मकरंदच्या लक्षात आले होते. तरीही ती अजून त्याला अगर आशूला भेटली नव्हती. आशूची आठवण तिला रोज छळीत होती. तिला आशूकडे खेचीत होती परंतु कृत-निश्चयामुळे ती काहीच करू शकत नव्हती. ह्या पंधरा दिवसात ती देखील खूप वाळली होती. त्याबद्दल तिला आई खूप खूप बोलत होती. पण नेहमीप्रमाणे आताही ती आईला म्हणाली—

'मकरंदचे हृदय परिवर्तन करण्याचा हाच एक मार्ग आहे!'

तेवढ्यात दारावरील बेल वाजली. तिने जाऊन दरवाजा उघडला. समोर गोपीला पाहताच तिला आश्चर्य वाटले.

'बाईसाहेब ऽ ही चिठ्ठी दिली आहे!'

योगिनीने लागलीच चिठ्ठी खेचून घेतली व उघडून ती वाचू लागली.

'योगिनी' —

तुम्ही आज पंधरा दिवस मला टाकू पाहता. स्वतः घरी असते वेळीहि आईकडून घरी नाही असं वदवून घेता वाईट वाटतं ते या गोष्टीचं की, छोट्या आशूबद्दलचा तुमच्या हृदयातील प्रीतीचा झरा आटला जावा? आशु मात्र तुमची फार आठवण काढते. फक्त आशूसाठी आपण एकवार येऊन जाल तर मेहेरबानी! कारण ती तापाने फणफणत आहे. कधी मधी 'आंटी ऽ आंटी ऽ' करून बरळते म्हणून .....

मकरंद विचारे.

योगिनीने पत्र आईच्या हातात कोंबले. अन् गोपीबरोबरच मकरंदचे घर गाठले. आशु बिछान्याला खिळली होती. तिची कोमेजलेली मुद्रा योगिनीला जीवघेणी वाटली. तिने बर्फाची पिशवी तिच्या डोक्यावर धरली. अगदी संध्याकाळपर्यंत ती तेथेच होती, आशूची एकाग्रतेने शुश्रुषा करीत. त्या वेळी मकरंद घरात नसावा ह्याचा तिला भारी राग आला होता. संध्याकाळ झाली. तेवढ्यात मकरंद घरी आला. गोपीने योगिनीबद्दल सारे काही सांगितले.

' मुलगी घरात आजारी अन् तुम्ही बाहेर फिरा ! '

' गोपी अन् दाई होती की घरात – शिवाय, चिट्ठी वाचून तुम्ही याल असा विश्वास होता !

' योगिनी त्यापुढे काय बोलणार ? ती जायला निघाली. तेव्हा मकरंदने विचारले—

' थांबा, मी येतो सोडायला ऽ ! '

' थँक्यू ऽ ! मी एकटीच जाईन ! ' योगिनी.

' अंधार पडलाय ऽ — '

' सवय आहे मला ... एवढं बोलून ती जलदीने बाहेर पडली. ' तो फाटकापर्यंत तिच्या पाठोपाठ आला. तिने एकदाही मागे वळून पाहिले नाही ! दूर दृष्टिगोचर होणारी तिची आकृती मात्र तो पहात होता.

रात्री अंथरुणात पडला तरी त्याला झोप येत नव्हती. सारखा तो योगिनीबद्दल विचार करीत होता. ' आपल्याला आणि आशूला योगिनी इतकी जवळची कां वाटते ? परकेपणा कां जाणवत नाही. ती आपल्याबद्दल किती सहानुभूति दाखविते ! तिला आशूबद्दल एवढा जिव्हाळा कां ? एवढी आपुलकी कां ? योगिनी कायमची या घरात येऊन राहणे शक्य नाही का ? ती आल्यावर या घरातील भयानकता नष्ट होते ; भेसूरता दूर पळून जाते. सबंध घर हर्षाने फुलून येते. आनंद प्रमोदाच्या तरंगानी भरून जाते. असं कां ? ' परंतु ह्या साऱ्या गोष्टी तो योगिनीला विचारू मात्र शकत नव्हता. त्याला वाटे, तिला विचारल्यावर तिच्या भावना दुखावल्या गेल्या तर ? आजकाल आपण तिच्या अधिकाधिक जवळ जात आहोत पण ती मात्र आपल्यापासून दूर दूर जातेय. विचार करता करता मकरंद देखील दूर दूर गेला—निद्रादेवीच्या राज्यात.

सकाळी उठल्यावर तो दिवाणखान्यात येऊन समोर पाहतो तो विश्वास सातपुते चहा पीत होता ! मकरंदने कपाळावर हात मारून घेतला.

' रात्री फार उशीरा झोपलेला दिसतोस ! '

' नाही रे ! मकरंदने चहा बनवीत उत्तर दिले. आणि पुन्हा विचारले,

' तू केव्हा आलास ? '

' अर्धा तास झाला. परंतु समोरील चहा पाहवेना. तेव्हा केली सुरुवात. ' हसतच विश्वास उतरला.

' अरे बाबा, इथे माझी झोप उडाली ! हं ऽ ! आशूला दररोज ताप भरतो. अजून काही निदान होत नाही. फार घाबरलोय बघ मी ! मकरद बोलून गेला.

आशूला ताप ? मला नाही माहीत. तरी पण डॉक्टर काय म्हणतात ? '

' बहुतेक ' अॅनीमिया ' वर केस जाईल. पण मी आमच्या मील-वानकीच्या केमिस्टकडून खास नवीन गोळ्या मागवितोय. पण आशूची एक दाई अन गोपी असून रीझवण होत नाही ! ' मकरंदने सत्यस्थिती ओकली.

' मग एक काम कर ! ' विश्वास.

' काय ? '

' लग्न कर यार ! '

' विश्वास ऽ तुला विनोद सुचतोय ? मकरंद पेटला.

' अरे रागावू नकोस. विचार कर. तुझ्या शिशिर जीवनात वसंताचा बहर फुलव. आशूला देखील आई मिळेल ! ' विश्वास

' हे मला तू सांगतोस ? '

' होय मित्रा, जसं तुरुगात खितपत पडलेल्या मालती वहिनीची हालत मी पाहू शकत नाही, तसेच तुझे वाया जाणारे तृषित तारुण्य मी पाहू शकत नाही. खरंच तू लग्न कर मकरंद ! '

' पण तू आता एवढ आस्थेनं कां सांगतोस ? मकरंदचा प्रश्न.

' कारण वहिनीबद्दल मी डॉक्टरांना नेहमी भेटतो. डॉक्टर मला म्हणून प्रामाणिकपणे सांगतात, की वहिनी आता थोड्या दिवसाची

पाहुणी आहे. तिची जीवन ज्योत बुझत आली आहे. तिची सात वर्षे संपली, अजून सात बाकी आहेत. तेव्हा मला वाटतं की ती... '

' जिवंत तुरुंगाबाहेर पडणार नाही. -- अरे शेंबडं पोर देखील हे सांगेल ! मकरंदचा वैताग.

क्षणभर विचार करीत विश्वास म्हणाला—

' ह्यासाठी लग्न हाच एक रस्ता आहे मकरंद, तुझ्यासाठी ! '

' पण विश्वास, आशूचं काय होईल? ' थोडा वेळ थांबून मकरंदने अगदी कळवळून विचारले.

' चांगलं झालं तर ठीक. नव्या आईने सावत्रपणा गाजविला तर मित्रा आशुला मी माझ्या घरी घेऊन जाईन. विश्वासाने तिला लहानाची मोठी करीन ! '

' पण मालती जिवंत असताना – तिची आई जीवंत असताना ? नाही ... नाही विश्वास ! हे मला पटत नाही ! '

' अरे वेडया मालती वहिनीनेच तू लग्न करावेस असं मला सुचविले. म्हणून तर मुद्दाम आलोय. ' विश्वास.

मकरंद थोडा गंभीर झाला. इकडच्या तिकडच्या गप्पा झोडून विश्वास निघून गेला. तरी मकरंद मात्र कोडयात सापडल्यागत वाटला. विश्वासने एका अकल्पित गोष्टीला पैलू पाडले होते. मालतीदेखील राजी झाली होती. तिने चांगुलपणा दाखविला होता. परंतु क्षणातच मकरंदला वाटले, मालती आपली वैरी आहे. आपल्या विनाशाची ही तिची एक नवीन स्फूर्ती तर नाही ना ? नवीन योजना तर नाही ना ? '

तेवढयात वरील साऱ्या कल्पना लुप्त झाल्या. एकाएकी मकरंदच्या मनोपटावर योगिनीची मूर्ती साकार झाली. योगिनीच्या साऱ्या आठवणींनी त्याच्या मनाला शांती लाभली. योगिनीबद्दल विचार करण्यात तो गढून गेला.

: ३ :

रात्रीचे दहा वाजले होते. मकरंद योगिनीचा निरोप घेऊन घरी यायला निघाला होता. रात्रीच्या शीतल वाऱ्याच्या शिडकावात त्याचा आनंद द्विगुणित झाला. एका आगळ्याच वातावरणात तो हेलकावत होता. त्याचा आत्मा तृप्त झाला होता. अजूनही त्याच्या नयनचक्षू-समोर योगिनीच्या मघाच्या भेटीचे चित्र तरळत होते. योगिनीचा मुग्ध–म्लान चेहरा, गुलाबी गाल, डाळिंबी ओठ, ओठातील अमृत, सारं सार तो आठवत होत. कानात अजूनही तिच्या मंजुळ शब्दाचा गुंजारव दरवळत होता. एखाद्या अपूर्व संगीतासारखा. स्मृतिपटावर फक्त योगिनीचे प्रतिबिंब उभे ठाकले होते. तिची हसरी वदनकलिका त्याला मंत्रमुग्ध करीत होती.

गाडी बंद करून मकरंद आत आला. आशूच्या खोलीत अंधार दाटला होता. बहुधा ती झोपली होती. स्वयंपाकघरात मात्र अजून उजेड होता. गोपी अजून काम करीत होता. मकरंद दिवाणखान्यातील बत्ती न लावताच सरळ आपल्या खोलीत गेला. बत्ती लावताच खोलीत प्रकाशाचे साम्राज्य पसरले. अंगातील कोट काढून त्याने तो खुंटीवर टांगला अन तो पाठीमागे वळला. तो मोठ्यांदा किंचाळणार होता. परंतु भानावर येत स्वतःची किंचाळी त्याने आतल्या आत दाबली. सबंध शरीरभर तो थरथर कापत होता. ही कंपायमान स्थिती मात्र तो थांबवू शकला नाही. समोर फरशीवर एक व्यक्ति बसली होती. त्या व्यक्तीला पाहून असं वाटलं की आपल्याला एक नव्हे तर हजार विंचवानी दंश तर केला नाही ना ? त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. त्याने पुन्हा डोळे चोळून पाहिले. पण तो आभास नव्हता. प्रत्यक्ष मालती होती ती !

मालतीने थकलेले व्याकुळ डोळे हलकेच उघडून मकरंदकडे पाहिले. त्यावेळी तिची चर्या घाबरलेली होती. मकरंदला मात्र आपल्याभोवती

सबंध खोली फिरतेय असं वाटलं. परंतु त्याने स्वतःला सांभाळले अन् कापऱ्या स्वरात विचारले–

'तू आणि इथे ?'

'होऽ दुपारपासून बसले आहे ! '

'तुरुंगातून पळून आलीस का ? ' मकरंदने दरडावले.

नाही माझी सुटका झाली ! ' मालतीने हातातील कागदपत्र त्याच्यासमोर धरले. मकरंदने क्षणभर विचार करून तिच्या हातातून ते कागद पत्र काढून घेऊन वाचले. तिने सांगितलेलं खरं होतं. मालतीची तिच्या आजारपणामुळे अन् तुरुंगातील चांगल्या वागणुकीमुळे राहिलेली शिक्षा रद्द झाली होती. मालतीला ह्या गोष्टीचा आनंद होणे स्वाभाविक होते. कोणत्या गुन्हेगाराला सजा कमी झाल्याबद्दल आनंद वाटणार नाही ? परन्तु मकरंदला मात्र ह्या गोष्टीची मनस्वी चीड आली. संकटाचा कडा कोसळल्यागत, किंबहुना वज्राघात झाल्यागत त्याला भासले. मालती चार भींतीआड तुरुंगात असल्यामुळे त्याला उल्हास वाटत होता. कारण त्यामुळे तिचा वैयक्तिक त्रास त्याला बोचत नव्हता. पण आता ती बाहेर आल्यामुळे एक प्रकारचं भयाण संकट दत्त म्हणून त्याच्यासमोर उभं ठाकलं. काळजी अन् व्यथा ह्यासारख्या आवर्तात त्याला आता फिरावे लागणार होते. एखाद्या प्रक्षुब्ध लाटेच्या तडाख्यात विवंचनेच्या सागरात तो खोल चालला होता. मालती आपला अधिकार मागेल, आशूचं प्रेम मागेल ह्याची त्याला कल्पना आली. मालतीची मागणी अर्थात् न्याय्य होती. तरी देखील ती पुरविणे मकरंदला शक्य नव्हते. त्याने आशूला कळायला लागल्यापासून सांगितले होते की 'तुझी आई मेली आहे, देवाघरी गेली आहे.' परंतु मालतीच्या आगमनाने जर आशुला कळले की मालती तिची आई आहे, ती जिवंत असून आपण तिला खोटेच 'ती मेली' म्हणून सांगितले. शिवाय तिची ही जिवंत आई खूनाच्या गुन्ह्यादाखल सजा भोगत तुरुंगात खितपत पडली होती, असं तिला कळलं तर त्या बालमनावर काय परिणाम होईल ! आजतागायत त्याने कोणत्याही असत्याची तिला जाणीव

करून दिलेली नाही. परंतु ह्या असत्याची तिला प्रत्यक्ष झळ लागली तर ? तर सबंध जगाबद्दल–जीवनाबद्दल–जीवितमूल्यांबद्दल ती एक प्रकारची घृणा तर करणार नाही ना ! सत्याबद्दल वाटणारे प्रेम कमी होऊन असत्याचा अधिकाधिक विचार तर ती करणार नाही ना ? त्याहीपुढे जाऊन ही गोष्ट योगिनीला समजली तर ! योगिनीबरोबर रंगविलेली स्वप्ने जमीन दोस्त होऊन जातील. पत्त्याच्या बंगल्यागत कोलमडून पडतील मकरदच्या डोक्यात भूकंपागत नानाविध विचारांचे हादरे बसू लागले. ज्वालामुखीगत स्फोट होऊ लागला. तो अस्वस्थ झाला. एका आगळ्याच कोलाहलात त्याचे विचारचक्र फिरू लागले. मकरदच्या विचारात सूडबुद्धीची कठोरता सामावली. करड्या नजरेने मालतीकडे पाहत तो आवेशाने तिला विचारू लागला–

'तू माझ्याकडे काय मागायला आली आहेस ? '

' आपल्या घरी येऊन कुणी काही मागत वाटतं ? '

'ह्या घराला तुला आपलं घर म्हणण्याचा अधिकार राहिलेला नाही. तो अधिकार तू कधीच गमावला आहेस. नर्क हे तुझं घर आहे. तेथे जाऊन यातना भोग. ह्या घराला तू कायमची मेली आहेस. '

' मरण आलं असत तर मग इथं कशाला आले असते ? पण मला मृत्यूदेखील येत नाही, त्याला मी काय करू ? मृत्यु हा जर आपल्या इच्छेवर अवलंबून असता, तर किती बर झाल असतं ? ' मालती केविलवाणे उद्गारली.

'दूर हो माझ्या नजरेसमोरून – चांडाळणी ! ह्या घरावर तुझी सावली पडली तरी ती खपणार नाही मला ! त्यामुळे घरातील पावित्र्य नष्ट होईल, मांगल्याला बाध येईल ! '

' जरा शांतपणे विचार करा ! मला परमेश्वराने शिक्षा दिलीच आहे. मनोमन मी जळत आहे. सरकारने दया दाखवून सोडून दिलं; तिथं माझ्यासारखीवर तुम्ही जर दया दाखविणार नाही, तर कोण दाखविणार ? '

'दया आणि तुझ्यावर? एका खुनी स्त्रीला दया दाखवायची? जिने स्वतःच्या संसाराची धूळदाण केली तिला दया दाखवायची? तुझ्या तोंडी दयेची भाषा शोभत नाही. जा! या घरातून चालती हो! तुझं तोंड काळं कर! जा म्हणतो ना?' मकरंद रागाने संतप्त होऊन म्हणाला.

'एका अभागिनीवर दया करा! माझी आशु मला देऊन टाका. माझ्या मातृत्वाची अशी विटंबना करू नका!'

'खबरदार जर पुन्हा आशूचं नाव घेशील तर! तिला तू मेली आहेस. अगदी कायमची. तू तिची आई नाहीस. तू राक्षसीण आहेस. समजले?' पुन्हा तो सतापला. मालती उठली. हात जोडून मकरंदच्या समोर उभी राहिली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. मृदु, रडव्या अन् हलक्या शब्दात ती म्हणाली—

'आपण जाणता, की मी आणखी अधिक वर्षे जगणार नाही. हा देह काही दिवसांचा पाहुणा आहे.' बोलता बोलता तिला जोराचा खोकला आला.

'म्हणून तर म्हणतो. स्वतःचं मरण ओढवलं, एवढं कळत असूनही त्या निष्पाप जीवाला कशाला आपल्याबरोबर ओढून घेतेस? माझ्यासाठी नको, पण त्या चिमुकल्या जीवासाठी तरी तुझं अविवेकी मन आवर!'

'एक प्रार्थना ऐकाल?'

'काय आहे? लौकर बोल ऽ!'

'ह्या घरात मी मोलकरीण म्हणून रहाते. त्यामुळे तरी मला माझ्या आशूच्या सान्निध्याचे सुख लाभेल.'

'नाही. हे कदापि शक्य नाही!'

'आपण विचार करा. मरेपर्यंत माझ्या तोंडून सत्य बाहेर निघणार नाही की 'मी आशूची आईआहे' म्हणून! फक्त आशूला सांभाळीन. तिची कामे करीन. ह्यात माझा मुळीच स्वार्थ नाही. फक्त मातृत्वाची तहान मला मिटवायची आहे! –' ती खूप वेळ बोलत

होती. तेवढ्यात मकरंदने जाऊन दरवाजा उघडला. कठोर स्वरात तो म्हणाला–

' आता तू जाऊ शकतेस–हा माझा अंतिम निर्णय आहे ! ' असे दरडावून तो आपल्या बेडरूममध्ये गेला. खोलीत अंधार होता. दिव्याचे बटन दाबण्यासाठी त्याने हात वर केला. परंतु तो थांबला. पुढे केलेला हात त्याने मागे घेतला. प्रकाशाचे कसले तरी अनाहूत भय वाटले त्याला. त्याने डोळे गच्च मिटून घेतले. विचारांचे काहूर उठलेले मन तो शांत करीत होता. पुन्हा डोळे उघडून तो खिडकीपाशी आला. त्याने सहज खिडकी उघडली. समोर पाहतो तो मालती फाटकातून बाहेर जाताना दिसली. तिच्या चालीत त्याला जडता भासली. लागलीच तो बाहेर आला, अगदी लपतछपत. अलगद पावलांनी तो फाटकापर्यंत येऊन पोहोचला. मालतीला मात्र त्याचा कानोसा नव्हता. ती दूर गेलेली पाहून मकरदने फाटक बंद करून घेतले. त्या निमर्नुष्य रस्त्यावरून एकटयाच जाणाऱ्या मालतीच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो पहात राहिला.

घरात आल्यावर मकरंद प्रथम आशूच्या खोलीत गेला. आशू गाढ झोपलेली होती. झोपेतही तिच्या चेहऱ्यावर मधुर भाव विलसले होते. शेजारच्या पलंगावर तिची दाई झोपली होती. मकरंदने हलकेच आशूच्या अंगावरील शाल सारखी करून तो आपल्या खोलीत आला. त्याचं मन उद्विग्न झाल होतं. विचारचक्रात अभिमन्यूसारखा फिरत होता तो. मनाला तडाखे बसत होते. क्षणार्धात तो कपाटाकडे गेला. त्याने कपाट उघडले. त्यातील व्हिस्कीची बाटली काढली अन् ग्लासात पेग ओतला देखील ! जणू मनातील अस्वस्थता तो त्यात ओतीत होता. तोच त्याच्या कानावर हलकेच शब्द आदळले... ' मी तुमची झाले असतानाही तुम्हाला हिची गरज भासते ? '

मकरंद घाबरून गेला. योगिनीचे शब्द होते ते ! त्याने दृष्टी चौफेर टाकून पाहिले. मात्र तेथे कुणीच नव्हतं. योगिनीच्या शब्दांचा

आ घा. ४

आभास निर्माण झाला होता. त्याची नजर ग्लासातील रंगीत पेयावर खिळली. तो त्यात डोकावून पाहू लागला. खूप वेळ तो तसाच पहात होता. त्यात त्याला योगिनीच्या आजच्या भेटीची स्मृति चित्रे दिसत होती. आजचा गोड सोहळा आठवून त्याच्या पुनः प्रत्ययाचा निर्मळ आनंद तो उपभोगू लागला......

"आज सकाळीच योगिनी मकरंदच्या घरी आली होती. मकरंदही बाहेर जायच्या तयारीत होता.

' बरं झालं वेळेवर आले म्हणून. नाहीतर आपलीही चुकामूक झाली असती.' योगिनीला समोर पाहून आधीच प्रसन्न झालेला मकरंद अधिकच खुषीत झाला. मकरंद योगिनीवर मनोमन प्रेम करू लागला होता. ती त्याला हवी-हवीशी वाटे. तिच्या डोळयात, नाकात, चेहऱ्यात शरीराच्या प्रत्येक अवयवात त्याला एक आगळीच जादू भासे. तिचा स्वभाव देखील त्याला मोहून टाकी. तिच्या सान्निध्यात तो मोहरून जाई. त्याचा हरपलेला जीव स्वतःचा रहात नसे तो योगिनीमय होऊन जाई.

' काही योगच असे असतात की, त्यांचे एकमेकांशी बंधन झालेले असते! ' त्याच्या बोलण्यावर योगिनी गोड हसली. त्यावर तोच पुढे म्हणाला—

' आज स्वारी सकाळीच कुठे ? '

' आज तुम्हाला ऑफिसला जायला हवंच का ? '

' कां बुवा ? '

' आज मी एक बेत करून आले आहे. आज विनायकी. तेव्हा टिटवाळयाच्या गणपतीला जायची इच्छा झालीय. येणार का माझ्या-बरोबर गणपतीला ? नाही म्हणू नका! ... संध्याकाळी परतू! ... खूप भटकू... गप्पा मारू...हं ऽ! '

मकरंदला तिच्या त्या बेताचं नवल वाटलं. आपल्याला बरोबर चलण्याची गळ तिने घालावी म्हणून वरकरणी आढेवेढे घेण्याचा त्याचा हेतु होता. पण नकळत त्याचे तोंडून कधी होकार होकार गेला त्याचे

त्यालाच कळले नाही. गोपीकाकाला आशूबद्दल सूचना देऊन जातो असं म्हणत तो गाडीत बसला.

मागोमाग ती आली. पुढील दरवाजा उघडून आज ती मोटारीत मकरंदच्या शेजारीचे बसली. मकरंद मात्र काहीसा हबकला.

ती दोघं दुपारच्या दरम्यान गणेश मंदिरात पोहोचली. दोघांनीही देवदर्शन घेतलं नंतर गाडीतच बसून दोघांनी फराळ केला. योगिनीने करून आणलेल्या फराळाची स्तुती करत मकरंद योगिनीची चेष्टा करीत होता. योगिनीही त्याला प्रतिसाद देत होती. शहुद गेल्या-नंतर ती दोघं परत यायला निघाली. गाडी रस्त्याला लागताच मकरंद योगिनीला विचारू लागला— ' काय मागितलंत देवाजवळ ? '

' मी नाही प्रथम सागणार ! तुम्ही काय मागितलेत ते सांगा अगोदर ! '

' सागू ? '

' सागा ना ! '

' तुम्ही देवाजवळ जे मागितलेत ते तुम्हाला मिळू दे असं सांगितलं ! '

' खरंच ? '

' अगदी खरं ! '

' पण ते देणं देवाजवळ नाही. तुमच्याजवळ आहे ! '

' म्हणजे ? '

' मी तुम्हालाच मागितलंय. तुमच्या भावी जीवनात मला तुमची सेवा करायची संधी मिळू दे—'

' योगीनी ऽ'

' मकरंद ऽ ! खरच मकरद ऽ ! मला तू हवा आहेस. माझं प्रेम जड-लंय तुझ्यावर. खूप प्रेम जडलय तुझ्यावर. माझ्या मनाला मी आवरू शकत नाही. स्वतःच स्वत्व विसरून मी तुझ्यात विलीन झाले आहे. तुझ्या विरही जीवनात मी प्रीतीची फुलबाग फुलवू इच्छितेय. आशूला अन तुला माझ्या परीने सुखसमाधान देऊ इच्छितेय. पुनर्विवाहाबद्दल तुझी

कितीही कुत्सित मते असोत, माझ्या प्रेमाच्या शक्तीने मी ती बदलण्याची पराकाष्ठा करीन. मकरंद ! फक्त तुझ्या हृदयातील चिमुकल्या कप्प्यात मला इवलीशी जागा दे. तेथे मला तू व्यापलेलं माझं मन लपवू दे. मी तुझ्याशिवाय जगणं अशक्य—'

ह्या भानरहित स्थितीतून'ती ज्यावेळी शुद्धीवर आली त्यावेळी तिच्या लक्षात आले की, आपण मकरंदला एकेरी नावाने संबोधले. त्यावेळी ती लज्जित होऊन मकरंदकडे पाहू लागली. तो देखील आ वासून तिच्याकडे पाहत होता. तो म्हणाला.

'योगिनी, ! लाजू नकोस. ह्या एकेरीपणातच दोन जीवांची जवळीक साधलेली असते ! ' योगिनीचं हृदय उंचबळून आलं. ती त्याच्या कुशीत शिरली लोणावळ्याची वनश्री दिसत होती. ती पाहून मकरंदने गाडी थांबविली.

' हे काय ? गाडी कां थांबविलीत ? '

' ह्या परिस्थितीत गाडी चालविणे अशक्य आहे !

' कां ? '

' तेच सांगण्यासाठी गाडी थांबविली. समोर एवढी रम्य वनश्री असताना तुझ्या सान्निध्याचा ह्या यंत्राशेजारी उपभोग घेणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे. चल, थोडं फिरून येऊ या. ह्या रम्य सौंदर्यात न्हाऊ या ! ' असं म्हणत मकरंद बाहेर आला. योगिनीच्या बाजूचा दरवाजा उघडून त्याने हात पुढे केला. योगिनीने त्याच्या हाताचा आधार घेतला. त्याने एक गोड हिसका देऊन तिला बाहेर खेचले. योगिनी अनाहूतपणे मकरंदच्या मिठीत सामावली.

दोन जीव एकमेकांना बिलगून चालले होते. चढण चढून ती दोघं एका वृक्षाच्या बुंध्याखाली बसली. दोघांचे हात एकमेकांत गुतले होते. तिच्या चेहऱ्यावर पडलेल्या किरणांनी झळाळलेला तिचा चेहरा पाहत मकरद बोलू लागला—

' योगिनी ऽ माझहि तुझ्यावर प्रेम जडलं आहे. मीहि तुझ्याशी लग्न करू इच्छितो. पण लग्नासाठी आशूला दूर करणे ठीक नाही आशू

म्हणजे माझं जीवन. आशूला वाढविणे, शिकविणे, मोठी करणे तिला एखादा चांगलासा वर पाहून तिचे लग्न लावून देणे; तिला जीवनमार्गाला लावणे हे माझे कर्तव्य आहे. माझी वचनपूर्ती आहे. ते माझं जपलेलं स्वप्न आहे. तेव्हा योगिनी तुला नुसती माझी पत्नी म्हणून स्वीकारण्यास मी तयार नाही. आशूची आई म्हणून जर तू माझ्या विराण जीवनात येत असशील, तर खरोखर माझं जीवन एक फुलबाग होईल. तुझ्या प्रीतीचा अन् ममतेचा सुगंध त्यात दरवळत राहील. माझ्या स्वप्नास जाग येईल... !

' मकरंद किती बोलतोस ! खरंच तुझं हृदय आभाळागत विशाल आहे. तुझ्यासमोर मी म्हणजे वसुंधरेवरील धूलीकण ! धूळ कधी आभाळाला जाऊन भीडली आहे का ? पण कधी कधी प्रीतीची वावटळ अशी उभारून येते माझ्या मनात... अशी उभारून येते की आभाळा एवढ्या तुझ्या मनाला मी जाऊन भिडते. खरंच मकरंद ! मी आशूला माझी मुलगी समजेन... ' बोलता बोलता योगिनी मकरंदच्या मिठीत शिरली. मकरंदनेहि आवेगाने तिला आपल्या बाहुपाशात सामावून घेत तिची एक–दोन-अनेक चुंबने तो घेऊ लागला. योगिनीही त्याच्या प्रणयी भावनांना वाट करून देऊ लागली. मकरंदचे हात तिच्या गात्रागात्रांवरून फिरू लागले. वीणेवरून नाजुक हात फिरावेत व एक आगळीच नादझंकार निर्माण व्हावी तद्वत् योगिनीच्या सर्वांगावरून रोमाच विरून जात होते. ती त्याला आत्मसर्मपित होत होती...

' ए ऽ हळू रे ऽ ! ' काहीतरी बोलायचे म्हणून योगिनी त्याला लाडेलाडे म्हणाली. तिच्या बोलांनी तो मात्र खळखळून हसला. पुन्हा तिला कवेत घेऊन तो तिचे पटापट मुके घेऊ लागला. "

' साहेब तुम्ही अजून जागे आहात ? ' गोपीच्या शब्दानी मकरंद स्मृतिस्वप्नांतून बाहेर आला. त्याच्या आठवणी पेल्यातील मदिरेच्या बुडबुड्यागत फुटल्या.

' हो ऽ गोपी ! '

' कधी आलात ? '

‘ मघाच आलो मी ! ’

‘ आशु तुमची वाट पाहत होती ! ’

‘ अस्सं ऽ. कशी आहे ती ? माझ्यावर रागाऊन झोपली असेल ! ’

‘ तुमच्यावर नाही. पण नवीन दाईवर खुप वैतागली आहे ! ’

‘ कां ? ’

‘ एवढया तेवढया गोष्टीत दाई हिडीसफिडीस करते. मला पाहवत नाही. साहेब. मुलाची जात आहे. मोकळेपणा असायला हवा.

‘नाही गोपी! हा हिडीसपणा नाही. ती करते ते योग्य आहे. प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी व्हायला हवी. दाई शिकविते ते योग्य आहे; दम भरते तेही योग्य आहे. मुलांचे अति लाड केल्याने ती बिघडण्याची भीती जास्त असते.’ असं म्हणत मकरंदने पुढयातील ग्लास तोंडाला लावला. गोपी तेथेच उभा होता. मकरंदला त्याची सवय माहीत होती. काही सांगावयाचे असल्यास तो असाच थांबत असे. म्हणून त्याने गोपीला विचारले.

‘ गोपी तुला आणखी काही सांगायचं अ हे ? बोल ना ? ’

‘ हो साहेब. पण विचार करतोय् सांगू का नको ! माझ्यासारख्या कफल्लक माणसाने याबाबत बोलणं ठीक नाही वाटत. ’

‘ गोपी ! अरे जन्म गेला तुझा ह्या घरात. परका का आहेस तू ? तुला काय सांगायचंय ते मी ओळखलंय ! मालतीबद्दल ना ? ’

‘हो ऽ ! ’ खाली मान घालीत गोपी हुंकारला.

‘ मालती निघून देखील गेली. मीच हाकलून लावले तिला. ’

‘ त्यांची अर्धी शिक्षा माफ झाली, म्हणत होत्या. ’ गोपी.

‘ हो. म्हणूनच मी चिंतेत सापडलो आहे. गोपी ! ह्या घराचं काय होणार आहे, समजत नाही ! ’ काहीशा त्रासिक सुरात मकरंद उद्गारला.

‘ साहेब ऽ माझं वेड्याचं ऐका. मालकीनींना क्षमा करा. आशु-बेटी तिला देऊन टाका. आशूसाठी मालकीणबाई किती हळहळत होत्या, ते पाहिलं मी ! तुमचं अंतःकरण थोर आहे. तेवढीच भीक बिचारीला ! तेवढंच सुख ! ’

' गोपी ऽ ' मकरंद रागाने ओरडून उठला. गोपी मात्र भीतीने थरथर कापू लागला. क्षणभर मकरंद त्याच्यावर दृष्टी स्थिरावून पाहत होता. पुन्हा तोच गोपीला विचारू लागला–

' केव्हा आली होती ? '

' दोन वाजता ! गोपीचा हलका सूर.

' आशूला भेटली ? '

' हा ऽ ! '

' काय सांगत होती ? ' जोरात मकरंदने विचारले.

' साहेब ऽ, मी स्वैंपाकघरात होतो. आशु बागेत होती. मालकीणबाई तिला कुरवाळीत होत्या. तेवढ्यात मी तेथे गेलो. आशु तिला झिडकारून माझ्याकडे येऊन मला म्हणाली– काका ! ही म्हणते, ' मी तुझी मावशी आहे. '

' तू काय उत्तर दिलेस ? '

' मी विषय बदलला अन् तिला घरात आणली. मग मालकीणबाई तुमच्या खोलीत बसल्या. '

' तू तिला बाहेर का नाही काढलेस ? '

' मालकीणबाईंना मी कसा बाहेर काढणार ? '

मकरंद त्याच्या उत्तराने चिंतातुर झाला. क्षणभर गोपीने मालकाची मुद्रा न्याहाळली जास्त बोलण्यात अर्थ नाही, असं ओळखून तो बाहेर निघून गेला मकरंद मालतीच्या विवंचनेत गढून गेला होता. ही चिंता मिटविण्याचा उपाय तो शोधत होता तो मार्ग शोधत होता. पण तो रस्ता मात्र अधिक गुंतागुंतीचा भासत होता मालतीच्या आवर्तातून बाहेर काढण्यास कुणी त्याला हवं होतं ! त्या सचिंत स्थितीत मकरंद पेगवर पेग मारीत होता त्या बेहोष स्थितीतच तो झोपी गेला.

सकाळच्या सुवर्णकिरणांनी अवनीवर अभिषेक केला. योगिनी आपल्या आईसमवेत मकरंदच्या घरी आली होती. गोपीने पोर्चमध्ये त्यांना पाहताच तो धावतच मालकाच्या खोलीत गेला. मकरंद पलंगावर अस्ताव्यस्त पडला होता चपळाईने त्याने टीपॉयवरील व्हिस्कीची

बाटली अन ग्लास वगैरे मदीरा-संसार उचलून कपाटात ठेवला. फरा-ळाचे सामान टीपॉयवर आणून ठेवीत तो मकरंदला जागे करू लागला. तेवढ्यात बाहेर कुणाची तरी चाहूल लागली. योगिनी आत येत म्हणाली—

'अजून झोपलेलीच आहे वाटतं स्वारी !' बोलत बोलत ती मक-रंदच्या उशालगत बसली. गोपीला तिच्या वागण्याचे आश्चर्य वाटले. आजतागायत त्याने मकरंदच्या एवढ्या निकट तिला पाहिले नव्हते. पण आता ती निलाजरेपणे त्याच्या शेजारी बसून त्याला हलवीत होती. तेव-ढ्यात अँ ऽ ऽ करीत मकरंदने कूस बदलली, आणि नेमकं त्याचं डोकं योगिनीच्या मांडीवर आले. योगिनीने सल्लजपणे गोपीकडे पाहिले. तेव-ढ्यात समजदारपणे गोपी निघून गेला. गोपी निघून गेल्यावर योगिनी मकरंदला जोरजोरात हलवू लागली. शेवटी ती त्याच्या कानात जोरात फुंकर घालू लागली.

तेवढ्यात मकरंदने हळुवार डोळे उघडले. योगिनीला वाटले, जणू नुकतीच उमलण्यासाठी पाकळी उघडतेय. मकरंदला देखील डोळे उघड-ताच त्याच्या मुखकमलावर वाकलेली योगिनीची मूर्ती पाहून प्रथम तो स्वप्नाभास वाटला. नंतर चौफेर नजर टाकताच सारी परिस्थिती सत्य आहे ह्याची त्याला खात्री पटली. योगिनीचा प्रसन्न चेहरा त्याला पारिजातकागत हसरा अन् टवटवीत वाटत होता. न राहवून तो बोलून गेला.

'योगा ऽ माय डिअर योगा ऽ. मी स्वप्नात तर नाही ना ?'

'इश्य ! काहीतरीच काय ?'

'थांब हं ऽ ! मी न्याहाळतो—' असं म्हणत प्रथम त्याने समोर पाहिले. पण समोरील टीपॉयवर मदीरेचा संसार नव्हता. उलट तेथे आता चहाचा ट्रे विराजमान झाला होता. मकरंदला मनोमन गोपीच्या हुषारीचे कौतुक वाटले. समाधानाने आपले तोंड फिरवून तो ते योगि-नीच्या मांडीवर घासू लागला. दोन्ही हातांनी त्याने योगिनीच्या कटीस विळखा घातला. तो तिला अधिकाधिक बिलगू लागला. योगिनीला वाटले,

आपल्या शरीरावरून कुणी हलकेच मोराचे पीस फिरवीत आहे. ती खाली वाकून त्याला सांगू लागली. अगदी लाडेलाडे...

'ए उठ ना रेऽ! उठ ना!...' त्यावेळी ती त्याच्या इतकी जवळ होती की दोघांचा श्वासोश्वास एकमेकांत मिसळत होता. मकरंदने झटकन तोंड फिरवून तिचं गोडसं चुंबन घेतलं. तेवढ्यात योगिनी त्याची पकड सोडवीत 'ईऽ' करात त्याच्यापासून दूर झाली. नंतर ती म्हणाली–

'आधी तोंड धू रात्री प्याला होतास ना?' ती म्हणाली.

'मन:स्थिती चांगली नव्हती, म्हणून घेतली थोडीशी!'

'आणि तमाच झोपलास?'

'होऽ! पण तू आल्यावर नाही पिणार. गरजच भासणार नाही. बरं पण केव्हा आलीस तू?'

'नुकतीच – पण तुमची स्वारी झोपलेली. आई काय म्हणेल— आळशी जावईबापू —?'

'आई आल्या आहेत?'

'होऽ चल लौकर बाहेर!'

'बाप रेऽ' असं म्हणत त्याने गोपीला हाक मारली. बाहेर फराळाची व्यवस्था सजविण्यास सांगितले. आशु शाळेत गेली का म्हणून विचारले. स्वत: बोलत बोलत तो बाथरूममध्ये घुसला.

कपडे बदलून मकरंद दिवाणखान्यात आला. योगिनीच्या आई-समोर जाताच त्याने तिला प्रसन्नपणे नमस्कार केला.

'आमची येण्यात चूक झाली. सकाळीच आलो आणि तुमची झोपमोड केली!'

योगिनीची आई बोलून गेली. योगिनीने आपल्या मनगटी घड्याळात पाहत मकरंदवर एक कटाक्ष टाकला. जणू तिला सांगायचे होते की चांगले दहा वाजताहेत! मकरंदने देखील तिचा उपरोधात्मक संकेत ओळखला.

'नाही. त्याचं काय आहे? मीच आज उशीरा उठलो. तुमच्या आदरसत्कारात कमतरता तर पडली नाही ना?' मकरंदने विचारले,

मकरंद बोलत असताना मधूनमधून योगिनीची आई, योगिनीला इषारा करीत होती. बऱ्याच वेळाने योगिनीच्या ती गोष्ट लक्षात आली. तिच्या आईला सांगायचे होते की, ‘पोरी तू आत जा. मला त्याच्याशी एकांतात बोलायचे आहे.’ योगिनीनं मथितार्थ ओळखून ती गोपीकाकाला हाक मारीत आत गेली. योगिनीच्या आईला माहित होत की, ही दोघं एक दुसऱ्याच्या इतकी जवळ आली आहेत की, ह्या दोघांना आता आपल्या नजरेच्या धाकात ठेवणे दुरापास्त आहे. योगिनी आत गेल्यावर तिची आई मकरंदला विचारू लागली–

‘एवढ्या मोठ्या घरात तुम्ही एकटेच राहता ?’

‘नाही. मी आहे. आशु आहे. आमचा गोपी आहे.’

‘माझा विचारण्याचा अर्थ एवढाच की कोणी भाऊ–बहिण वगैरे ?

‘सध्या कुणी नाही. एक भाऊ होता. पण तोहि सोडून गेला. सात वर्षं झाली त्याला. बहिण मात्र नव्हतीच आम्हाला.’

‘योगा ऽ म्हणत होती की तुमच्या पत्नीचा परलोकवास होऊन सात-आठ वर्षं झाली.’

‘हो !’ मकरंदला तो विषय तितकासा आवडला नाही.

‘जाऊ दे मुला. योगायोग कुठे जाऊन मिळतील ह्याचा नेम नाही बघ ! योगिनी माझी एकुलती एक मुलगी. बालपणीच वडि-लांच कृपाछत्र गमावून बसलेली. पण मी तिला लहानाची मोठी कर-ण्यात जरा देखील कुचराई केली नाही…’

ती खूप वेळ योगिनीबद्दल बोलत होती. मकरंदने तिच्या डोळ्यात डोळे घालून पाहिले. ती गहिवरून सत्य बोलत होती. तेवढ्यात तिने योगिनीच्या बटव्यामधून एक आंगठी बाहेर काढली. नंतर तिने योगिनीला साद घातली. योगिनी तिच्या समीप येऊन उभी राहिली. परंतु मकरंदच्या दृष्टीला दृष्टी भिडविण्याची तिला हिमंत होत नव्हती. तिच्या चेहऱ्यावर मात्र लज्जेचे इंद्रधनु उसटले होते. योगिनीच्या हाती अंगुठी देत अन् मकरदचा हात हाती घेत ती वृद्धा बोलू लागली.

आजचा दिवस शुभ आहे. आज माझी योगिनी मी तुमच्या हाती सोपवीत आहे ह्यापुढील तिचे सारं जीवन मी तुम्हाला अर्पण करीत आहे. तुम्ही दोघांनी मिळून तुमच्या आशुचं जीवन सफल करावं हीच माझी सदिच्छा. आशूला कोणत्याही गोष्टीची – प्रेमाची कमतरता भासू नये. हेच तुम्हां दोघांना माझं म्हातारीचं सागणं आहे ! '

बोलता बोलता योगिनीच्या आईच्या डोळ्यात श्रावणधारा झरल्या. त्यामुळे मकरंदचं मन देखील गहिवरून आलं. त्याने योगिनीवर एक कटाक्ष टाकला. तीदेखील ओथंबून गेल्यागत भासली. मकरंदला रहावेना म्हणून तो योगिनीच्या आईला म्हणाला देखील–

' आई ऽ ! तुम्ही नुसत्या योगाच्या आई नसून माझ्यादेखील आहात ! मी योगाला आणि कुणालाच कधीही अंतर देणार नाही ! तुमचा आशीर्वाद मात्र सतत हवाय मला ! '

' सुखी व्हा मुलानो ! ' योगिनीच्या आईच्या तोंडून सद्गदित शब्द बाहेर पडले.

फराळ वगैरे आटोपून त्या मायलेकी घरी परतल्या. योगिनीच्या डोळ्यात आनंदाश्रु तरळत होते. मकरंदचे शब्द तिच्या कानात गुंजारव करीत होते. खुषीने बेहोष होत ती चालली होती. तिला सुखाने बेजार झाल्यागत भासले. तिला छोटया आशुची आठवण झाली. आता ती आशूची 'आंटी' नव्हती, तर 'आशूची आई' होणार होती. आपल्या जवळचं वात्सल्य – प्रेम तिला देण्यासाठी ती उत्सुक झाली होती मकरंद प्रमाणेती देखील 'आशुबेटा' म्हणून तिला हाक मारणार होती. मनोमन तिला अतीव आनंद वाटला. तिचा ऊर भरून आला सावत्रपणाची सूक्ष्मशी असूयादेखील तिच्या मनाला शिवत नव्हती. आपणाला मकरंदची प्राप्ती होतेय ह्याच खुषीत होती ती !

रात्री मकरंदबरोबर झोपताना आशु आपल्या डॅडींना विचारीत होती—

' डॅडी! गोपीकाका सांगत होता की आंटी आपल्या घरी कायमची रहायला येणार आहे... ती कधीच जाणार नाही — ? '

आशूचं बोलणं ऐकून क्षणभर मकरंदला आश्चर्य वाटले. आजपर्यंत त्याने स्वत: ही गोष्ट आशूला कधीच सांगितली नव्हती. आणि आता आशूच त्याला प्रश्न विचारीत होती. क्षणभर तो स्तब्ध राहिला.

'डॅडी, आंटी आली म्हणजे दाईला काढून टाकूया हं ऽ! '

'पण दाईला कां काढायचं ? '

'ती मला फार त्रास देते' डॅडी ! '

'आणि आंटी ? '

'आंटी – फार ऽ फार ऽ चांगली आहे. ती माझ्यावर खूप प्रेम करते. माझे सगळे लाड पुरविते...' आशु योगिनीबद्दल खूप बोलत होती.

'अस्सं ! ' काहीतरी बोलायच म्हणून मुग्ध मकरंद बोलून गेला.

'हो ऽ डॅडी. आंटी फार चांगली आहे ती कधी येणार आहे डॅडी ? '

'मला काय माहीत? गोपीकाकाने सांगितले, त्याला विचार ! '

'चला, खोटारडे ! डॅडी खोटारडे ! तुम्हाला सारं माहीत आहे. तुम्हीच तर आंटीला आणणार आहात ! आणि 'गोपीला विचार' – म्हणून सांगता ? आम्ही नाही बोलणार जा ऽ ! ' असं म्हणत रागावून आशू आपल्या खोलीत निघून गेली. मकरदला मात्र तिच्या लटक्या रागाचं हसू आलं. त्याचबरोबर तो योगिनीबद्दल विचार करू लागला.

मकरंद चांगले परीटघडीचे कपडे घालून योगिनीकडे जायला निघाला. तेवढ्यात पोर्चमध्ये गाडी थांबल्याचा आवाज आला. मकरंद बाहेर येऊन पाहू लागला. ती जीप पोलीसांची आहे हे लक्षात येताच त्याला एक प्रकारची भीति वाटली. पोलिसांबद्दल त्याला एक प्रकारची दहशत बसली होती. आताही त्याच्या मनात कालवाकालव झाली. तरीहि मामला काय आहे हे पाहण्यासाठी तो पुढे सरसावला. परंतु जीपमधून विश्वास बाहेर पडलेला पाहून ' मकरंदने हुश्य केले. '

'हॅलो ऽ मकरंद ऽ ! '

'हॅलो माय डिअर फ्रेंड विश्वास ! मी तर प्रथम घाबरूनच गेलो यार ऽ ! '

'अरे पोलीस डिपार्टमेंटची गाडी आहे ही. मोठमोठया गुन्हेगाराचं धाबं दणाणतं. तिथं तुमं काय !' हसत हसत विश्वास उत्तरला व मग पुन्हा बोलू लागला—

'कुठं बाहेर जायची तयारी चाललीय ?'

'हो ऽ! एकाने जेवायला बोलावलंय घरी !'

'अस्सं ऽ! मग मलादेखील ड्यूटी नाही. मीही येतो तुझ्याबरोबर!'

'नको मित्रा ऽ! आज नको – पुन्हा केव्हा तरी !'

'कां बुवा ? पुन्हा का ? एक माणूस खपणार नाही वाटतं !'

'तसं नाही रे ऽ! पण मीही प्रथमच जातोय – तेव्हा ऽ!'

'तर मग आज अगदी चगळ आहे बुवा ! पण काय रे ? ही नवीन पार्टी कसली... ?'

'विश्वास ऽ' ! अस म्हणत मकरदने इकडे तिकडे पाहिले. मग हलकेच तो त्याच्या कानात म्हणाला – 'मी लग्न करतोय विश्वास !'

'खरंच मकरंद ऽ! मला खरंच वाटत नाही !' विश्वास पुटपुटला. नंतर तो मकरंदच्या चेहऱ्यावरील सलज्ज भाव न्याहाळू लागला. क्षणभर मकरंदच्या लग्नाचं कल्पनाचित्र तो पाहू लागला. शेवटी राहवेना म्हणून तो विचारू लागला.

'आशूचं काय ?'

'ती माझ्याजवळच राहील.'

'परतु तिच्या आईला आवडेल का ?'

'तिला ते सारं माहीत आहे. शिवाय आशूदेखील फार आवडते तिला !'

'परंतु मालतीवहिनीचं काय ? तिची शिक्षा रद्द झालीय. तिला सोडून दिलंय !'

'हो ऽ मला कळलं सारं !' ती येथे आली होती. पण मी तिला घराबाहेर हाकलून दिली !' मकरंदच्या शब्दात कडवटपणा आला होता.

'हे तू चांगलं केलं नाहीस, मकरंद !'

' तर काय करायला हवं होतं ? तिला घरात बसवून तिची पूजा करायला हवी होती ? '

' असं काय म्हणतोस तू ? कदाचित् तिचे हृदय ओळखण्यात तू चूक करीत असशील. एका आईचं हृदय आहे ते ! आपल्या मुलीच्या प्राप्तीसाठी ती तुझा प्रत्येक रस्ता अडवू शकते. तुझ्या होऊ घातलेल्या संसाराची धूळदाण करू शकते ! ' विश्वासच्या बोलण्याने मकरंद गप्प झाला. प्रसंगाचे गांभीर्य त्याने जाणले नव्हते. विश्वासचं बोलणं कटु होतं परंतु ते सत्य होतं. तो निपचित होऊन आपली भावी स्वप्ने पहात होता. तेवढ्यात विश्वासने चलण्याची चुळबुळ केली. ते पाहताच काहीतरी बोलायचं म्हणून मकरंद पुटपुटला—

' एवढी घाई कसली मित्रा ? '

' अरे घाई मला नाही, तुला आहे. प्रथमच भावी सासुरवाडीला जेवायला जातो आहेस, अगदी पोटभर जेव; नाहीतर उगाच लाजशील. अच्छा दोस्त ऽ ! बेस्ट ऑफ लक ! ' एवढं बोलून विश्वास निघून गेला.

विचारांच्या चक्रातून बाहेर येत मकरंदने आपली गाडी बाहेर काढली. गाडी हाकता हाकता गाडीचे चक्र फिरत होते. विश्वासच्या उपस्थितीमुळे त्याच्या मनालाही चक्राचीच गती प्राप्त झाली होती. त्याचे मनोविचारचक्रदेखील तसेच फिरत होते. तो सारे विसरण्याचा प्रयत्न करीत होता...पण सारं व्यर्थ !

योगिनीच्या घरात पाऊल टाकताच मात्र तिच्या दर्शनाने अन् आदरसत्काराने मकरंद पुलकित झाला. मनातील सारे विचार कुठल्या कुठं पळाले. घरात गेल्यावर योगिनीने तिची मैत्रीण शालिनी हिची ओळख करून दिली. ओळख संपताच शालिनी घरात निघून गेली. ' मला वाटलं तुम्ही येता की नाही ? हो. मोठी माणसं तुम्ही ! दिलेली वचनं पाळण्याइतके मोठे असाल एवढं ठाऊक नव्हतं ! ' योगिनीने शालिनी नाही असं पाहून संधी घेतली,

' हे काय विचारणं झालं ? तू बोलवावं अन् मी येऊ नये ? '

' आशूला कां नाही आणलं ? '

' मुद्दामच नाही आणलं. येताना ती विचारत होती. मीच ' बोर्डाच्या मीटिंगला जातो ' म्हणून बंडल मारली. शिवाय एवढ्यात तिला कशी माहिती द्यायची ? '

' पण तिला सारं माहीत आहे ! '

' सारं म्हणजे काय ? ' मकरंदने विचारले.

' आपलं दोघांचं नवीन नातं ! ' योगिनी सलज्ज उद्गारली.

' अग, पण तू एवढ्या लौकर तिला कां सांगितलंस ?

' कां ? त्यात काय वाईट आहे ? '

' वाईट नाही. पण ती तुझ्या आगमनाकडे डोळे लावून बसलीय. तू कधी येतेस कायमची, अन् दाईला कधी काढतेस असं झालंय तिला !' मकरंदच्या बोलण्याने मात्र योगिनीच्या अंगावरून एक रोमांच विरून गेला. ती त्याच्या अधिक जवळ जात त्याच्या शर्टच्या बटनाशी चाळा करीत म्हणाली.

' हे बघा ऽ आईला तुम्ही फार आवडला आहात ! '

' म्हणजे नुसते आईला... तुला नाही ? ' तिच्या हनुवटीला स्पर्श करीत त्याने विचारले. दोघांच्या नजरा एकमेकांत मिसळल्या होत्या. योगिनीला तोंडाने उत्तर द्यावे लागले नाही. मकरंदनेहि विचारले नाही. नयनांची अनामिक भाषा बोलत होती. तेवढ्यात चाहूल लागली अन् ती दोघ एकमेकांपासून दूर झाली. योगिनीची आई अन् शालिनी तेथे आली होती. मकरंदने वत्सलाबाईना पाहताच नमस्कार केला.

' आयुष्यवान् व्हा ! सुखी व्हा ! ' कृतकृत्य होत वत्सलाबाई बोलल्या. नंतर त्यांनी मकरंदची विचारपूस सुरू केली. त्यानेही सर्व काही ठीक म्हणून उत्तर दिले. वत्सलाबाई, शालिनी ह्यांच्याशी गप्पा मारीत असता मकरंदने तो छोटा दिवाणखाना न्याहाळाला. तो छोटासा दिवाणखाना आज त्याला सुव्यवस्थित सजविलेला भासला. नंतर वत्सलाबाईंनी पाने वाढली. शालिनीला अन् मकरंदला पानावर बसवून ती आत गेली. पानावर बसता बसता शालिनी मात्र मकरंदला न्याहाळीत होती. आपल्या मैत्रीणीला लाभलेल्या प्रियकराबद्दल ती मनोमन निर्मळपणे

परमेश्वराचे आभार मानीत होती. वत्सलाबाई आत गेलेल्या पाहून मकरंद उभ्या असलेल्या योगिनीला म्हणाला—

'तू बस ना माझ्याबरोबर!'

त्याच्या शेजारी बसायची इच्छा असूनही योगिनी म्हणाली—

'आई काय म्हणेल?'

'आईला काही माहित नाही वाटतं?'

'तरी पण...!'

'पण नाही, कांही नाही. बसून घे पाहू आमच्याबरोबर! शालिनी.

'व्वा! तुम्ही खरंच रसिक आहात...!' शालिनीला मकरंद म्हणाला.

'तेवढ्यात वत्सलाबाई आत आल्या. आत येताच त्यांनी ऑर्डर सोडली—'योगा ऽ तू देखील बसून घे पाहुण्यांबरोबर.'

'आई ऽ मी नाही ऽ! मी तुझ्याबरोबर बसेन.'

'नको ग ऽ! तुही बसून घे त्यांच्याबरोबर! मी बसेन शेवटी बाईबरोबर! समजलं. बस तू. अग शालिनी, आज ना उद्या ही दोघं एकत्र जेवणार आहेत. आणि आता माझ्या नजरेसमोर जेवायला लाजतात.'

'हे बरीक खरं हं आई! उगाच आपल्याला देखावा दाखवितात. ह्यापूर्वी कित्येक वेळा हॉटेलात एकत्र जेवली असतील! काय आई?' शालिनीने वत्सलाबाईंना दुजोरा दिला.

'नाही' 'होय' करता मकरंद, योगिनी अन् शालिनी यांची जेवणं सुरू झाली. वत्सलाबाई आत गेल्या. अर्धं जेवण होताच, त्यानी आतून मध्या वाढण्यासाठी बाईना पाठविले. योगिनी, शालिनी ह्यांना वाढून वाढणी बाई मकरंदकडे सरकली. मकरंद खाली मान घालून पानावर आडवा झाला. त्याला अधिक काही नको होते. 'नाही, नाही, रमाबाई, वाढा थोडं!' योगिनीच्या आदेशानुसार रमाबाई वाढण्याची तत्परता दाखवू लागल्या. परंतु 'नको' म्हणण्यासाठी मकरंदने समोर पाहिले. समो-

रील बाईला पाहताच त्याची वाचाच बंद झाली. कारण ती वाढ-णारी, रमाबाई या नावाने मिरवणारी, त्याची पत्नी मालती होती. त्याला मेल्याहून मेल्यागत वाटले. त्याच्या सबंध शरीरात बधीरता आली होती. मालती निघून गेली. परंतु मकरंदला जेवणं अवघड वाटू लागलं. अर्धवट जेवण उरकून तो पानावरून उठला. शिष्टाचाराला धरून आपण वागत नाही हे लक्षात येऊनहि तो तसा वागत होता. त्याची मती कुंठित झाली होती.

जेवणे आटोपल्यावर योगिनीने मकरंदला खूप छेडले तो मात्र गप्प होता. शेवटी रमाबाई जेव्हा पानाचे तबक घेऊन आल्या, तेव्हा योगिनीने पानाचा विडा समोर केला. तो खाण्यास नकार देत होता; पण तिने जबरदस्तीने विडा त्याच्या तोंडात टाकला. ते दृश्य पाहू-णाऱ्या मालतीचा मात्र भडका उडाला. तिचे हात थरथरू लागले. आणि थरथरणाऱ्या हातातून पानाचे ताट खाली पडले 'माफ करा... ताईसाहेब...' अस काहीतरी पुटपुटत ती आत पळाली.

'थोड्या वेळाने मकरंद सर्वांची परवानगी घेऊन जायला निघाला. तेवढ्यात योगिनीने 'बाई, अहो रमाबाई ऽ ! आईला म्हणाव, पाहुणे निघालेत ! ' साद घातली.

'काय ग ऽ योगा, ही रमाबाई कोण ? ' शालिनीने प्रश्न केला.

'बाई ना ऽ ? अग परवा आई मंदिरात गेली होती तेव्हा ही बाई म्हणे देवळाच्या बाहेर दीनवाणी बसली होती. आई चार पैसे भीक द्यायला गेली, तर तिने भीक घेण्यास नकार दिला. म्हणाली, 'मला एखादी नोकरी द्या. घरकामाची असली तरी चालेल. मुलगी साभाळीन. आईला दया आली. तिन बाईला या घरकामात मदतीसाठी ठेवून घेतलं. ' योगिनीने रमाबद्दल माहिती पुरविली. मकरदने देखील कान देऊन सर्व ऐकले.

'तुझी आई हुषार आहे ह ऽ ! मुलगी जाणार म्हणून आधी-पासूनच तयारीला लागली. शालिनीचा शेरा. मकरंदला मात्र ते

सारं असह्य होतं होतं. तेवढ्यात वत्सलाबाई बाहेर आल्या. त्यांना पाहून मकरंद म्हणाला--

'आई ऽ ! !ही काय पूर्वतयारी योजली आहे. ? लग्नानंतर तुम्हालाही मी आपल्या घरी घेऊन जाणार आहे.

' अहो, योगाचं लग्न लागून दिलं, तिला तुमच्यासारखा चांगला सद्‌गुणी पती लाभला, आणखीन काय हवंय मला ? तुम्ही तुम्हाला मधुचंद्राला वगैरे जायच असेल, तेव्हां खुशाल दोन-तीन महिने जाऊन या. माझ्या म्हातारीचा कशाला उगाच त्रास ? ' शेवटी विनोदाचं आवरण घालीत वत्सलाबाईनी सारवणी केली. मकरंद सर्वांचा निरोप घेऊन परतण्यास निघाला.

विचार करीत गाडी हाकीत मकरंद नाक्यावर आला. तोच त्याच्या गाडी समोर एक श्वेतांबरी आडवी आली. त्या व्यक्तीला पाहताच मकरंदने गाडी उभी केली; मागील दरवाजा उघडला. ती व्यक्ति मुकाट्याने आत येऊन बसली. मकरंद न बोलता गाडी हाकीत होता. ती व्यक्ति बोलण्यासाठी चुळबुळ करीत होती, पण त्याने इशाऱ्यानेच तिला गप्प बसविले. मकरंदने गाडी आपल्या बंगल्यात आणली. पुढे चालत, मागील व्यक्तीला त्याने आपल्या पाठोपाठ येण्यास इशारा केला. मकरंद द्रुत गतीने चालत आपल्या तिजोरीच्या खोलीत आला. ती व्यक्तीही आली. त्याने तिजोरी उघडली. त्यातील नोटांची पुडकी समोरील व्यक्तीच्या अंगावर फेकीत तो बोलू लागला---

'यापुढे तुला नोकरी करण्याची गरज नाही. आशूची किंमत किती तेवढं सांग; अन तुला पाहिजे तितकी रक्कम घेऊन जा.'

' पण एवढे पैसे घेऊन काय करू मी ? मला माझी आशु हवीय. पैसे नकोत. मला जर आशु मिळाली नाही तर हाय खाऊन मरेन मी.' मालती.

' आशूसाठी उगाच नाहक त्रास घेऊ नकोस. हे पैसे घेऊन आरामात जग. तुला काही कमी पडणार नाही. फक्त माझ्या पैशासाठी !

प्रेम होतं ना ? मग आता मी देतोय तो पैसा कां नको ? अन् विना-सायास देतोय... त्यासाठी खून करायची गरज नाही... '

' नका हो ऽ ! माझ्या जखमांवर डागण्या देऊ नका मी. आंधळी झाले होते. फितुर झाले होते. मालती केविलवाणी बोलू लागली.

' ही नाटकी भाषा बंद कर. हे पैसे उचल अन् चालती हो ! '

' नाही जाणार. एका हृदय फाटलेल्या अपराधी स्त्रीकडे धैर्याशिवाय काही शिल्लक रहात नाही, हे आज दाखवायचं आहे मला. आजपर्यंत ह्या धैर्याला मी वाट करून देत होते; पण आता ते शक्य नाही. ' मालती त्वेषाने उद्गारली.

' म्हणजे ? ' मकरंद मोठ्यांदा ओरडला.

' जर तुम्हाला योगिनीशी लग्न करायचं असेल तर त्याची किंमत मोजावी लागेल ! '

' ती मोजायला मी तयार आहे ! '

' नाही चुकविली तर ? '

' तर काय ? '

' तर ह्या घडलेल्या साऱ्या नाटकाचा बट्ट्याबोळ करीन. तुमची दोघांची स्वप्ने जाळून राखरांगोळी करीन. आता जी योगिनी तुम्हाला देव मानते ती सैतान समजू लागेल... ' मालतीने शह दिला.

' म्हणजे हे सारे तू तिला सांगणार तर ! '

' नाही सांगणार ; पण एका अटीवर. मला माझी आशु द्या.

' पण...पण...आशूसाठी मी वचनबद्ध आहे. तुला ठाऊक आहे. ' मकरंद.

' पण मी तिची आई आहे. तुम्हाला योगिनी मिळणार आहे. पण मला फक्त आशु हवीय, अधिक काही नको ! – "

मालती खूप वेळ त्याला आपली व्यथा सांगत होती. मकरंद ऐकत होता. ऐकता ऐकता तो विचार करीत होता. आशु कां योगिनी ? विचारधारांनी त्याच्या अंगावर घामाच्या धारा वाहू लागल्या. दोन मनांचं द्वंद्व सुरू झालं. खूप वेळ तिजोरीला डोके टेकून तो विचार करू

लागला. शेवटी त्याने फेरविचार केला, व कठोर होऊन आशु मालतीला देण्याचे निश्चित केले. मकरंदला त्यावेळी विश्वासने मागे सांगितलेले, सारे आठवले होते. स्त्री ममतेविषयी त्याला आत्मीयता वाटली.

' मालती, मी आशूला तुझ्याकडे सोपविण्यास तयार आहे. पण एक लक्षात ठेव. तू तिची आई आहेस हे कदापि तिला कळता कामा नये. तू तिची मावशी आहेस असंच भासव तिला; आणि येथून कुठेतरी दूर घेऊन जा. मी दर महिन्याला तुला पैसे पाठवीन. त्यातून माझ्या आशूला शिक्षण दे. मोठी कर. एकादा चांगलासा मुलगा पाहून तिचं लग्न लावून दे... ' मकरंद एखाद्या लहान अर्भकाप्रमाणे रडत मालतीला सांगत होता. मालती मात्र आपण जिंकलो ह्या तोऱ्यात उभी होती.

मकरंद बाहेर आला. त्याने झोपेत असलेल्या आशूला गाडीत घातले. मालती गाडीत बसली. मकरंदने त्या दोघांना स्टेशन वेटिंग रूमपर्यंत आणून सोडले. त्याने पाच हजारांची रोकड मालतीकडे सोपविली. अन् तो परत आला. आज आशुविरहित आपल्या घरात पाऊल टाकताना त्याचा उर दाटून आला. दिवाणखान्यात येऊन पाहतो तो वृद्ध गोपीकाका आशूच्या तस्बीरीला छातीशी लावून ओक्साबोक्सी रडत होता. झाला प्रकार त्याने पाहिला होता. पण पुढे येण्याची हिंमत मात्र त्याच्यात नव्हती ! गोपीच्या हंबरड्याने अन् मकरंदच्या रुदनाने त्या बंगलीला एक प्रकारची भेसूरता प्राप्त झाली होती.

: ४ :

मकरंद आज बोर्डाच्या मीटिंगला गेला नव्हता. आपल्या सह-काऱ्यांना जेव्हा त्याने येणार नसल्याचे सांगितले, तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. मकरंद जरी त्या फर्मचा मालक होता तरी तो इतर मालकांप्रमाणे नव्हता. वास्तविक त्याचं वय ऐन तारुण्यातलं होतं.

त्या जागी दुसरा मालक असता तर सर्व भार सहकाऱ्यांवर टाकून त्याखखुशालीत राहिला असता. परंतु मकरंद वडिलोपार्जित उद्योगधंद्यावर जातीने लक्ष देई. बडया कत्राटदारांना तो स्वतः भेटत असे. उमद्या स्वभावामुळे त्याला अधिकाधिक काम मिळत होते. काल सहकाऱ्यानी त्याच्या अनुपस्थितीबद्दल चुळबुळ करताच तोच त्यांना म्हणाला होता——

' मित्र हो, तुम्हाला आश्चर्य वाटणे साहजिकच आहे. पण पुढील बातमी ऐकून तुम्हाला अधिकच आश्चर्य वाटेल ! '

' म्हणजे ? ' सर्वांनी एकच उद्गार काढला.

' मी लग्न करतोय ! ' मकरंदचे तीन शब्द.

' दुसर ? ' कुठून तरी एक आवाज आला.

' होऽ ! ' त्याने निर्भीडपणे उत्तर दिले.

लागलीच सर्वांनी मकरंदवर अभिनंदनाचा वर्षाव केला. मकरंदच्या मनात त्या सर्वांच्या प्रेमाने आनंदाची उकळी आली. लग्नानिमित्त त्याने कंपनीच्या कामगाराना एक महिन्याचा बोनस जाहीर केला. त्याच्या त्या घोषणेनं तर सर्व सहकाऱ्यानी अन् कामगारानी मकरंदला अक्षरशः डोक्यावर घेऊन नाचविले. सर्वांचा आनंद द्विगुणित झाला होता.

आज मकरंद घरी राहिला होता, तो केवळ योगिनीला बरोबर घेऊन तिच्या पसतीने लग्नाच्या साडया, दागदागिने इत्यादि वस्तूंची खरेदी करण्यासाठी. आता बसल्या बसल्या तो यादी करीत होता. सर्व निवडक वस्तू खरेदी करून अगदी थाटामाटात लग्न सोहळा साजरा करायचा त्याचा विचार होता. कागदावर पन्नास एक कलमे तयार झाली तरी तो डोकं खाजवीत बसला होता. अधून मधून दरवाजाकडे लक्ष फेकीत होता. कधी एकदा योगिनी येते अस त्याला झाल होतं. योगिनी एक सुदर सोज्वळ आणि सुसंस्कृत तरुणी होती. मकरंदने तिला नोकरीचा राजिनामा द्यायला लावला होता. मेट्रन शांताबाईंना भेटून त्याने लवकरात लवकर तो पासदेखील करून घेतला. शांताबाईंनी मकरंदच्या निवडीबद्दल त्याचे तोडभर कौतुक केले. पण उलट, हा अमोल ठेवा तुमच्याच खाणीत

सापडला, असं काही सांगून मकरंदने बाईंचे आभार मानले. आणि खरंच होतं ते. जर शांताबाईंनी पहिल्या वेळी आशूबरोबर तिला त्यांच्या घरी पाठविले नसते तर योगिनी अन् मकरंद कधीच जवळ आले नसते. पण ही सारी योगायोगाची किमया. जीवन हा एक विचित्र योगायोग आहे असं म्हणतात ते सत्य आहे.

मकरंदला योगिनी जशी खूप आवडली होती, तशी ती देखील त्याच्यावर खूप प्रेम करीत होती. आता विचार करता करता तो मनोमन म्हणू लागला— 'खरंच ह्या योगिनीसाठी माझं आशूवरील प्रेमदेखील कमी झालं. योगिनी आणि आशु ह्यापैकी मी आता माझं सर्वस्व योगिनीला अर्पण केलं आहे. योगिनीशिवाय माझं जीवन शून्य आहे. योगिनीशिवाय जगणे म्हणजे सूराविना गीत. किंबहुना सुगंधाविना फूल ! त्याचा आत्मा योगिनीमय झाला होता. परंतु त्यासाठी, आशूला मालतीच्या स्वाधीन करताना त्याला झालेली जखम आशूच्या आठवणीने चिघळून निघे. तो विव्हळे. मनोमन रडे ! ज्या आशूला त्याने जिवाच्या तुकड्यागत जपलं, तळहातावरील फोडाप्रमाणं लहानाचं मोठं केलं, आई-वडिलांची एकपात्री भूमिका करून प्रेम दिलं, ती आशु आज त्याच्याजवळ नव्हती. स्त्रीच्या ममतेपुढे व धैर्यापुढे तो हरला होता. एका प्रियकरणीसाठी त्याने हार पत्करली होती. पुरुषाला स्त्रीला जिंकणे किती कठीण असते याची त्याला प्रतीती आली होती. ममतेचा जबरदस्त तडाखा जाणवला होता. एका आईच्या अपत्यप्रेमापुढं त्याचा विश्वास डळमळला होता...कां एका स्त्रीच्या प्राप्तीसाठी त्याने आपला मार्ग सुकर करून घेतला होता ? रिकाम्या मनात तो प्रश्नांची उत्तरे शोधत होता. पण प्रयत्न व्यर्थ होता. शेवटी जे झालं ते झालं. आता फक्त योगिनीला सुखात ठेवायचं, असा मनोमन विचार करून तो योगिनीच्या आठवणी आठवू लागला. चित्रपटावरील जाहिरातीप्रमाणं एका पाठोपाठ आठवणी सरकत होत्या. होता होता चार दिवसांपूर्वीच्या स्मृतिलहरी त्याच्या चक्षूसमोर येऊन स्थिरावल्या. त्या आठवणींनी देखील तो उत्तेजित झाला...........

"योगिनीचा परिचारिका म्हणून तो शेवटचा दिवस होता. त्या दिवशी ती सर्वांना भेटणार होती. नोकरी सोडण्याचं गोड कारण सांगणार होती. तिच्या मैत्रिणी त्याबद्दल तिची गोड थट्टा करतील, कुणी मकरंदसारखा जीवनसाथी लाभल्याबद्दल तिची स्तुती करतील, अशा प्रकारचे विचार मनात आणीत योगिनी ड्यूटीवर जायला निघाली. जाता जाता रस्त्यात तिला वाटलं की, मकरंदच्या बंगलीवरून होऊनच जावे. आज उशीर झाल्याबद्दल अडचण नव्हती. आणि खरोखरच ती मकरंदच्या बंगलीत शिरली. मकरद नुकताच फर्मवरून फेरफटका करून आला होता. योगिनी सरळ त्याच्या बेडरूममध्ये गेली. त्याच्या हाता तील वर्तमानपत्र अनाहुतपणे काढून घेत तिने त्याला चकित केले. तिला अचानक आलेली पाहताच तो आश्चर्यात सापडला. त्याने तिचा हात धरला अन् तिला आपल्या जवळ ओढलं.

'एऽसोड नाऽमाझं पातळ! ते चुरेल. ड्यूटीवर जायचं आहे मला.'

'अं हूं ऽ! आज नाही जायचं ड्यूटीवर. आज तुझी ड्यूटी इथं.'

'पण आज शेवटचा दिवस आहे. आज मला सर्वांना भेटायचं आहे!'

'मी सांगतो तसं कर! उद्या आपण दोघांनी मिळून सर्वांना जाऊन भेटू. मग तर झालं? पण आज तू इथ थांब. हल्ली तू माझ्यापासून दूर झाल्यावर मला करमत नाही!'

'पण शांताबाई काय म्हणतील?'

'मी त्यांना फोन करतो – तू आजारी आहेस – नाही म्हणजे तुला बरं नाही –'

'अं हूं ऽ! तो उठलेला पाहून त्याला खाली बसवीत ती म्हणाली. परंतु खाली वाकताच त्यानं तिच्या ओठावर ओठ ठेकून तिचं एक गोडसं चुंबन घेतलं. योगिनीदेखील प्रसन्न झाली. तेवढ्यात संधी साधून तो उठला अन् त्यानं खरोखरच फोन केला. तेवढ्यात योगिनी बुळबुळ करीत त्याच्याजवळ आली. पण एका हाताने त्यानं तिचं तोंड बंद करून ठेवलं होतं. ती त्याच्या वक्षावर विसावली होती. शांताबाईंनी

'काही हरकत नाही' असा शेरा दिला, तेव्हा त्यांचे आभार मानून त्याने फोन खाली ठेवला. दोन्ही हातांनी योगिनीचा मुखचंद्रमा समोर धरीत त्यानं विचारले—'आता बोला राणी सरकार!' आणि एकटक तो तिच्या वदनकलिकेला पहात देहभान विसरला. मग त्याने अगदी हलकेच तिला आपल्या जवळ ओढली अन् तिच्या डाळिंबी दाण्याचे परिपक्व ओष्टद्वय आपल्या ओठांनी टिपले. हलकेच तो पुन्हा तिला बेड-पर्यंत घेऊन गेला.

'आज हॉस्पिटलची ड्यूटी संपेपर्यंत तुझी ड्यूटी स्पेशल पेशंटकडे! समजलं?' त्याने तिला पलंगावर बसवीत, गोपीला हाक मारून दोघांसाठी भरपूर नाश्ता आणून ठेवण्यास सांगितले. गोपीने आपले काम बजावेपर्यंत तो तिच्यापासून दूर बसून गप्पा मारीत होता. गोपी नाश्ता ठेवून गेला. मकरंदने दरवाजा लावून घेतला अन् योगिनीला फराळ करण्याची आज्ञा तो करू लागला. लाडात येऊन तो तिला भरवू देखील लागला!

'ए ऽ! लग्नात घास भरवायचाच आहे. आणि आत्ता हे काय?'

'अग हा लग्नापूर्वीचा घास. समजलं?' असं म्हणत तोंड न उघडणाऱ्या योगिनीचं त्यानं तोंड उघडलं. नाश्ता संपविल्यावर योगिनीने इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या, व ती जाण्याची परवानगी मागू लागली. उगाचच – लटकी!

तेवढ्यात मकरंद हलकेच योगिनीच्या समीप गेला अन् तिला त्याने आपल्या मिठीत अचानक सामावून घेतले. तिच्या शरिरातून रोमांच फुलून आला. तीही त्याला अधिकाधिक बिलगत त्याच्या मिठीत शिरू लागली. मकरंदने तिच्या ओठावर ओठ टेकले. एक दोन तीन अनेक वेळा तो ते चाखू लागला. तीही त्याला साथ देऊ लागली. हळू हळू मकरंद तिच्या शरिरावर संपूर्णपणे झुकू लागला. तशी योगिनीच्या मनात भीतीची एक लहर शहरून आली. तो तिच्या पोलक्याच्या गुंड्या सोडू लागला. योगिनीनेच पोलके शरीरावेगळे केले. नंतर मकरंदने कंचुकी देखील शरीरावेगळी केली. पिंजऱ्यातील पक्षी स्वैर

झाले. योगिनीचे उभार पुष्ठ उरोज पाहताच मकरंदला उन्मादाची नशा चढली. तो त्या पक्षांशी खेळू लागला. अगदी तल्लीन होऊन...

'ए ऽ, हळू ना ऽ!' योगिनी सलज्ज बोलून गेली. परंतु ह्यापुढे 'त्याला आवरायला हवं!' असा ती विचार करीत होती. आणि खरोखरच सुखाचा अंतिम खजिना लुटण्यासाठी मकरंद उत्स्फूर्त हालचाल करू लागला. तेवढ्यात योगिनी त्याला म्हणाली. 'नाही ऽ नाही ऽ, मकरंद हे बरं नाही! तुझी भावना एवढ्यापर्यंत नेऊन माझ्या मनात तू तुझ्याबद्दल विकल्प निर्माण करू नकोस!'

'योगाऽ अग वेडे! मी काय करतोय? उद्या तुझं माझं लग्न होणार आहे. तुझा उद्याचा पती आहे मी. आजपर्यंत खूप वाट पाहिली. माझ्यातील तारुण्याचा ज्वालामुखी मी थोपवून धरला. पण योगा! आता ते शक्य नाही. योगा ऽ, तू अन् मी एक व्हायला हवं ऽ! अगदी संपूर्णपणे!'

'नाही मकरंद – लग्नाआधी ही गोष्ट म्हणजे पाप आहे!'

अग, दुष्यंतासारख्या राजाने लग्नाआधी हीच गोष्ट केली शकुंतलेशी. पवित्र वातावरणातील गुरुकन्या शकुंतला, ती देखील अत्यंत प्रेमापोटी दुष्यंताला नाकारू शकली नाही. तिथं तुझा माझा काय पाड योगा ऽ! अशा अद्वैत प्रीति-मीलनात एक महाकाव्य असतं! हे मीलन पुण्याहून पुण्य आहे, लक्षात ठेव!'

'पण मकरंद, त्यासाठी शकुंतलेला किती खस्ता खाव्या लागल्या, ह्याची तुम्हा पुरुषांना काय कल्पना?'

'अग पण... तुला कसल्या खस्ता खाव्या लागणार आहेत? आपलं दोघांचं लग्न म्हणजे काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे. योगा ऽ, तुला माझ्याबद्दल अविश्वास वाटतो का?'

'तसं नाही – पण...' योगिनीला त्याला काय सांगावे ते सुचेना.

'अग वेडे! वासनेवाचून प्रेम म्हणजे सुगंधावाचून फुल, सूराविण गीत, तेलावाचून दीप, किंबहुना आत्म्यावाचून शरीर! तू जर विरोध करीत असशील, तर मी आजतागायत माझ्या मनाला आवर घालत

तसा पुढेही आवर घालीन. परंतु तुझ्याबद्दल मी एवढा विश्वास दाखवावा अन्...जाऊन येतेस ना हॉस्पिटलमध्ये ? ' मकरंदने विषय बदलला.

मकरंदच्या बोलण्याने मात्र योगिनीला त्याच्या विचाराचे कौतुक वाटले.

मोठ्यांदा हसत तो उठलेला पाहून तिने त्याला आपल्याकडे ओढून आपल्या कवेत बंदिस्त केले. ती त्याचे ओठ-गाल-डोळे जे मिळेल ते चाखू लागली. तिच्या नयनांच्या परवलीने त्याला परवानगी दिली. मकरंद अन् योगिनी सुखाच्या आवर्तात केंद्रबिंदूकडे जात होती. मकरंद सुखगंगेत डुंबत होता. पोहता न येणाऱ्या व्यक्तीगत तो अधिकाधिक खोल खोल गेला... "

यादी करता करता मकरंदला लग्नापूर्वीच्या मधुचंद्राची आठवण झाली. आताहि त्याच्या अंगावरून रोमांच विरून गेले. कधी एकदा योगिनीचं अन् आपलं लग्न होतं, अन् आपण तिला खरोखरीच मधुचंद्राला घेऊन जातो, असं त्याला झालं होतं ! विचार करता करता त्याने काश्मीरच्या मधुचंद्राबद्दल एक कलम यादीत सुपूर्त केले. तेवढ्यात दारावरील ' टक ऽ टक ऽ ' आवाजाने मकरंद भानावर आला. मधुचंद्रासारख्या गोड विचारांतून बाहेर काढल्यामुळे त्याला बाहेरच्या टकटकीचा राग आला होता – अगदी कटकटीगत. दार उघडून त्याने बाहेर पाहिले तो एक उंची घराण्यातील स्त्री अन् मागे गोपी होता. त्या स्त्रीला त्याने पूर्वी पाहिले नव्हते.

'कोण हवंय आपणाला ? ' मकरंदने औपचारिकपणे विचारले.

' मकरंद विचारे तुम्हीच का ऽ '

' हो ऽ '

' ही तुमचीच मुलगी का ? तेवढ्यात तिने इतका वेळ आपल्या मागे लपविलेली आशु पुढे करीत विचारले. आशूने मकरंदला समोर पाहताच तिने त्या स्त्रीला हिसडा देऊन आपली सोडवणूक करून घेतली, अन् ! ' डॅडी ऽ डॅडी ! ' असा टाहो फोडत

ती त्याला बिलगली ! त्या स्त्रीला कृतीने उत्तर मिळाले. ती देखील मंद स्मित करीत सांगू लागली–.

' पुण्या मुंबईच्या रस्त्यावर ही रडत रडत धावत होती. मध्येच अचकत-बिचकत होती. मी गाडी थांबवून चौकशी केली तशी मला तिने नाव पत्ता सांगितला. हिच्या हुषारीवर मी खुष झाले. हल्ली लहान मुल पळविण्याची टूम निघाली आहे. 'अशा पुष्कळ टोळ्या झाल्या आहेत. पोलीसाना देखील दाद लागत नाही. पण तुमची मुलगी धीट निघाली. तिने आपली सोडवणूक करून घेतली. आता मात्र तुम्ही हिचा नीट सभाळ करा. ! '

' मी आपले आभार कोणत्या शब्दात मानू ? खरंच. माझ्या घरची गेलेली शोभा तुम्ही मला परत मिळवून दिलीत ! या. बसा ना. गोपी ! कॉफी अन फराळ आण पाहू ! ' मकरद अगदी भारावून बोलत होता.

' छे. छेः कॉफी वगैरेची काही गरज नाही. मुलगी तुम्हाला मिळाली; मला आनद झाला. अर्थात् यात तुमच्या मुलीच्या चातुर्याचं यश अधिक ! अहो मला वाटेत सागत होती की एका बाईने ' तुझी मी मावशी–आहे ' अस सागून तिला आपल्या घरी नेल ! काय तरी आजकालचा जमाना बघा! स्त्रियासुद्धा आई-मावशी असं सागून सरळ श्रीमताच्या मुलाना पळवितात. त्याच्याकडील दागदागिने काढून घेतात अन् त्याना भीक मागायला लावतात. त्यासाठी त्या मुलाचा एखादा हात अगर पाय तोडण्यास देखील त्या मागेपुढे पाहत नाहीत. काही काही पालकाकडे दहा-पाच हजार रुपयाची मागणी होते. ते पैसे मिळाल्यावर त्या ती मुल परत करतात ! छी. छीः ! आपल्या शासनाने ह्या गोष्टीकडे लक्ष पुरवायला हव ! नाहीतर ही गुडगिरी वाढतच जाईल ! तुम्हाला कसं वाटत ? ' त्या बाईनं छोटस लेक्चर दिल.

' हो. पण तुम्ही बसा ना ! ' पुन्हा मकरदने आग्रह केला.

' छेः हो ! मला बसायला वेळ नाही. एका महत्त्वाच्या कामाला जायला हवं. वाटेत हे निघालं – जाऊ दे – चलते मी. येईन कधी तरी सवड काढून. '

'या हं ऽ ... जरूर ऽ !' तिला व्हरांड्यापर्यंत पोचवायला आलेला मकरंद म्हणाला. गाडी चालू करतच तिने मानेने होकार दिला. गाडी दिसेनाशी होईपर्यंत मकरंद आशूला घेऊन तसाच उभा होता. मग आशुला आपल्या हृदयाशी लावीत 'आशु ऽ आशु ऽ ऽ !' अशी साद घालीत तो तिचे अगणित मुके घेत होता. तेवढ्यात आशु खाली उतरत त्याला सांगू लागली–

'डॅडी, डॅडी ऽ ऽ ! मावशी आहे ना ती फार वाईट आहे ! तिचं घर पण वाईट आहे. अंधार गुडुप ! दिवा देखील नाही ! आणि डॅडी ऽ ! ती सारखी मला आई म्हणायला सांगायची. मी तिला सांगितलं की माझी आई देवाघरी गेली; तर ती मला खूप मारायची ! डॅडी ! मी आता कधीच मावशीकडे जाणार नाही. मी तुमच्याकडे राहीन. ठेवाल ना तुम्ही मला. त्या मावशीला आपल्या घरी घ्यायचं नाही हं ऽ डॅडी ! – आणि... '

आशु खूप खूप सांगत होती. त्या चिमुकल्या जीवाला मिळालेल्या वागणुकीमुळं मकरंदला फार दुःख झाले. तिला अधिक बोलू न देता त्याने तिच्या गाला–ओठांचे जोराजोरात पापे घेतले. तेवढ्यात कुणाच्या तरी पावलांची चाहूल लागली. त्याच्या दिशेने चाहूल जवळ जवळ येत होती. मकरंद क्षणभर घाबरला. जणु पुढे येणाऱ्या एखाद्या संकटासारखी ती चाहूल त्याला भासली. एका पाठोपाठ एक घडत गेलेल्या घटनांचा तो विचार करीत होता. त्यामुळे त्याच्या मनावर संकटाची छाया दाटली असेल कदाचित ! मकरंदने समोर दृष्टी टाकली आणि खरोखरच एक मूर्तीमंत संकट आ वासून त्याच्यापुढे येत होतं. मालती विस्फारलेल्या नेत्रांनी महिषासुर मर्दिनीच्या आवेशात त्याच्यासमोर उभी ठाकली. तिचा अवतार भेसूर अन क्रूर भासत होता. मकरंदच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत जाऊन भिडली. त्या ऊर्मीत त्याने कसला तरी दृढ निश्चय केला. त्या निश्चयाला होकार देण्यासाठी एकदा त्याने हलकेच मान हलविली. आशूला खाली उतरवीत तो तिच्या अगदी जवळ जात तिला म्हणाला.

' आता पुन्हा येथे कशाला आलीस ? सबंध जग पडलंय. कुठल्या तरी कोपऱ्यात जाऊन आपलं तोंड काळं कर ! '

' मी येथे का आलेय ? मी माझा अधिकार घ्यायला आलेय ! ' मालती देखील सतापली.

' जी स्त्री आपल्या ममतेच्या जोरावर आपल्या मुलीला जिंकू शकत नाही, निर्बोध बाल अंत:करणात आपल्याविषयी प्रेम निर्माण करू शकत नाही. त्या स्त्रीला अधिकार मागण्याचा हक्क पोहोचत नाही. प्रथम कर्तव्य बजावण्यास शिक. ममतेची नुसती भाषा बोलून वाफ दवडण्यापेक्षा कुठे तरी जाऊन ममतेचे धडे शीक. वात्सल्याची पखरण करायला शीक. आणि मग ये आपला अधिकार मागायला ! '

' का ? निर्बोध बालमनावर खोट्या प्रतारणेचा ठसा उमटवून माझ्या अधिकाराची पायमल्ली करण्याचा तुम्हाला काय अधिकार ? तिला खर सागा की मी तिची आई .. '

' मालती – एक शब्द जरी पुढे बोलशील तर याद राख ! ' तो आणखी खूप बोलणार होता. त्याचा क्रोध अनावर झाला होता. पण आशूची घाबरलेली दीन मुद्रा पाहून तो गप्प झाला त्याने आशूला बाहेर जाण्याची खूण केली... ' जा आशुबेटा ! गोपी–काकाबरोबर बागेत खेळ जा ! ... गोपी ऽ गोपी... ! '

इतक्यात गोपी तेथे आला. आशु गोपीचा हात धरून बागेत गेली मालती-मावशीला पाहून ती पुन्हा घाबरली होती. भीतीने अन् मकरंदच्या समजावण्याने ती खरोखर बागेत आली. तेवढ्यात व्हराड्यात अल्लड मुलाप्रमाणे लाघवी हसत येणारी योगिनी तिला दिसली आशु गोपीला सोडून सरळ योगिनीकडे धावत गेली. तिच्या कमरेला विळखा घालीत ' आटी ऽ आटी ऽ ऽ ' म्हणून ती तिला झोंबू लागली. खूप दिवसानी आशूला पाहिल्यामुळे योगिनीनेही तृप्त होऊन तिचे पटापट मुके घेतले आणि ती आत जाऊ लागली. तेवढ्यात आशु तिला म्हणाली–

' आंटी, तू आत जाऊ नकोस ! '

' कां ऽ कां ग ऽ ? '

' तेथे एक बाई आली आहे. ती राक्षसीण आहे. ती मला म्हणते आई म्हण ! डॅडींनी सांगितले ती मावशी आहे म्हणून ! आत की नाही, ती डॅडीबरोबर भांडते आहे ! ' तिच्या त्या बोलण्याने योगिनीचा आनंद थोडासा मावळला. एखादी स्पीड मधील गाडी अचानक ब्रेक डाऊन होऊन मंद व्हावी तद्वत् ! परंतु योगिनीने आपल्या चेहऱ्यावरील भाव तसेच ठेवण्याचा प्रयत्न करीत आशूची गोड शब्दात समजूत घातली अन् चाहूल न लागू देता ती मकरंदच्या खोलीजवळ जाऊन उभी राहिली. अलगद दारावरील पडदा वर करीत ती आतील दृश्य पडताळू लागली. आत मकरंद एका स्त्रीबरोबर वितंडवाद घालीत होता. ती स्त्री तिला पूर्ण दिसत नव्हती. पण मकरंद मात्र जोरजोरात बोलत होता. आजपर्यंत त्याला एवढा भडकलेला तिने पाहिला नव्हता. ती त्यांचे बोलणे ऐकू लागली.

' बघ मालती, तू जर माझ्या घराला नष्ट करण्याचा प्रयत्न केलास, तर मी तुला जिवंत सोडणार नाही. तुझा खून देखील करायला मी मागेपुढे पाहणार नाही. अगदी सुशिक्षितपणाची मर्यादा ओलांडण्यांची माझ्यावर पाळी आली तरी मी ती लक्ष्मणरेषा ओलांडून, मवाल्यातील मवाली बनून तुला ह्या जगातून नाहीसे देखील करीन! '

' मकरंदच्या चढेल आवेशातील त्या क्रूर भाषणाने योगिनी अगदी सर्द होऊन गेली. तिला एक प्रकारची भीतिदेखील वाटली. नकळत तिच्या हातून पडदा सुटला. पडद्याआडून त्यांचे पुढील संवाद ती कान लावून ऐकू लागली. ऐकता ऐकता अति आश्चर्याने ती मनोमन विचार करू लागली. ही मालती कोण ? मकरंद अन आशूशी हिचा काय संबंध ? आशूचं मघाचं बोलणं ? आशु आपल्या मावशीकडे गेली होती ना ? ती विचारचक्रात गुरफटली जात होती. तेवढ्यात त्या स्त्रीचं बोलणं तिच्या कानावर पडू लागलं.

' ह्या दुःखमय जीवनातून तुम्ही तुमच्या हाताने माझी मुक्तता कराल तर बरंच होईल. हे केविलवाणं जिणं जगण्यापेक्षा मरण ओढवलं तर मृत्यूचे उपकारच मानीन मी ! '

' तर जा. मर जा– माझ्या समोरून तुझं हे काळं तोंड कुठल्याहि अंधारात जाऊन लपव – अगदी कायमची त्या अंधारात विलीन हो ! '

' पण मला तसं मरावसं वाटत नाही. तुम्ही स्वतःच्या लग्नाचा बेत रचावा, आनंद-प्रमोद मानावा, जीवनातील खुषी लुटावी; ... आणि मी मात्र माझ्या मुलीचा चेहरा पाहण्यासाठी तळमळत रहात, माझ्या ममतेची सरिता आटवावी; हा कोणत्या जगातला न्याय ? एखाद्या पापाबद्दल ईश्वर देखील क्षमा करतो तुम्ही तर मानव आहात. तुम्हाला एवढं कठोर होऊन जर मला शिक्षाच द्यायची असेल तर तुमच्या घरात मला मोलकरीण म्हणून ठेवा. वचन देते, मी कधीच तोंड उघडणार नाही ! यापुढे आशूला कधीच सागणार नाही, की मी तुझी आई आहे म्हणून ! विचार करा ! एका आईची करुणा तुम्हाला विनवीत आहे. ममतेची भीक घाला मला ! ' असं म्हणत मालती खरोखर पाया पडण्यासाठी खाली वाकली, तो मकरंदच्या हिसडयाने ती दूर झाली. तेवढयात त्याचं लक्ष समोर वेधलं. योगिनीला त्याने पाहिले. नेमकी नको ती गोष्ट घडली होती. मकरंदची चलबिचल झाली. धाबऱ्या मनःस्थितीत त्याने तिला हाक मारली ' यो ऽ गि ऽ नी ऽ ! '

योगिनी मात्र त्यांचे सारे संवाद ऐकून नि:स्तब्ध उभी होती. मकरंदच्या हाकेने ती भानावर आली. हलकेच पावले टाकीत ती आत गेली. खुर्चीचा आसरा घेत ती उभी राहिली, तेवढयात तिने अचानक समोरील स्त्रीला पाहिले. तिला पाहताच योगिनीला वाटले की, आपल्या पायाखालील जमीन दुभंगते आहे. आधीच ती विकल झाली होती, त्यात समोरील स्त्रीला पाहून ती अधिकच विकल झाली. समोरील स्त्री तिच्या घरात रमाबाई नावाने राहिलेली मोलकरीण होती. ती आशूची आई होती – आणि मकरंदची पत्नी ! तिच्या भावी

पतीची – प्रियकराची अर्धांगी ! योगिनीला वाटले आपल्या समोर जे घडतंय ते सारं सत्य आहे का ? तिने जी स्वप्ने रचून स्वर्गसुखाचा डोलारा निर्माण केला होता, तो पत्त्याच्या बंगल्यागत ठरला. सगळं ढोंग होतं – सगळं खोटं होतं ! ह्या विचारांनी आपल्याला मूर्च्छा येईलसे तिला वाटले. सभोवतालच्या वस्तू अन् वस्तू गरगर फिरल्यागत भासू लागल्या.

'तू मोहाच्या सोनेरी जाळ्यात सापडलीस – तू रेशमी फंदात अडकलीस– ' अशा प्रकारची वाक्ये तिच्या कानात सतत प्रतिसाद निर्माण करू लागली. तिला ते सहन होईना. सर्व शक्ति एकवटून ती ओरडली.–

'नाही – नाही – नाही ऽ ! ' आणि तसे ओरडत – धावत ती घराबाहेर पडली. बागेतील आशूची अन् गोपीकाकांची हाकहि तिला अडवू शकली नाही.

क्षणभर मकरंदच्या काहीच लक्षात आले नाही. योगिनी बाहेर गेलेली पाहताच तिच्या पाठोपाठ तोही बाहेर पडला; पण व्यर्थ. योगिनी फाटक उघडून त्याच्या नजरेच्या टप्प्यातून दूर देखील झाली होती. हताशपणे तो पुन्हा आत आला. त्याच्या डोक्यात घणाचे घाव पडत होते. नजरेसमोर अंधार दाटला होता. त्याला आपलं सर्वस्व लुटलं गेल्यासारखं वाटलं. आपलं जग बेचिराख झालं. एकाद्या उल्कापाता-प्रमाणे सुखाच्या अवकाश मंडळातून गळून पडलं. जड पावलांनी तो पुन्हा आपल्या खोलीत चालता झाला. मालती गुपचुप एका टेबलावर कोपर टेकून उभी होती. मकरंदने आत गेल्यावर डोळे फाडून तिच्याकडे पाहिले. मालती त्याच्या रुद्रावताराकडे पाहून इतकी घाबरली, की जणू धरणीमातेत ती विलीन होऊ पहात होती. पण मालतीचं दैव इतकं पवित्र थोडंच होतं, की धरणीमाता तिला आपल्या हृदयात स्थान देऊ शकेल ! अनाहुतपणे छोटी आशू देखील मकरंदच्या पाठोपाठ आत आली. आशूला मालतीसमोर धरीत मकरंद म्हणाला–

'आशु ! ही तुझी मावशी नसून आई आहे आई !'

'डॅडी ऽ!' आशू एकदम किंचाळली.

आशूच्या त्या किंचाळीत एक प्रकारची भीति होती. त्यामुळे मालतीच्या अंगावर देखील काटा उभा राहिला.

'होय आशु, ही तुझी आई आहे! जी मांगल्याच्या अन् पवित्रतेच्या बुरख्याआड लपून खून देखील करू शकते. जी लोकांची घरे उजाड करू शकते. आनंदाविरुद्ध दुःख ही हिची किमया आहे. स्वार्थासाठी ही लोकांचं रक्त पिते. अशी ही थोर स्त्री तुझी आई आहे आशु. आई आहे!' मकरंद एका दमात बोलून गेला. योगिनीच्या जाण्याने त्याच्यावर एक प्रकारचा आघात झाला होता. त्या आघातामुळे त्याची शक्ति विकलत झाली होती. त्या अप्रतिहत प्रवाहात त्याची सारी सहनशीलता वाहून गेली होती. त्यामुळे आशूसमोर तो सारं काही ओकत होता. विरहाच्या नशेचा आघात त्याच्यावर होऊन त्यात तो बेहोष झाला होता. योगिनी-शिवाय त्याला काही सुचत नव्हतं, म्हणूनच तो आशूला म्हणाला—

'आशु बेटा! मी आज तुला ह्या आईकडे सोपवीत आहे. हे वैभव, हा आराम, हे ऐश्वर्य सारं काही तुझं आहे. बेटा, यावर तुझा अधिकार आहे. ह्या सगळ्याची तू मालकीण आहेस. हे सार मी तुला अर्पण करीत आहे बरं बेटा...! मी जातो... दूर ऽ दूर ऽ...! जिथे तुझ्या आईची सावली देखील नसेल, अशा जगात मी निघून जातोय..!' मकरंद बोलत असताना आशूने त्याच्या गुडघ्यांना पकड घातली. परंतु मकरंदने आज प्रथमच आशूला हिसडा देऊन दूर केले. स्वतःच्या बाल-ताकदीनुसार आशूने मकरंदला धरले, पण व्यर्थ. मकरद भरभर पावले टाकीत बाहेर जाऊ लागला. मध्येच गोपीकाकाने अगदी विनवणीच्या सुरात त्याला अडविण्याचा प्रयत्न केला; पण पूर आलेल्या नदीला कोण अडवू शकणार? मकरंदच्या मनोसरितेला देखील पूर आला होता. तो ताड् ताड् करीत निघून गेला. गोपीने आशूला आपल्या मिठीत सामावून घेतले. ती ओक्साबोक्सी रडत होती. गोपी तिला उगी करण्याचा प्रयत्न करीत होता. त्यामुळे नकळत त्याच्याही डोळ्यातून आसवे घरंगळत

श्रा.धा. ६

होती. आशूच्या हंबरड्यामुळे एक भयानकता भासत होती. सबंध घर रडत होतं जणु !

मकरंदला भयंकर मनःस्ताप झाला होता. योगिनीचं बेधडक निघून जाणं त्याला बोचलं होतं. तिचा गैरसमज झाला होता. तिचा तसा गैर-समज होणे स्वाभाविक होते. पण तिला समजावणे त्याला प्राप्त होते. तिच्यासाठी साऱ्या घरादारावर'– संपत्तीवर लाथ मारून, इतकेच नव्हे तर प्रिय आशूलादेखील सोडून तो तिच्या घराकडे निघाला. त्याच्या पावलांत जलदता होती. योगिनीच्या प्रीतीकडे तो ओढला गेला होता. अगदी संपूर्णपणे ! त्या जोषात एवढे अंतर तोडून तो योगिनीच्या घरी पोहोचला देखील. धाड् धाड् जिने चढून त्याने दरवाजा उघडला. आत डोकावले. पण आत कुणीही नव्हते. जलदीने त्याने आतील खोली पाहिली. तो दिसताच योगिनीची आई सामोरी आली.

'तुम्ही...आणि असे घाबरलेले ? ... काय झालं ?'

'योगिनी नाही आली घरी ?'

'नाही... का ...? ती तुमच्याकडे जाते म्हणून सांगून गेली !'

'हो ऽ ! पण मी जरा बोर्डाच्या मीटिंगला गेलो होतो. तेव्हा ती रागावून परत घरी गेली असेल म्हणून मी घरी आलो.' कपाळावरील घर्मबिंदू पुसत मकरंदने चक्क थाप मारली. कपाळावरील घाम पुसता पुसता त्याने आपला पंजा चेहऱ्याभोवती लपविला होता. योगिनीच्या आईला त्याच्या चेहऱ्यावरील लटके भाव उमजले नाहीत !

'अस्स होय ?– मग गेली असेल शालिनीकडे गप्पा मारायला. एरव्ही कुठे जाणार नाही.' वत्सलाबाईंनी सांगितले.

'बरं तर जातो मी...' असं म्हणत मकरंद तेथून निघाला.

'अहो पण, चहा ऽ ... ?' परंतु वत्सलाबाईंचे पुढील शब्द ऐकायला तो तेथे नव्हताच मुळी ! शालिनीच्या घराकडे जाता जाता तो आपल्या विचारगतीला दूषणे देत होता. शालिनीच्या घरी योगिनी गेली असावी असा आपण अंदाज कां नाही केला ? योगिनीला भेटण्याच्या ईर्षेने भरभर पावले टाकीत तो चालला होता.

'योगिनी त्यावेळी खरोखरच शालिनीच्या घरी बसली होती. शालिनीला फार वाईट वाटले. योगिनीच्या गालावर ओघळलेले अश्रू पुशीत शालिनी तिचे सांत्वन करण्यासाठी म्हणाली–

'योगा ऽ! प्रथमच साऱ्या गोष्टींची छाननी करायला हवी होती. मी तुला सतत म्हणत होते की, घाई करू नकोस. पण तुझ्यावर प्रीतिचं भूत स्वार झालं होतं! '

'शालू, मला काय कल्पना होती, की प्रेमात मी एवढा मोठा धोका खाईन! अग, आईला कळल्यावर केवढा मोठा धक्का बसेल तिला. आज-काल रात्रंदिवस ती माझ्या सुखाची उजळणी करीत असते ...पण ...'

'इतके दिवस तुला कसं कळलं नाही? '

'प्रेमाने आंधळी झाले होते मी. मी त्याच्यावर विश्वास टाकला शालू इतका विश्वास, की माझ सर्वस्व मी त्याला लग्नापूर्वीच अर्पण केलं!

'योगा ऽ!'

'होय शालू. मी प्रेमभावनेने अगदी भारावून गेले होते. पण त्याची बायको जिवत आहे! ...आणि ती कोण ते माहीत आहे... ?'

'कोण? '

'आमच्या घरी मोलकरीण म्हणून आली होती बघ...ती रमाबाई उर्फ मालती! '

'अस्सं ऽ! आता आलं माझ्या लक्षात...! तेव्हाच; त्या दिवशी बोबडी वळली होती; जेवण सपत नव्हतं; कालवाकालव दाटली होती; चेहरा घामेजून गेला होता. मीदेखील त्यावेळी विचारात पडले होते! ' शालिनी.

'मला सांगितलं प्रकृती ठीक नाही म्हणून! आईलादेखील खरं वाटलं. पण त्याच रात्री मालतीनं घर सोडलं. आणि शालू! मला आता हे जग सोडायला हवं. कारण...मी माझं सर्वस्व मकरंदला अर्पण केलं, जे कुमारिकेने लग्नापूर्वी देऊ नये ते. अत्यंत प्रेमापोटी मी मोहाला बळी पडले...मी कलंकिता आहे. '

' पण योगा ऽ ! एवढी कशी भुरळ पडली तुला ? '

' भुरळ नाही ग ऽ ! अगदी मनापासून मी मकरंदची झाले आहे... त्याच्याशिवाय मी जगूच शकणार नाही ! ...खरंच त्यांच्यात काय जादू आहे कुणास ठाऊक ! '

बोलता बोलता योगिनी दमली. शालिनी मात्र तिचं बोलणं शांतपणे ऐकत होती. आपल्या प्रिय मैत्रिणीची झालेली विटंबना तिला असह्य होत होती. काय करावे ? ह्यातून कसा मार्ग काढावा ? ह्या विवंचनेत ती सापडली होती. दोघींतही निःस्तब्धता होती ; तेवढ्यात बाहेर कुणाच्या तरी पावलांनी ती निःस्तब्धता भंग पावली.

' योगिनी ऽ ! ' खूप दमल्यागत धापा टाकणाऱ्या मकरंदने अगदी विश्वासाने योगिनीला साद घातली. मकरंदला समोर पाहताच योगिनीच्या हृदयात प्रेमातिशयाचा एक गोड झंकार निनादून गेला. पण वरकरणी तसे न दाखविता क्रोधाचा आवेश आणून ती त्याला म्हणाली–

' आणखी काही सांगायचं आहे का बाकी ? '

' होय, योगिनी. खूप खूप सांगायचं आहे मला. तुझा गैरसमज दूर करायचा आहे. सत्यस्थिती सांगून मोकळं व्हायचं आहे ! ' मकरंद मंदपणे उद्गारला.

' मला आणखी काही एक ऐकायचं नाही. आजपर्यंत खूप ऐकलं. उगाच मला वश करण्याचा प्रयत्न करू नका. तुमच्या बोलण्याने मी फसणार नाही. ' असं म्हणत योगिनी शालिनीच्या घरातून बाहेर पडली. मकरंदही तिच्या पाठोपाठ रस्त्यावर आला. योगिनी एकदाही मागे न पाहता झरझर चालत होती. मकरंदने धावत जाऊन तिच्या दंडाला पकडले; त्याच्या जबरदस्त पकडीने योगिनीला थांबावे लागले.

' मिस्टर विचारे, तुमची मजल येथपर्यंत जाईल ह्याची मला कल्पना नव्हती. ' तिच्या शब्दात धार होती. परंतु पक्कड अधिकच घट्ट करीत मकरंद म्हणाला.

' योगिनी ! तुझ्या प्राप्तीसाठी सुशिक्षितांची मर्यादा ओलांडून मवाल्यातील मवाली होण्याची माझी तयारी आहे ! मला तू हवी आहेस·

माझं तुझ्यावर प्रेम आहे. अगदी अमाप—अजोड! योगिनी माझ्याबरोबर चल! मी सांगतो ते सारं ऐक! विचार कर. वाटल्यास नंतर तू माझ्या प्रेमाचा अव्हेर कर; त्यात मला काही वाटणार नाही. आयुष्यभर नुसत्या तुझ्या प्रत्येक स्मृतीवर जगेन मी.' असं म्हणत शेजारून जाणाऱ्या टॅक्सीला त्याने थांबविले. एका हाताने दरवाजा उघडून योगिनीला आत बसण्यास त्याने भाग पाडले. त्याच्या त्या कृतीचा प्रतिकार योगिनी करू शकली नाही.

गाडी पेशवे उद्यानापर्यंत येऊन पोहोचली. कोपऱ्यातील हिरवळीवर बसेपर्यंत मकरंद एकही शब्द बोलला नव्हता. योगिनी देखील त्याचेबरोबर बसली. परंतु तिने त्याच्यात व तिच्यात बरेच अंतर ठेवले होते. हलक्या आवाजात तो बोलू लागला.

'योगिनी, तुझा फार मोठा गैरसमज झाला आहे!'

'तुमच्या पत्नीबरोबर तुमचे चाललेले सर्व संवाद मी माझ्या कानांनी ऐकले. तुमची पत्नी जिवंत आहे; आणि तुम्ही मला ती मेली म्हणून सांगितलेत. तुम्ही मला फसवू पाहता...' योगिनी.

'हे सारं सत्य आहे. पण ते दुर्दैवाने मला चिकटले आहे. सत्य ऐकल्यावर तू मला निर्णय दे. मग तर झालं? सत्य फार कटु असतं म्हणतात, ते काही खोटं नाही! मालती माझी पत्नी आहे हे सत्य आहे. परंतु ती एक आगळीच कथा आहे... ती सत्यकथा मी आता तुला सांगायलाच हवी. त्याशिवाय माझ्या प्रीतीबाबत तू घेतलेली शंका मला खोडून काढता येणार नाही!'

मकरंद क्षणभर थांबला. योगिनीवरून नजर काढीत अगदी शून्यात पाहू लागला. योगिनी देखील तो पुढे काय सांगतो ते नीट ऐकण्यासाठी सरसावून बसली. मकरंदच्या डोळ्यासमोर पूर्वीचे दिवस साकार झाले वर्तमानाच्या कॅलेंडरची पाने मागे गेली; भूतकाळातील सात वर्षांपूर्वीचे प्रसंग एखाद्या चित्रपटाप्रमाणे त्याच्या नजरेपुढून सरकू लागले...

"कुलाबा जिल्ह्यातील पेण तालुक्याच्या गांवी विचारे कुटुंब, त्या गांवातील एक सधन कुटुंब होतं. पिढीजात ऐश्वर्य चालत आल्यामुळे, आणि ऐश्वर्याची प्रत्येक पिढीतील जबाबदार व्यक्तीने जोपासना केल्यामुळे, प्रत्येक पिढीत संपत्तीची वाढ झाली होती. त्याच्या जोडीला मकरंदच्या आजोबांनी म्हणूजे आबासाहेबांनी शेतीच्या जोडीला म्हणून छोटे छोटे पडाव बनविण्याचा उद्योग सुरू केला. पेण, पनवल, रेवदंडा, उरण अशा त्या समुद्रकिनारी गावात हां ऽ हां ऽ म्हणता आबासाहेब विचारे यांचा जोडधंदा अगदी भरभराटीस आला. त्याला कारणहि तसेच होते. समुद्रकिनारी वातावरण असल्यामुळे तेथील लोकांना मच्छिमारी, मालाची ने आण इत्यादी गोष्टींसाठी छोटया पडावांचा चांगला उपयोग होऊ लागला. आबासाहेबांनी आपल्या डोक्यातून अशा प्रकारची कल्पना काढली काय, अन स्वत: पुरस्काराने त्यांनी तिला मूर्त स्वरूप दिले काय ! गावात अन् आजूबाजूच्या इलाख्यातल्या गावांत विचारे कुटुंब प्रसिद्धीच्या अगदी शिखरावर जाऊन पोहोचले. सबंध लोक त्यांना 'पडाववाले विचारे' म्हणून ओळखू लागले.

पुढे आबासाहेब विचारेंच्या मृत्यूनंतर त्यांचा एकुलता एक मुलगा विश्वास ह्याने इंजिनीअरिंग कॉलेजचं शिक्षण पूर्ण करून आपल्या वडिलांनी नवीन सुरू केलेल्या धंद्यात अद्यावत पद्धतीने सुधारणा करून मोठमोठी गलबते, होडया बांधण्याचा कारखानाच उभारला. तरुण रक्ताच्या विश्वासची ओढ अधिक वाढली. त्या ओढीने निर्माण झालेली 'विचारे बार्जेस मॅन्युफॅक्चरीग कंपनी' हां हां म्हणता सबध भारतभर प्रसिद्ध पावली; खोऱ्याने पैसा ओढू लागली. विश्वासराव विचारे एक प्रसिद्ध उद्योगपती म्हणून नावलौकिकास आले. विश्वासरावांनी गावात आधुनिक पद्धतीवर एक मोठे घर बांधले. घरासाठी पुण्या-मुंबईहून इंजिनिअर बोलाविले होते. त्यांचे ते घर त्या इलाख्यातील एक आकर्षक घर होते.

परंतु त्या घरात जेव्हा विश्वासरावांचे दोन मुलगे मकरंद अन् अरविंद खेळू-बागडू लागले, त्यावेळी त्या घराला घरपण आल्यागत वाटले. मकरद अन् छोटया अरविंदाच्या बाललीलांनी जेव्हा घर फुलून येई, तेव्हां उतारवयाकडे झुकत चाललेल्या विश्वासरावांना अन् त्यांच्या पत्नीला जो आनंद होई तो अगदी अवर्णनीय असे. मकरंदचा लहान पणापासून शिक्षणापेक्षा आपल्या वडिलांच्या धंद्याकडे अधिक कल होता. तो वडिलांबरोबर खूप वेळा कारखान्यात जाई. तो तेथे गेला की, तेथील सुतार, बिगारी वगैरे छोटया-मोठ्या कामगारांचे काम पाहण्यांत तल्लीन होऊन जात असे ! विश्वासरावाना बालपणातील त्याच्या त्या वेडाचं आश्चर्य वाटत असे. त्याचबरोबर अभिमानाने अन समाधानाने त्यांचा उर भरून येत असे. त्या उलट नाण्याच्या विरुद्ध बाजूप्रमाणे अरविंद मात्र कारखान्यात जायला नाराज असे. ते घिसाडघाईचं वातावरण त्याला मुळीच आवडत नसे वडील त्याला ' अरू ! चल; कारखान्यात येतोस का ? चल; तुझ्यासाठी एक छोटीशी होडी बनविण्यास सांगतो मेस्त्रीला '

' अं हं ऽ मी नाही येणार. मला नाही आवडत लाकडाची होडी. मी आपला अभ्यास करीत बसतो. ' त्यावर विश्वासरावांची पत्नी - मुलांची आई येऊन म्हणे,

' अहो, त्याला नाही आवडत तर कशाला घेऊन जाता. मकरंद आहे ना? ...त्याला घेऊन जा तो बरा रुळतो ! ' आणि खरोखरच अरविंद तेथून निघून जाऊन आपल्या अभ्यासाला बसत असे !

रात्री नवरा बायकोचा मुलाबद्दल विषय निघताच विश्वासराव पत्नीला म्हणत– ' अनुसये, मला आता भीती नाही. सुखाने मरेन मी माझ्या धंद्याचा विकास करायला माझा मकरद आहे. मकरद कारखानदार होईल– तर अरविंद खूप खूप शिकेल. विलायतेत जाऊन बॅरिस्टर होऊन येईल. कलेक्टर होईल कलेक्टर ! '

' वा ऽ अगदी माझ्या मनातलं बोललात ! खरंच अरविंद कलेक्टर झाला म्हणजे मलाहि खूप खूप आनद होईल ! '

'अग आपल्या विचारे घराण्याला कळस चढेल ! ' अशा प्रकारे संभाषण चालत असे. काळाची चक्रे फिरत होती. मकरंद पुण्यास इंजिनिअरिंग कॉलिजात शेवटच्या वर्षात शिकत होता. अरविंद मुंबईला पदवी परीक्षेची तयारी करीत होता. वयाने लहान असून देखील आपल्या बुद्धि-चापल्याने त्याने मकरंदला गाठले होते. पुढे अचानक गावात प्लेगची साथ आली आणि त्यात विश्वासराव व त्यांची पत्नी बळी पडली. आजारी अवस्थेत मुले घाबरतील म्हणून त्यांना कळविले नव्हते. परंतु मृत्युसमयी त्यांचे दोन्ही मुलगे दोन दिशांना होते. त्यामुळे विश्वासरावांनी मृत्युपत्राव्यतिरिक्त आपल्या दोन मुलांना अखेरची दोन पत्रे लिहून ठेवली होती. ती पत्रे त्यांनी आपल्या विश्वासू दिवाणजीकडे देऊन ठेवली होती. वडिलांच्या मृत्यूची तार मिळताच मकरंद घरी परतला. परंतु त्याला उशीर झाला होता. दिवाणजींनी मकरंदला पत्र दिले. त्या पत्रात वडिलांनी वडील मुलगा म्हणून सबंध कारखान्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविली होती. आणि अरविंदबद्दलच्या आपल्या उभयतांच्या आशा आकांक्षा लिहिल्या होत्या. त्या पूर्ण करण्यास अरविंदला जेवढी लागेल तेवढी मदत करण्यास बजाविले होते. त्याच्यावर प्रेमाची पाखर घालण्यास सांगितले होते. पत्र वाचल्यावर मकरंदने वडिलांच्या अंत्य इच्छेला सबंध आयुष्य वाहून घ्यायचं ठरविलं होतं ! अरबिंद मात्र मुंबईहून येऊ शकला नव्हता. कारण त्याने मुंबईचा किनारा सोडला होता. अचानक मिळालेल्या पॅसेजमुळे कॉलिजतर्फे त्याला केंब्रिजला पाठविण्यात आले होते.

वैशाख जवळ येताच मकरंदच्या दूरच्या नातलगांनी मकरंदला लग्नाबद्दल सूचना केली. पुढे तीन वर्षे त्याला लग्न करता येणार नव्हते. मकरंद त्यावेळी नुकताच बावीसाव्या वर्षात पदार्पण करीत होता. तो लग्नाची टाळाटाळ करू लागला. परंतु त्याच्या वृद्ध नातलगांनी, गोपीसारख्या नोकरांनी देखील त्याला लग्नाला उभे राहण्यास भाग पाडले. केवळ एवढ्या मोठ्या घरासाठी ! मुलगीही दाखविली. शेजारच्या नायावमधील जमीनदाराची ती एक एकुलती एक मुलगी होती.

वडील मृत्युपथावर पडलेले असल्यामुळे मुबईहून अर्धवट कॉलेज सोडून ती आली होती. मात्र तिला पाहताच मकरंद तिच्यावर खूष झाला. तिचा देखणेपणा, चेहऱ्यावरील करारीपणा पाहून त्याने लग्नास संमती दिली. विचारे घराण्यातील नव्या पिढीतील नवे लग्न म्हणून लग्न सोहळा अगदी थाटामाटात साजरा झाला. सबध गावाला जेवण देण्यात आल मोठमोठे कत्राटदार अन् थोर गृहस्थ लग्नकार्यात सामील झाले. परतु मकरदला मात्र राहून राहून खत वाटत होती, ती अर-विदच्या अनुपस्थितीची ! तो केंब्रिजला अडकला होता. मकरदने त्याला तार ठोकली होती. पण त्याने अभिनंदनपर तार पाठवून आपण येऊ शकत नसल्याच कळविल होत ! तरीही लग्नाचा सोहळा अगदी यथा-सांग पार पडला. मकरदने सर्वानुमते नव वधूच नाव 'मालती' असं ठेवल !

पूर्ण मुदतीच्या आतच मालती प्रसूत झाली तिच्या स्त्रीजन्माला पूर्णत्व लाभल. मकरदने कन्येचं नाव आशा अस ठेवल ! त्याला कन्या-रत्न झाल, म्हणून खूप आनद-झाला होता. कारण जवळ जवळ मागील तीन पिढ्या त्या घरात कन्यारत्न जन्मास आलं नव्हत मालतीने परंपरागत मालिका तोडल्यामुळे तो तिच्यावर अगदी निहायत खुष होता. तिच्यावर तो खूप प्रेम करीत असे. पण ती मात्र थड होती. त्यामुळे तिच्याबद्दल तो कधी कधी साशक बने तिच्या चेहऱ्यावरील कसलं तरी छुप औदास्य त्याला भेडमावीत असे सुरुवातीला त्याने तिला तसं विचारलही. पण 'तस काही नाही; उगाच तुम्हाला आपल वाटत' वगैरे सागून तिने त्याला समजाविले. मकरदचा तिच्या लटक्या कृतीवर विश्वास बसला होता.

छोट्या आशूचा पायगुण चांगला होता. कारण त्याच वेळी आपल शिक्षण आटोपून अरविंद घरी आला होता. अरविंद घरी येताच मकरदला कडकडून भेटला. दोघांनीही अगदी मुक्तपणे अश्रू ढाळून आपल्या आईवडिलांच्या आठवणी काढल्या. मकरंद गहिवरून आला. आपण आपल्या वडिलांची इच्छा अंशत: का होईना पूर्ण केली

याबद्दल त्याला समाधान लाभले. घरात येताच मकरंदने आपली छोटी बाळ त्याला दाखविली. त्या गोंडस बाळसेदार मुलीला पाहून अरविंद म्हणाला,

'दादा ऽ! तुझी छबकडी फारच सुंदर आहे बुवा! तिला आपण केंब्रिजला पाठविले तर ही काही परत येणार नाही. अरे तेथील एखादा गोरासाहेब हिच्याशी लग्न करून तिला तेथेच स्थायिक करून घेईल!' असं म्हणत आपल्याच विनोदावर 'खो-खो' करीत तो हसू लागला. मकरंदलाही हसू आवरेना.

'काय रे दादा ऽ! मुलगी देखणी तर तिची आई...! नाही म्हणजे आमची वहिनी ...! कुठून शोधलंस असलं रत्न?'

'ए चूप...ती बघ येतेय आंतून!' असं म्हणत पुढे जाऊन मकरंद मालतीला गदागदा हलवीत म्हणाला--'मालती, हा बघ कोण आलाय? ओळखतेस याला?'

पुढे आलेल्या मकरंदचे शब्द पूर्ण होण्याआधीच तिने अरविंदला पाहिले. आपल्या पायाखालील जमीन घसरते की काय, असे तिला वाटले. डोक्यात घणाचे घाव बसल्यागत वाटू लागले. तरीही त्या परिस्थितीत तिने स्वतःला सावरले. अरविंद देखील आपल्या वहिनीला पाहताच लटपटू लागला. त्याच्या डोळ्यांत अंगार फुलून आले. पण संयमाच्या फुंकरीसरशी त्याने ते विझवून टाकले. उपचार म्हणून तो तिचे पाय धरण्यास वाकला, तेवढ्यात तिने त्याचे खांदे धरून त्याला वर उभे केले. तिच्या स्पर्शाने पुन्हा एकदा कसले तरी शल्य त्याला बोचले. जखमेवरील खपली निघाल्यान तो पुन्हा रक्तबंबाळ झाला. मकरंदला मात्र ह्यातले काही कळले नाही. काही लक्षात आले नाही. मालतीला त्याने जेवणाची तयारी करण्यास सांगितले.

अरविंद आला म्हणून मेजवान्या दिल्या जात होत्या. पण या मेजवान्यांत अन् आनंदात अरविंद मात्र मुखवटा धारण करून वावरत होता. मनोमन दुःखाच्या एका खोल दरीत तो फेकला गेला होता. मायदेशी परततेवेळी जी स्वप्ने मनाशी रंगवून तो आला होता, त्यांचा घरी

येताच चुराडा झाला. जे मनोरथ रचले होते ते पायदळी तुडविले गेले. मनोदयाच्या सेतूंवर अणुबॉंब पडून ते बेचिराख झाले. आजपर्यंत ज्या देवीची तो अभ्यासाव्यतिरिक्त पूजा बांधीत होता, ती त्याची आराध्यदेवता त्याच्यापासून दूर दूर गेली होती. त्याच्या प्रीतीचे मंदीर रितं झालं होतं. मनाचा गाभारा उजाड झाला होता. रात्रभर तळमळत तो ह्याच विचारांत गुरफटलेला असे. मनोमन तो स्वतःलाच प्रश्न विचारी— ' रमा अशी कां वागली ? तिने आपली वाट कां पाहिली नाही ? बरं तिला लग्नच करायचं होतं तर माझ्या दुर्दैवाने अन् तिच्या सुदैवाने तिने माझ्या दादाशीच लग्न का करावे ? आपल्या प्राणाहून प्रिय असलेल्या प्रियकरणीला वहिनीसारख्या पवित्र नावाने हाक मारण्याची आपल्यावर पाळी यावी ना ? याहून नियतीचा विचित्र खेळ तो कोणता असणार! विचार करता करता फरशीवर डोळे लावीत, मुंबईतील कॉलेज जीवनात घालविलेले रंगीत दिवस त्याला आठवत. फुलपाखरांगत स्मृति त्याभोवती पिंगा घालीत..." अरविंद त्या वेळी शेवटच्या वर्षात शिकत होता. त्याच वर्षी त्याच्या कॉलेजात रमा नावाची हुशार आणि रूपवती अशीमुलगी दाखल झाली. ह्या रमेला अरविंदने प्रथम पाहिले, ते कॉलेजच्या वक्तृत्व स्पर्धेत तावातावाने वक्तृत्व करताना ! अरविंदला वाटले, पंडीता रमाबाईचा हा दुसरा अवतार तर नाही ना ? पहिल्याच दृष्टी-भेटीत अरविंद तिच्यावर लुब्ध झाला. कधी नव्हे त्या तारुण्यसुलभ विचारांच्या लहरी त्याच्या शरीरांतून लहरून गेल्या. रमालाही अर-विंद फार आवडला. त्याच्या बुद्धीचापल्यावर रत झालेल्या कॉलेजातील सर्व बुद्धीजीवी तरुणी त्याच्यासाठी झुरत होत्या. उरलेल्या झाडून साऱ्या तरुणी त्याच्या देखणेपणावर फिदा होत्या. अरविंद एका उद्योगपतीचा मुलगा असल्यामुळे उंची राहणीत वावरत असे. असा हा साऱ्या कॉलेजांतील स्वरूपवान तरुण, मुलींना आवडला नाही तरच नवल ! दोन मने एकमेकांना मिळाली. दोन जीव एक झाले. आज-तागायत ती दोन मने विविध क्षेत्री वावरत होती. पण परमेश्वराने त्या दोघांना जणु एकमेकांसाठी निर्माण केले होते, आणि म्हणूनच

ते दोन जीव जवळ येण्याचाच अवकाश – एकमेकांची खूप वर्षांची ओळख असल्यागत ते एकरूप झाले. अरविंद अन् रमा एकांतात बोलतांना ह्याच गोष्टीवर बोलत. अरविंद तिला म्हणे–

' रमा – प्रेम, प्रेम ज्याला म्हणतात ते हेच ! तुझं नी माझं. नाहीतर आजपर्यंत मी या कॉलेज-विश्वात एखाद्या बालब्रह्मचाऱ्यासारखा वावरत होतो. कोणत्याही मुलीला मला जिंकता आलं नाही. पण रमा, तू जिंकलंस मला......' असं म्हणत तो अलगद तिला आपल्या जवळ ओढी अन् हळुवार तिच्या ओठांतील अमृत प्राशन करी.

अरविंदला केंब्रिज युनिव्हर्सिटीत जायची भारत सरकारतर्फे शिष्यवृत्ती मिळाली होती. त्याच्या कॉलेजात सर्वांना आनंद झाला होता. अरविंदच्या ह्या यशाने रमा अगदी पुलकित होऊन गेली. निरोप समारंभाला सर्वांनी केलेलं त्याचं कौतुक ऐकून रमा जागच्या जागी थिजली होती. तिला वाटलं आपलं ज्याच्यावर अतोनात प्रेम आहे तोच कां हा अरविंद? परंतु त्याच वेळी तिला एक प्रकारची भीती देखील वाटली. तिला वाटलं हा सातासमुद्रापलीकडे जाणारा प्रियकर आपल्याला विसरणार तर नाही ना ? परत येताना बरोबर एखादी मड्डम तर तो घेऊन येणार नाही ना ? केंब्रिजला निघायच्या दोन दिवस अगोदर अरविंद अन् रमा एकमेकांना भेटली. त्यावेळी ती खूपखूप रडली. आपल्या मनातील शंका तिने त्याला बोलून दाखविल्या. अरविंदने वचने – दिलासे देऊन तिची समजूत झाली. शेवटी तिला आपल्या गोड मिठीत घेऊन तो लाडाने तिला म्हणाला– ' रमा, सर्वांनी माझं अभिनंदन केलं; पण तू मात्र माझं अभिनंदन केलं नाहीस ! '

' अरे वेड्या ऽ ! ह्या डोळ्यांची निरांजने मी तुझ्यावर ओवाळली आहेत. माझ्या हृदय-मंदिरात मी तुझी पूजा बांधली आहे. एकाच जन्मासाठी नव्हे तर सात जन्मासाठी, मी तुझीच असावी असं त्या परमेश्वराकडे मागणं मागते आहे. पण काय रे, माझ्यासारख्या गरीब मुलीला तू फसविणार तर नाहीस ना ? '

'नाही ऽ नाही. रमा, हे कदापि शक्य नाही. मी माझं शिक्षण पूर्ण करून परत येईपर्यंत माझी वाट बघशील ना ? माझ्या आई-वडिलांची इच्छा आहे, मी बॅरिस्टर व्हावं... कलेक्टर व्हावं ! मला ती इच्छा पूर्ण करायची आहे. रमा ते जाऊ दे; पण आता माझं ऐक ना ऽ ! माझं अभिनंदन मी सांगेन तसं करायला हवं ! म्हणजे केंब्रिजमध्ये देखील तुझी आठवण सतत माझ्या डोळ्यासमोर उभी राहील ! '

'म्हणजे तुझं हे गूढ बोलणं मला नाही कळत ! ' रमा.

'नाही कळत ना ? मग चल. कृतीनेच दाखवितो ! असं म्हणत अरविंदने रमाला ओढतच आपल्या रूमवर आणली. बेडरूम-पर्यंत घेऊन गेल्यावर त्याने सरळ तिचे चुंबन घेऊन तिच्या कानात अलगद आपली इच्छा सांगितली. प्रथम प्रथम तिने नकार दिला; पण अरविंदच्या मिठीत सामावलेला तिचा घुदफुंद जीव मात्र कृतीने त्याला नकार देऊ शकला नाही.

आता घरी आल्यावर नेहमी अरविंदला हेच सारं आठवत होतं !"

× ×. × × ×

" काही दिवसांनंतर मकरंद कारखान्यात गेला होता. अरविंद तब्येत बरी नाही म्हणून घरीच होता. माजघरात रमादेखील अस्वस्थपणे आशूला खेळवीत होती. तेवढ्यात अरविंद खाली आला. मालती-वर तो हवे तसे तोंडसुख घेऊ लागला. इतकेच नव्हे तर रागाने बेभान होऊन तिला मारण्यासाठी त्याने हातदेखील उचलला. परंतु विवेकाच्या झटक्याने तो खाली आला. पूर्वीची रमा – आताची मालती – मात्र ओक्साबोक्सी रडत होती. तिने अरविंदच्या मिठीत सामावत साऱ्या गोष्टी त्याला समजावून सांगितल्या...

रमाचे वडील अस्वस्थ असल्यामुळे तिला अर्धवट कॉलेज सोडून गावी परतावं लागलं. मृत्युपथावर खिळलेल्या तिच्या वडिलांची एकुलती एक इच्छा होती, की रमाचं एखाद्या चांगल्या घरंदाज मुलाशी लग्न जमावं ! पण रमा मात्र लग्नाला तयार होत नव्हती. ती

वडिलांना वेळोवेळी विनवीत होती. जवळ जवळ ह्यात एक महिना लोटला. मग मात्र रमाला लग्न करण्याखेरीज गत्यंतर उरले नाही. कारण तिला दिवस गेले होते. तिने अरविंदला तार केली. पण तारेत खरे कारण लिहिण्यासारखे नव्हते. अरविंदलादेखील तारेचे विशेष वाटले नाही. त्याने तिला 'आपल्या वडिलांना थांबवून धर' असे लिहिले. परंतु रमा नियतीची शिकार झाली होती. तिला थांबणे शक्य नव्हते. म्हणूनच आलेल्या स्थळाशी ती मुकाटपणे लग्नास तयार झाली. तिला आलेलं स्थळ नेमकं मकरंदचं होतं. मकरंद – अरविंदचा भाऊ – तिचा होणारा दीर, आता नवरा झाला होता अन् आपण वरलेला नवरा ती दिराच्या भूमिकेत पहात होती.'

'म्हणजे आशु! ही माझी मुलगी आहे तर!

'होय अरू! आपल्या दिव्य प्रणय फुलोऱ्यानं फुलून आलेलं प्रीतीचं फूल म्हणजे आशु! अरू, खरंच अजूनही...... ' तिला पुढील शब्द उच्चारू न देता अरविंद मोठ्याने ओरडला – 'रमा ऽ.'

अरविंद ताड्ताड् करीत बाहेर निघून गेला होता. त्याच वेळी मालतीच्या मनात अविचारांचा कल्लोळ माजला. कुविचारांचे तांडव-नृत्य चालले होते अनीतीचा पिसाटवारा घोंगावत होता. पापरूपी मंथरा तिच्या मनात उसळून आली. दुसऱ्या दिवशी मालतीने दोघां भावांची ताटे मांडली. अगोदरच मिळविलेले वीष तिने एका ताटातील पदार्थांत घातले. दोघे भाऊ जेवायला बसले. गोपीला इतर पदार्थ देण्यास सांगून मालती निघून गेली. तेवढ्यात 'मालक ऽ मालक ऽ ऽ' ओरडत दिवाणजी आत आले. त्याबरोबर दोघेही भाऊ उठून दरवाजाजवळ गेले. कारखान्यात एका बाजूला साचलेल्या भुशात कोणीतरी चुकून विडी टाकली होती, अन् त्यामुळे हळू हळू भुशाने पेट घेतला व आग चारी बाजूंनी फैलावली होती. ती बातमी ऐकताच मकरंद त्याच्याबरोबर निघून गेला. अरविंददेखील निघाला होता पण मकरंदने त्याला नको म्हणून सांगितले. आणि त्यामुळेच अरविंद जाऊन ताटावर बसला,

तो मकरंदच्या. गोपीने अरविंदच्या जागेवरील ताट नेऊन आत ठेवले. मालतीला मात्र ताटांच्या या अदलाबदलाचा पत्ता लागला नाही.

जेवण संपवून अरविंद जो माडीवर जाऊन झोपला, तो अगदी हिरवा निळा होऊन! मालतीदेखील बाहेर गेली ती आली नाही. बऱ्याच मध्यरात्रीनंतर मकरंद परतला, तेव्हा मालती परत येऊन झोपली होती. मकरंद माजघरात येताच त्याला माडीवरून अरविंदच्या कण्हण्याचा आवाज ऐकू आला तो ' अरू, अरू ! ' अशा हाका मारीत वर येऊन पाहतो, तो अरविंदचा देह काळा निळा पडला होता. गोपीला बोलावून त्याने डॉक्टरना बोलाविले. हां ऽ हां म्हणता बातमी वाऱ्यासारखी गावात पोहोचली. सर्व गाव विचाऱ्यांच्या घरी जमा झालं कारखान्यातील कामगारदेखील जमले. इष्टमित्र सारे जमले – पण. अरविंदला मात्र कुणी वाचवू शकले नाही ! डॉक्टरांनी जेवणातून जहाल विष पोटांत गेल्यामुळे मृत्यु ओढवल्याचं निदान केलं.

परंतु झाला सर्व प्रकार अरविंदने ताडला होता.

मरतेसमयी अरविंदने मकरंदला हलकेच सारा वृत्तांत सांगितला, अगदी एकान्तात. शेवटी तो म्हणाला होता.

' दादा, माझ्या आशूला तू तुझी आशू समज. दुजाभाव मनात आणू नकोस. तिच्यावर तिच्या नीच आईची सावली देखील पडणार नाही, अशी खबरदारी घे ! वास्तविक तुझा खून करून माझ्याबरोबर तिला ससार करायचा होता. पण ही किती हिणकस विचारसरणी आहे ! परमेश्वराकडे न्याय आहे. त्याने तुला वाचविले ! अन् मला शिक्षा दिली. पण दादा, आशूला खूप शिकव. केंब्रिजला पाठव. कदाचित् त्यासाठी तू दुसर लग्न देखील न केलंस तर बरं होईल ! त्यामुळे सावत्रपणाचा जाच तिला शिवणार नाही. मालतीला मात्र कधीच क्षमा करूं नकोस...माझ्या आशूला जप... माझ्या नव्हे तुझ्या...

एवढं बोलून अरविंदची प्राणज्योत मालवली होती....."

× × × × ×

'समजलं योगिनी ? असा हा सारा वृत्तांत आहे." नंतर मालतीला पोलिसांनी पकडले. तिने घाबरून स्वतःच गुन्ह्याची कबुली दिली. परंतु ह्या खटल्याचा वर्तमानपत्रात अगर जाहीर ठिकाणी गवगवा होऊ नये म्हणून मी जातीने लक्ष घातले. त्याप्रमाणे पोलीसांनी देखीलऐकले. नंतर त्या घरात राहणे मला शक्य नव्हते. कारखान्याची जबाबदारी अन घर, सारं दिवाणजीच्या अधिकारांत देवून गोपीला अन् आशूला बरोबर घेऊन मी पुण्यात येऊन संसार उभारला. इथे नवीन कारखाना थाटला. त्याचा विकास केला. तू जीवनात येईपर्यंत दादाला दिलेलं वचन मी पाळीत आलो. पण तू आशूला अन मला ळळा लावलास, म्हणून विवाहबद्ध होऊन तुझ्याशी पुन्हा सुखाने संसार थाटावा, तुला आमच्या घरी घेऊन जावं, असं मी ठरवलं.

'मकरंद ऽ ! तुमच्या प्रेमाची कल्पना आली मला; पण माझं ऐका. मी एकदा म्हणाले होते, 'तुमचं हृदय आभाळाएवढं विशाल आहे.' या तुमच्या कथनाने तर माझी अगदी खात्री झाली. पण हे बघा, मालतीला आता तुमच्या साथीची गरज आहे तिने केलेल्या गुन्ह्याबद्दल तिला प्रायश्चित्त मिळाले आहे. ती शुद्ध होऊन आलीय. तेव्हा–'

'योगिनी ऽ !'

'ऐका माझं ! एका स्त्रीच्या हक्काची पायमल्ली करून माझ्या प्रीतीचं मंदीर उभं केलं तर जग स्वार्थी म्हणेल मला.स्त्रीजातीला कलंक लागेल. शेवटपर्यंत मी तुमच्या आशूची 'आंटीच' राहीन. परंतु या जन्मापासून परमेश्वराकडे तुम्हाला पुढील जन्माकरिता जरूर मागेन. चला घरी.' बोलता बोलता, योगिनीच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा ओघळत होत्या.

'नाही...नाही... योगा ऽ !'

'नाही कसं ? काही कर्तव्यं असतात जीवनात, ती पाळायला नकोत का ?' असं म्हणत तिने त्याला उठविले अन् घरी आणले.

घरी येताच गोपीने त्याच्या हातात एक चिठ्ठी देत सुटकेचा निश्वास टाकला. मकरंदने व योगिनीने चिठ्ठी वाचली. मालती आशूला

मकरंदच्या स्वाधीन करून, पश्चात्ताप व्यक्त करून कायमची निघून गेली होती.

'मकरंद, चला ! आपणाला मालतीला शोधायला हवं ! ती जिवाचं बरवाईट करून घेण्याचा संभव आहे ! ' असं म्हणत खेचतच तिने त्याला बाहेर आणले.

मकरंदला देखील तिच्या चांगुलपणाचा हिरमोड करवेना. त्याने गाडी काढली. रात्री बारा वाजेपर्यंत पुण्यातील रस्ता न् रस्ता ती शोधत होती. पण व्यर्थ ! शेवटी पुन्हा ती दोघं पोलिस स्टेशनवर आली. ड्यूटीवरील अधिकाऱ्याकडे त्यांनी चौकशी केली.

' येस मिस्टर विचारे, हे बघा ! आत्ताच एक ॲक्सिडेंट केस आलेली आहे. बॉडी पोस्ट मॉर्टेमसाठी पाठवायची आहे. ती स्त्री आहे, म्हणून तुम्हांला दाखवितो ! चला ! धडधडत्या अंतःकरणाने तीं दोघं इन्स्पेक्टरच्या मागाहून जात होती. इन्स्पेक्टरने शिपायाला चादर दूर करण्यास सांगितले.

' मयत स्त्री पाहताच यौगिनीने एकच किंचाळी फोडली अन् ती मकरंदच्या कुशीत शिरली. कारण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला तो अचेतन पार्थिव देह मालतीचा होता. तिची ती अवस्था पाहून कधी नव्हे इतका उमाळा येऊन मकरंद सद्गदित झाला. मनात तो म्हणत होता, ' मालतीचा आत्मा अनंतात विलीन झाला आहे. तिचे आता कायमचे आभाळाशी नाते जडले आहे. तिने खरोखरच प्रायश्चित्त घेतले आहे ! '

— समाप्त —

(स्थापना : १९१३)

सुरस ग्रंथमाला, सोलापूर-२.

ऐतिहासिक कादंबऱ्या

पाटणचा संग्राम (आ. २री)	–कै. गो. गु. व्होरा (कन्हयालाल मुन्शी)	८–००
मुकुट (आ. २ री)	–गुरुवर्य टागोर	१–५०
पावनगड (आ. २ री)	–सोमद्र	८–००
मुक्तिदूत	–प्रा. सोनटक्के	८–००
शनवारवाडा (आ. २ री)	–वालचंद शहा	६–००
गुजराथचा नाथ (आ. २री)	–कन्हयालाल मुन्शी	८–००
झंझावात युगे युगे	–लोककवि मनमोहन	५–००
राजकांचन	,, ,,	६–००
सेनापती बाजीराव	,, ,,	६–००
सवाई माधवराव	,, ,,	८–००
पानपत	,, ,,	१०–००
भरारी	,, ,,	१२–००
पहिला पेशवा	,, ,,	१२–००
चिमाजी आप्पा	,, ,,	१२–००
छत्रपति – चार भाग	,, ,,	४८–००
छत्रपति संभाजी	,, ,,	१२–००
छत्रपति राजाराम	,, ,,	१२–००
छत्रपति शाहू	,, ,,	१२–००
प्रतापादित्य (आ. २ री)	–हडकर	८–००
सम्राट् खारवेल	–प्रा. जी. बी. शाह	१–५०

कादंबऱ्या

मृगनयनी	—वृंदावनलाल वर्मा	६-००
तुम्ही पराक्रमाचे पुत्र	—प्रा. गो. म. कुलकर्णी	६-००
[illegible]-नृत्य	—मीनाक्षी साने	३-५०
थेरेसा	—एमिल झोला	४-००
स्वप्नभूल	—एमिल झोला	४-००
प्रेम करायचंय् मला (आ. ३ री)	—बा. रा. कोठारी	३-५०
स्त्री जन्मा तुझी कहाणी (आ. २ री)	—रणदिवे	४-००
कलमी गुलाब	—विनायक देवरुखकर	४-००
अचल	—वृंदावनलाल वर्मा	४-००
नौकाडूबी (आ. ३ री)	—गुरुवर्य टागोर	८-००
भन्नाट	—गो. द. कुलकर्णी	५-००
वाटचाल	—भारवी	८-००
[illegible]	—रविकांत मिराशी	४-००
[illegible]	" "	४-००
[illegible]	" "	४-००
[illegible]	—सौ. नलिनीबाई शहा	४-००
[illegible] (आ. ४ थी)	—गुरुवर्य टागोर	८-००
[illegible] फुले सुकुनि पुन्हा	—सौ. निर्मला बर्वे	४-००
असाव एखाद घरात	—वि. ना. कोठीवाले	३-००
प्रेम माझे राहू दे !	—गो. द. कुलकर्णी	४-००
आणि क्रांतीचा मुडदा पडला !	" "	४-००
[illegible]	—रमेश सोनवणे	५-००
सुमंगल सावधान	—लोककवि मनमोहन	६-००
प्रति-पत्नी	—गुरुवर्य टागोर	८-००
कुलांगना	—सुरेश शर्मा	६-००
कुळवाडी	" "	४-००
न्याय	—कृ. शां. कुलकर्णी	६-००
महिलाश्रम	" "	६-००
अंतरीचा भाव	—सोनवणे	६-००
एक धागा सुखाचा	—सुभाष रणदिवे	५-००

कथा संग्रह

भाग्यरेषा	–सौ. नलिनी शहा	३–००
कांतस्वेळ (आ. २ री)	" "	३–००
आतकुळी	" "	३–००
कुळाईची आन	" "	३–००
परोपरीचे प्रियकर व तऱ्हेतऱ्हेच्या प्रिया	–प्रा. सदाशिव आठवले	३–००
कसे जगावे, कसे मरावे	" "	६–००
सूनेची पत्रे	–सौ. विद्या गोखले	५–००
पोच असलेली माणसे	–अंबादास देवळे	३–००
नीट बोल राधे !	–प्रा. सदाशिव आठवले	३–००
अशोकाची पाने	–प्रि. सुमेरजी	६–००

इतर

महापुराण	–पद्मश्री सुमतीबाई शहा	५–००
रामायण	" "	५–००
ज्ञानगंगा (आ. २ री)	–नाईक	५–००
शिक्षणप्रवाह	–प्रा. घावरकर	१२–००
जटायु	–प्रि. सुमेरजी	४–००
तुकाराम गाथा	" "	४–००
संगीतिका	–बा. घों. रामपुरे	८–००
गीतरसायन	–प्रा. पो. द. कुलकर्णी	२–००
गंमत-जंमत	–प्रि. सुमेरजी	१०–००
ज्ञान-विज्ञान	" "	१०–००
असा देश असे साधुसंत	–सौ. वासंती शहा	३–००
मधुघट	–प्रा. जी. बी. शहा	२–००
माझे घर	–सौ. विद्या गोखले	३–००
मातीच्या संस्कृति	–प्रि. सुमेरजी	४–००
क्रांतीच्या यज्ञकुंडात	–त्र्यं. मो. जंतुरकर	६–००
क्रांतीगाथा	" "	६–००
[illegible]	" "	१५–[illegible]